**या पुस्तकाचा मजकूर फोटोझिंको मुद्रणालय, पुणे येथे मागणी अधिकाऱ्यांच्या सुधारित बदलांसह नव्याने डी.टी.पी. करण्यात आलेला आहे, त्याची प्रथम मुद्रिते मागणी अधिकाऱ्यांस वाचनासाठी दिलेली असून त्यांच्या दुरुस्त्या होणे बाकी आहे, ही अंतिम सॉफ्टकॉपी नाही. याची कृपया नोंद घ्यावी. १९/११/२०१५**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०**

# महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम

**( दिनांक ९ जुलै २०१३ पर्यंत सुधारित )**

**BOMBAY ACT No. LX OF 1958**

# THE MAHARASHTRA STAMP ACT

(As modified upto the 9th July 2013)

[ व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले. ]

**२०१५**

[ किंमत : ]

# महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम,

## अनुक्रमणिका

**उद्देशिका** **पृष्ठे**

**कलमे**

### प्रकरण एक - प्रारंभिक


| | | |
|---|---|---|
| **१.** | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | ०० |
| **२.** | व्याख्या. | |


### प्रकरण दोन - मुद्रांक शुल्क


| | | |
|---|---|---|
| **३.** | शुल्क आकारण्यास पात्र असलेले संलेख. | ०० |
| **४.** | विकास करार, विक्री, गहाण किंवा संव्यवस्था अशा एकाच व्यवहारामध्ये उपयोगात आणलेले अनेक संलेख. | ०० |
| **५.** | अनेक वेगवेगळ्या बाबींच्या संबंधातील संलेख. | ०० |
| **६.** | अनुसूची एकमधील अनेक वर्णानांमध्ये मोडणारे संलेख. | ०० |
| **७.** | विवक्षित संलेखांच्या बाबतीत अधिकतम शुल्क भरणे. | ०० |
| **८.** | सन १९१४ चा अधिनियम क्रमांक ९ खाली किंवा इतर कायद्याखाली कर्जासाठी काढलेल्या ऋणपत्रांहून अन्य बंधपत्रे किंवा रोखे. | ०० |
| **९.** | शुल्के कमी करण्याचा किंवा सूट देण्याचा किंवा त्याबाबत आपसाती करण्याचा अधिकार. | ०० |
| **१०.** | शुल्के कशा रीतीने भरावयाची. | ०० |
| **१०-अ.** | शासनाच्या नियंत्रणाखालील निकाय, विमा कंपन्या आणि बँकांनी रोखीने, दर्शनी धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने भरावयाचे शुल्क. | ०० |
| **१०-ब.** | व्यापारी सदस्यांच्या लेख्यांमधून रोखे बाजार, इत्यादींनी मुद्रांक शुल्क वजा करणे. | ०० |
| **१०-क.** | लेखप्रमाणकाने रोखीने किंवा दर्शनी धनकर्षाने किंवा प्रदानादेशाने भरावयाचे शुल्क. | ०० |
| **११.** | चिकट मुद्रांकाचा वापर. | ०० |
| **१२.** | चिकट मुद्रांक रद्द करणे. | ०० |
| **१३.** | उमट मुद्रांक लावलेले संलेख कसे लिहावेत. | ०० |
| **१४.** | त्याच मुद्रांकनिशी तो एकच तेवढा संलेख निष्पादित करावयाचा. | ०० |
| **१४अ.** | संलेखामधील फेरफाराबाबत आकारणी कशी करावयाची. | ०० |

## अनुक्रमणिका--चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| **१५.** | कलमे १३, १४ किंवा १४-**अ** याविरुद्ध लिहिलेला संलेख रीतसर मुद्रांकित नाही असे मानले जाईल. | ०० |
| **१६.** | शुल्क दर्शविणे. | ०० |
| **१७.** | राज्यात निष्पादित केलेले संलेख. | ०० |
| **१८.** | राज्याबाहेर निष्पादित केलेले संलेख. | ०० |
| **१९.** | महाराष्ट्र राज्यात वाढीव शुल्क देण्यास पात्र असलेल्या विवक्षित संलेखांवरील किंवा त्यांच्या प्रतींवरील शुल्क भरणे. | ०० |
| **२०.** | परकीय चलनात दर्शविलेल्या रकमेचे रूपांतर | ०० |
| **२१.** | पुंजरोखा व विक्रेय रोखे यांचे मूल्यांकन कसे करावयाचे. | ०० |
| **२२.** | विनिमय-दर किंवा सरासरी किंमत यांबाबतच्या विधानाचा परिणाम. | ०० |
| **२३.** | व्याजरक्षी संलेख. | ०० |
| **२४.** | विक्रेय रोख्यांच्या गहाणांशी संबंधित असलेले विवक्षित संलेख, करार म्हणून शुल्क आकारण्यास पात्र असणे. | ०० |
| **२५.** | ऋणाच्या प्रतिफलार्थ किंवा भावी भरणा, इत्यादींच्या अधीन राहून केलेल्या हस्तांतरणावर शुल्क कसे आकारावयाचे. | ०० |
| **२६.** | वार्षिकी, वगैरेच्या बाबतीत मूल्यांकन. | ०० |
| **२७.** | विषयवस्तूचे मूल्य अनिश्चित असेल तेव्हा लावावयाचा मुद्रांक. | ०० |
| **२८.** | शुल्कावर परिणाम करणारी अशी तथ्ये संलेखात मांडावयाची. | ०० |
| **२९.** | विवक्षित अभिहस्तांतरणपत्रांच्या बाबतीत शुल्कास अनुलक्षून निदेश. | ०० |
| **३०.** | शुल्क कोणी द्यावीत. | ०० |
| **३०-अ.** | शुल्क वित्तीय संस्थेने देणे. | ०० |
| | **प्रकरण तीन - मुद्रांकांबाबत अभिनिर्णय** | |
| **३१.** | उचित मुद्रांकांबाबत अभिनिर्णय. | ०० |
| **३२.** | जिल्हाधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र. | ०० |
| **३२-अ.** | अभिहस्तांतरणपत्र, इत्यादी संलेखांचे कमी मूल्य दर्शविल्यास त्यासंबंधात कोणती कार्यवाही करावी. | ०० |
| **३२-ब.** | अपील. | ०० |
| **३२-क.** | पुनरीक्षण. | ०० |

## **अनुक्रमणिका**--चालू

**कलमे** **पृष्ठे**

**प्रकरण चार - रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख**


| | | |
|---|---|---|
| **३३.** | संलेखांची तपासणी करणे व ते अवरुद्ध करून ठेवणे. | ०० |
| **३३-क.** | नोंदणी झाल्यानंतर संलेख अवरुद्ध करून ठेवणे. | ०० |
| **३४.** | रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख हे, पुराव्यात अस्वीकार्य असणे, इत्यादी. | ०० |
| **३५.** | संलेखाचा स्वीकार केव्हा प्रश्नास्पद करता येणार नाही. | ०० |
| **३६.** | अयोग्यरीत्या मुद्रांकित केलेले संलेख स्वीकृत करणे. | ०० |
| **३७.** | अवरुद्ध करून ठेवलेल्या संलेखांच्या संबंधात कशाप्रकारे कार्यवाही करावी. | ०० |
| **३८.** | कलम ३७, पोट-कलम (१) खाली दिलेली शास्तीची रक्कम परत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | ०० |
| **३९.** | अवरुद्ध करून ठेवलेले संलेख मुद्रांकित करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | ०० |
| **४०.** | अभावितपणे रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख. | ०० |
| **४१.** | ज्या संलेखांवर कलमे ३४, ३९ आणि ४० यांखाली शुल्क भरलेले असेल त्यांवर पृष्ठांकन करणे. | ०० |
| **४२.** | मुद्रांक कायद्याविरुध्दच्या अपराधाबद्दल खटला भरणे. | ०० |
| **४३.** | शुल्क किंवा शास्ती भरणाऱ्या विवक्षित बाबतीत ती वसूल करता येईल. | ०० |
| **४४.** | विवक्षित बाबतीत शास्ती किंवा अधिक शुल्क परत करण्याचा महसूल प्राधिकाऱ्याचा अधिकार. | ०० |
| **४५.** | कलम ३७ खालील पाठविलेले संलेख गहाळ झाल्याबद्दल दायित्व नसणे. | ०० |
| **४६.** | शुल्के व शास्ती यांची वसुली. | ०० |


**प्रकरण पाच - विवक्षित प्रकरणांत मुद्रांकांबाबत सवलती देणे**


| | | |
|---|---|---|
| **४७.** | खराब झालेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे. | ०० |
| **४८.** | कलम ४७ खाली सूटमोकळ मिळण्यासाठी अर्ज केव्हा करावयाचा. | ०० |
| **४९.** | निगमांना पुढे आवश्यकता नसलेल्या छापील नमुन्यांच्या बाबतीत सवलत देणे. | ०० |
| **५०.** | चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे. | ०० |
| **५१.** | खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत कशी द्यावयाची. | ०० |
| **५२.** | वापरासाठी न लागणाऱ्या मुद्रांकांबाबत सवलत देणे. | ०० |

**अनुक्रमणिका**--चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| **५२-अ.** | शुल्काबाबत सवलत देणे. | ०० |
| **५२-ब.** | मुद्रांक विधिअग्राह्य ठरविणे व व्यावृत्ती. | ०० |
| | **प्रकरण सहा - निर्देश पुनरीक्षण आणि अपील** | |
| **५३.** | मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याचे नियंत्रण व प्रकरणाचे कथन त्याच्याकडे पाठविणे. | ०० |
| **५३-क.** | कलमे ३२, ३९ व ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाचे पुनरीक्षण. | |
| **५४.** | मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने उच्च न्यायालयाकडे प्रकरणाचे कथन पाठविणे. | ०० |
| **५५.** | कथन केलेल्या प्रकरणासंबंधी अधिक तपशील मागवण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार. | ०० |
| **५६.** | कथन केलेले प्रकरण निकालात काढण्याची कार्यपध्दती. | ०० |
| **५७.** | इतर न्यायालयांनी उच्च न्यायालयाकडे प्रकरणाचे कथन पाठविणे. | ०० |
| **५८.** | मुद्रांकांच्या पुरेसेपणाच्या संबंधाने न्यायालयाच्या विवक्षित निर्णयांचे पुनरीक्षण | ०० |
| | **प्रकरण सात - अपराध व कार्यपध्दती** | |
| **५९.** | रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख निष्पादित करून देणे, वगैरेबद्दल शास्ती. | ०० |
| **५९-अ.** | न्यायालयाने संलेख दाखल करून घेतला असेल तर, कलम ५९ खाली खटला भरता येणार नाही. | ०० |
| **६०.** | वटवणी यादीत खोटे अधिकथन केल्याबद्दल शास्ती. | ०० |
| **६१.** | चिकट मुद्रांक रद्द करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | ०० |
| **६२.** | कलम २८ च्या तरतुदींचे अनुपालन न केल्याबद्दल शास्ती. | ०० |
| **६३.** | मुद्रांकांच्या विक्रीसंबंधीच्या नियमाचा भंग करण्याबद्दल आणि अनधिकृत विक्री करण्याबद्दल शास्ती. | ०० |
| **६३-अ.** | विहित कालावधीत मुद्रांक शुल्काचा भरणा न करणे हा अपराध मानणे. | ०० |
| **६४.** | खटले दाखल करणे व चालविणे. | ०० |
| **६५.** | [वगळण्यात आले.] | ०० |
| **६६.** | न्यायचौकशीचे ठिकाण. | ०० |

## **अनुक्रमणिका**--चालू


| **कलमे** | | **पृष्ठे** |
|---|---|---|
| | **प्रकरण आठ - पूरक तरतूद** | |
| **६७.** | निरीक्षणासाठी पुस्तके, वगैरे खुली असणे. | ०० |
| **६८.** | परिवास्तूमध्ये प्रवेश करण्यास व विवक्षित दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यास अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | ०० |
| **६९.** | नियम करण्याचा अधिकार. | ०० |
| **७०.** | देय शुल्क किंवा सवलत म्हणून द्यावयाची रक्कम यातील अपूर्णांक पूर्णांकित करणे. | ०० |
| **७१.** | [वगळण्यात आले.] | ०० |
| **७२.** | विवक्षित अधिकारांचे प्रत्यायोजन. | ०० |
| **७३.** | न्यायालय फी बाबत व्यावृत्ती. | ०० |
| **७३अ.** | [वगळण्यात आले.] | ०० |
| **७३ब.** | [वगळण्यात आले.] | ०० |
| **७४.** | विनिमयपत्रे, वगैरेवरील मुद्रांक शुल्काच्या दरांना हा अधिनियम लागू नसणे. | ०० |
| **७५.** | अधिनियमाचा अनुवाद करून त्याची स्वस्त दराने विक्री करणे. | ०० |
| **७६.** | अधिनियमतींचे निरसन | ०० |
| | **अनुसूची एक.** | ०० |
| | **अनुसूची दोन.** | ०० |

## [१]सन महाराष्ट्र १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०

## ( महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम )

(या अधिनियमास राष्ट्रपती यांची दिनांक ४ जून, १९५८ रोजी अनुमती मिळाली आणि ही अनुमती, मुंबई शासनाचे **राजपत्र,** भाग चार (इंग्रजी) मध्ये दिनांक ११ जून, १९५८ रोजी प्रथम प्रसिध्द करण्यात आली.)

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम यांद्वारे अनुकूलन, फेरफार व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९५.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३. (१-५-१९७४).*

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. (४-७-१९८०).*

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७. (१०-१२-१९८५).*

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७. @ (२९-८-१९८८).*

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १. (६-१-१९८९).*

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता **मुंबई शासन राजपत्र,** १९५८, असाधारण भाग-पाच, पृष्ठ १२२ (इंग्रजी) पहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@ सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३(१) द्वारे सन १९८८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ निरसित करण्यात आला.

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८. (१-१२-१९८९).*

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. † (७-२-१९९०).*

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७. (१-५-१९९३).*

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. @ (२८-२-१९९४).*

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९. (१-५-१९९४).*

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८. (१७-८-१९९४).*

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. $ (८-६-१९९५).*

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. (१-९-१९९५).*

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. $ $ (१५-९-१९९६).*

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०. $ (१५-५-१९९७).*

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

† सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४ (१) द्वारे सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ निरसित करण्यात आला.

@ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४ द्वारे सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित करण्यात आला.

$ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १५ द्वारे सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ निरसित करण्यात आला.

$$ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४८ द्वारे सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

$ १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याचे कलम ९ पुढीलप्रमाणे :-

## सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. @ (१-५-१९९८).*

**कर बसविणे आणि वसूल करण्याची विधिग्राह्यता.**

"९.(१) मुद्रांक अधिनियम किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये एतद्‌विरुध्द काहिही अंतर्भूत असले तरी, उक्त अधिनियमान्वये प्राधिकाऱ्यांद्वारे बसविलेले शुल्क वसूल करताना, अशा मूल्यनिर्धारणाच्या अनुरोधाने केलेली कोणतीही कारवाई समाविष्ट करून, मुद्रांक शुल्क निर्धारण, आकारणी आणि वसुली करताना, मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियमाच्या अनुसूची एकच्या अनुच्छेद २५ मधील अधिनियमात लागू असलेल्या किंवा अभिप्रेत असलेल्या तरतुदी कार्यान्वित करताना, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा, विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९७ यामध्ये दुरुस्ती केल्यानुसार अनुच्छेद २५ च्या तरतुदी सर्व वेळी निरंतर कार्यान्वित असतील तर, मुद्रांक शुल्कानुसार केलेली आकारणी आणि वसुली कायद्यानुसार केलेली आहे असे समजण्यात येईल आणि त्यानुसार :- १९९७ चा महा. ३०.

(अ) मुद्रांक अधिनियम किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदी अन्वये शुल्क आणि मुद्रांक शुल्काची वसुली या संबंधातील प्राधिकाऱ्यांनी केलेल्या सर्व कृती, कार्यवाही किंवा केलेल्या गोष्टी, सर्व प्रयोजनांकरिता, उक्त अधिनियमानुसार केलेल्या किंवा घेतलेल्या आहेत असे समजण्यात येईल;

(ब) अशा रीतीने लादलेल्या आणि वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी उक्त प्राधिकरणाविरुध्द, कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही चालविता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही;

(क) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणतेही प्राधिकरण अशा रीतीने लादलेल्या किंवा वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा करण्यासाठी कोणताही मनाई हुकूम किंवा आदेश जारी करणार नाही;

(२) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीचा अर्थ, त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला,

(अ) या सुधारणा अधिनयमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींअनुसार पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुद्रांक शुल्काची कोणतीही आकारणी, फेरआकारणी, कर बसविणे किंवा वसुली याबद्दल आक्षेप घेण्यास, किंवा

(ब) या सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, मुद्रांक अधिनियमान्वये, त्यांच्याकडून मुद्रांक शुल्काच्या स्वरूपात देय असलेल्या रकमेपेक्षा त्याने भरलेल्या अधिक रकमेच्या परताव्याची मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो, असा लावण्यात येणार नाही."

---

@ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३० द्वारे सन १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ निरसित करण्यात आला.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२. (१-५-२००१).*

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १. (१-१-२०००).*

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. (१-५-२००२).*

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०. @@ (३-२-२००३).*

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. †(१-५-२००३).*

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याचे कलम १. (२९-६-२००४).*

याची कलम २ ते ६ (१-७-२००४).*

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२. @@@ (७-५-२००५).*

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. †† (१-५-२००६).*

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. *@@ (५-६-२००८).

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५. (१६-९-२०११).*

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१. ††† (२८-११-२०११).*

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४. (२२-८-२०१२).*

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८. £ (१-५-२०१३).*

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@@ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४ द्वारे सन २००३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ निरसित करण्यात आला.

† सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ हा, दिनांक १ मे, २००३ पासून अंमलात आला. **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार-**ख,** इं. पृष्ठ १०५ पहा.

@@@ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ६ द्वारे सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ निरसित करण्यात आला.

†† सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ हा, दिनांक १ मे, २००६ पासून अंमलात आला. **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार-**ख,** (असाधारण) इं. पृष्ठ ६६७, दिनांक २ मे, २००६ पहा.

*@@ हा अधिनियम, ५ जून २००८ पासून अंमलात आला, पहा. शा.अ.म.व व.वि., क्र. मुद्रांक २००७/२२९७/ सीआर. ४३४/एम-१, दिनांक ३१ मे २००८.

††† सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५ द्वारे सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

£ १ मे २०१३ पहा. शा.अ.वि.वि. क्र. मूल्यवर्धित कर १५-बी/सीआर. ५७/कराधान-१,दिनांक २५ एप्रिल २०१३.

## मुंबई राज्यातील मुद्रांक व मुद्रांक शुल्क यांसंबंधीचे कायदे एकत्रित करण्यासाठी व त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यातील मुद्रांकांसंबंधीचा व भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक, नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांच्या संबंधात असेल त्याहून अन्य बाबतीतील,मुद्रांकांच्या व मुद्रांक शुल्काच्या दरांच्या संबंधांतील कायदे एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :---

प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, [१][ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम ] असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण [२][ महाराष्ट्र राज्यास ] लागू असेल.

(३) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास [३] अंमलात येईल.

व्याख्या.

२. (१) या अधिनियमामध्ये विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,---

(अ) "अधिसंघ" याचा अर्थ, कोणत्याही मालाच्या किंवा विक्रेय रोख्यांच्या विक्रीच्या किंवा खरेदीच्या धंद्याचे किंवा त्यांच्या संबंधातील इतर व्यवहारांचे विनियमन करण्याच्या आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या कोणताही अधिसंघ, विनिमय केंद्र (एक्सचेंज), संघटना किंवा व्यक्तींचा निकाय-- मग तो कायद्याने संस्थापित असो किंवा नसो--, असा आहे;

[४][ (ब) " बँक व्यवसायी " याचा अर्थ, जो अधिसंघ, कंपनी अथवा व्यक्ती कर्जे देण्याच्या किंवा गुंतवणूक करण्याच्या प्रयोजनास्तव, मागणीवरून किंवा अन्यथा परत करण्याजोग्या आणि धनादेश, धनाकर्ष, प्रदानादेश यांद्वारे, किंवा अन्यथा काढण्याजोग्या पैशांच्या ठेवी जनतेकडून स्वीकारतो तो अधिसंघ, कंपनी अथवा व्यक्ती, असा आहे;]

(क) " बंधपत्र " यात पुढील संलेखांचा समावेश होतो,—

(एक) ज्या संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला पैसे देण्यास स्वतःस आबध्द करून घेते व त्याचबरोबर विनिर्दिष्ट कृती केल्यास किंवा यथास्थिति न केल्यास ते आबंधन शून्य ठरेल अशी शर्त घालते, असा कोणताही संलेख;

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूची नोंद क्र. ६७ याअन्वये दि. १ मे १९६० पासून या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात " महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम " अशी सुधारणा करण्यात आली.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० द्वारे, " मुंबई राज्यास " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] दि. १६ फेब्रुवारी १९५९ पहा, शासन अधिसूचना, आर.डी. क्र. एसटीपी/१५०७/आयआर, दिनांक ४-२-१९५९, बी.जी.जी. भाग चार-ब, पृ. १९१.

[४] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २(अ) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड(ब) दाखल करण्यात आला.

(दोन) साक्षीदाराने साक्षांकित केलेल्या आणि आदिष्टप्रदेय किंवा वाहकप्रदेय नसलेल्या ज्या संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला पैसे देण्यास स्वतःस आबध्द करून घेते असा कोणताही संलेख; आणि

(तीन) याप्रमाणे साक्षांकित केलेल्या ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडे धान्य किंवा इतर कृषि उत्पन्न देण्यास स्वतःस आबध्द करून घेते असा कोणताही संलेख;

[१] [ स्पष्टीकरण.— त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या खंडाच्या प्रयोजनांस्तव, एखाद्या संलेखाच्या संबंधात "साक्षांकित" याचा अर्थ, साक्षीदारांपैकी प्रत्येकाने निष्पादकाला संलेखावर सही करताना अथवा आपली निशाणी लावताना पाहिले असेल, अथवा निष्पादकाच्या समक्ष व त्याच्या निदेशानुसार दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने त्या संलेखावर सही केली असल्याचे त्याने पाहिले असेल अथवा निष्पादकाकडून त्याने सहीची किंवा लावलेल्या निशाणीची अथवा अशा इतर व्यक्तीच्या सहीची वैयक्तिक अभिस्वीकृती मिळाली असेल आणि साक्षीदारांपैकी प्रत्येकाने निष्पादकाच्या समक्ष संलेखावर सही केलेली असेल अशा एक किंवा अधिक साक्षीदारांकडून साक्षांकित केलेला, असा आहे; मात्र, अशा साक्षीदारांपैकी एकापेक्षा अधिक साक्षीदारांनी एकाचवेळी हजर राहणे आवश्यक असणार नाही आणि साक्षांकनाच्या विशिष्ट नमुन्याची आवश्यकता असणार नाही. ]

(ड) " आकारणीपात्र " ही संज्ञा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर निष्पादित केलेल्या किंवा त्यानंतर प्रथम निष्पादित केलेल्या संलेखास लागू असेल तेव्हा तिचा अर्थ, या अधिनियमाखाली आकारणीपात्र, असा आहे, आणि जेव्हा ती संज्ञा इतर कोणत्याही संलेखांना लागू असेल तेव्हा तिचा अर्थ, असा संलेख निष्पादित केला गेला त्यावेळी, किंवा तो अनेक व्यक्तींनी निरनिराळ्या वेळी निष्पादित केला असल्यास तो प्रथम जेव्हा निष्पादित केला गेला त्यावेळी, राज्यात अंमलात असलेल्या कायद्याखाली आकारणीपात्र, असा आहे;

[२] [ (डड) " मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी " याचा अर्थ, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संपूर्ण [३] [महाराष्ट्र राज्यासाठी किंवा महाराष्ट्र राज्याच्या] कोणत्याही भागासाठी याबाबत नेमील असा अधिकारी, असा आहे;]

(ई) " वटवणी यादी " याचा अर्थ, अधिसंघाच्या नियमांना किंवा उपविधींना अनुसरून एखाद्या अधिसंघाच्या वटवणीगृहास सादर करणे आवश्यक असते अशी संविदांसंबंधीच्या व्यवहारांची यादी, असा आहे :

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २(ब) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९५ याच्या कलम २ द्वारे खंड (डड) समाविष्ट करण्यात आला.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे " मुंबई राज्यासाठी किंवा मुंबई राज्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, ज्या संलेखात असे व्यवहार करणाऱ्या व्यक्तीने किंवा तिच्यावतीने योग्यरीत्या नेमलेल्या मुखत्याराने सही केलेले पुढील अथिकथन नसेल तर, असा कोणताही संलेख, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, वटवणी यादी असल्याचे मानणण्यात येणार नाही :—

" मी/आम्ही, याद्वारे गांभीर्यपूर्वक जाहीर करतो की, वरील यादीत माझ्या/आमच्या [१][रद्द केलेल्या व्यवहाराचा आणि अधिसंघाच्या नियमांना/उपविधींना अनुसरून वटवणीगृहास सादर कराव्या लागणाऱ्या व्यवहारांचा समावेश करून, व्यवहाराचे परिपूर्ण व खरे निवेदन अंतर्भूत आहे.] मी/आम्ही, आणखी असे जाहीर करतो की, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याच्या अनुसूची एकमधील, यथास्थिति,
१९५८ चा मुंबई ६०. अनुच्छेद ५ किंवा अनुच्छेद ४३ खाली ज्याच्याबाबत माफी मिळावी म्हणून मागणी करण्यात आली आहे असा कोणताही व्यवहार वगळण्यात आलेला नाही."

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनासाठी, " व्यवहार " या संज्ञेत विक्री व खरेदी या दोन्ही गोष्टींचा समावेश असेल.

(फ) जिल्हाधिकारी याचा अर्थ, २ * * * * * जिल्ह्याच्या महसुली प्रशासनाचा प्रभारी असलेला मुख्य अधिकारी, असा आहे आणि यामध्ये राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ज्या कोणत्याही अधिकाऱ्यास नियुक्त करील [३] [ व ज्या अधिकाऱ्यास त्याच अधिसूचनेअन्वये किंवा तत्सम कोणत्याही अधिसूचनेअन्वये, जिल्हाधिकाऱ्याचे या अधिनियमाखालील कोणतेही किंवा सर्व अधिकार प्रदान करण्यात आले असतील ] त्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;—

[४] [ (ग) अभिहस्तांतरणपत्र यात,

ज्या संलेखाद्वारे मालमत्ता— मग ती जंगम असो की स्थावर असो— अथवा कोणतीही संपदा किंवा कोणत्याही मालमत्तेतील हितसंबंध, दोन हयात व्यक्तींच्या दरम्यान एकीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात येईल किंवा तिच्याकडे निहित होईल आणि ज्यांसाठी अन्यथा अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्टपणे तरतूद केलेली नसेल अशा पुढील संलेखाचा समावेश होतो :—

(एक) विक्रीनंतरचे अभिहस्तांतरण,

(दोन) प्रत्येक संलेख, [५] * * *

(तीन) कोणत्याही दिवाणी न्यायालयाचा प्रत्येक हुकूमनामा किंवा अंतिम आदेश;

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २ द्वारे " आणि तीत संस्थेच्या " या शब्दांनी सुरू होऊन " समावेश करण्यात आला आहे " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३२(अ) द्वारे " बृहन्मुंबईत, मुंबईचा जिल्हाधिकारी व इतरत्र " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३२(ब) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २(क) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.

[५] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २८(अ)(एक) द्वारे " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

[१] [ (चार) [२] [ कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा पुनर्रचनेच्या संबंधात,] कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ३९४ अन्वये, उच्च न्यायालयाने दिलेला प्रत्येक आदेश [२] [ आणि बँक व्यवसायी कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा पुनर्रचनेच्या संबंधात, बँक विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ४४अ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेला प्रत्येक आदेश ;] १९५६ चा १. १९४९ चा १०.

**स्पष्टीकरण.—**ज्याद्वारे कोणत्याही मालमत्तेचा सहमालक आपला हितसंबंध मालमत्तेच्या दुसऱ्या सहमालकाकडे हस्तांतरित करतो आणि जो वाटणीपत्र नसेल असा संलेख हा, या खंडाच्या प्रयोजनांस्तव, ज्याद्वारे दोन हयात व्यक्तींमध्ये आपसात मालमत्तेचे हस्तांतरण करण्यात आले आहे असा संलेख असल्याचे मानण्यात येईल ;]

[३] [ (गअ) " नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उप नियंत्रक " याचा अर्थ, [४] [ राज्य शासनाने अशाप्रकारे पदनिर्देशित केलेला असा अधिकारी किंवा असे अधिकारी, असा आहे आणि यात, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याबाबतीत नियुक्त करता येईल अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ;] ]

(ह) " रितसर मुद्रांकित " हे शब्द संलेखास लागू केले असता त्याचा अर्थ, त्या संलेखावर उचित रकमेहून कमी नाही इतक्या किंमतीचा चिकट मुद्रांक किंवा उमट मुद्रांक, आहे आणि असा मुद्रांक राज्यात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यास अनुसरून लावण्यात किंवा वापरण्यात आला आहे, असा आहे ;

(आय) " निष्पादित " व " निष्पादन " या संज्ञांचा संलेखाच्या संदर्भात वापर केला असेल तेव्हा त्यांचा अर्थ, " सही केलेला " व " सही ", असा आहे ;

[५] [ **स्पष्टीकरण.—** " सही केलेला " आणि " सही " या संज्ञेत, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० याच्या कलम ११ अनुसार इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचे आरोपण, याचादेखील समावेश होतो ; ] २००० चा २१.

(ज) " सरकारी रोखे " याचा अर्थ, लोक ऋण अधिनियम, १९४४ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले रोखे, असा आहे ; १९४४ चा १८

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २८(अ)(दोन) द्वारे उपखंड (चार) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २ द्वारे खंड (गअ) दाखल करण्यात आला.

[४] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २(१) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[१] [ (जअ) " स्थावर मालमत्ता " यात जमीन, जमिनीपासून मिळणारे लाभ आणि भूमीस संलग्न असलेल्या गोष्टी, किंवा भूमीस संलग्न असलेल्या गोष्टीला कायम जोडलेली कोणतीही गोष्ट, यांचा समावेश होतो ;]

(के) " उमट मुद्रांक " यामध्ये,—

(एक) योग्य अधिकाऱ्याने लावलेल्या व उमटवलेल्या खूणचिठ्ठ्या ;

(दोन) मुद्रांकित कागदावर उमटरेखन केलेले किंवा कोरलेले मुद्रांक ; [२] [ * * * ]

[३] [ (तीन) फ्रँकिंग यंत्राने उमटवलेला ठसा ;

(चार) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही यंत्राने उमटवलेला ठसा,

[४] [ (पाच) ई - प्रदानाची पावती ;]

यांचा समावेश होतो ; ]

(ल) " संलेख " यात, ज्या दस्तऐवजाच्या योगे कोणताही हक्क किंवा दायित्व निर्माण करण्यात, हस्तांतरित करण्यात, मर्यादित करण्यात, विस्तारित करण्यात, नष्ट करण्यात किंवा अभिलिखित करण्यात आले असेल किंवा तसे केल्याचे अभिप्रेत असेल अशा प्रत्येक दस्तऐवजाचा समावेश होतो ; मात्र, त्यात विनिमयपत्र, धनादेश, वचनचिठ्ठी, भरणपत्र, पतपत्र, विमापत्र, शेअर हस्तांतरणपत्र, ऋणपत्र, प्रतिपत्र व पावती यांचा समावेश होत नाही ;

[५] [ **स्पष्टीकरण** :— " दस्तऐवज " या संज्ञेत, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० याच्या कलम २, पोट-कलम (१), खंड (ट) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचादेखील समावेश होतो ; ]

[६] [ (लअ) " दानसंलेख " यामध्ये, दान हे कोणत्याही जंगम [७] [ किंवा स्थावर ] मालमत्तेचे असेल, पण ते लेखी करण्यात आलेले नसेल त्याबाबतीत, अशा रीतीने तोंडी दान देण्यात आले २००० चा २१.
असल्याचे किंवा स्वीकारण्यात आले असल्याचे अधिकथनाच्या स्वरूपात किंवा अन्यथा अभिलिखित करणाऱ्या कोणत्याही संलेखाचा समावेश होतो ; ]

(म) " वाटणी संलेख " याचा अर्थ, ज्या कोणत्याही संलेखाद्वारे कोणत्याही मालमत्तेचे सहमालक अशा मालमत्तेची पृथकपणे वाटणी करतील किंवा तिच्या वाटणीचा करार करतील असा कोणताही संलेख, असा आहे ; आणि यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :-

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २ (ड) द्वारे खंड (जअ) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ द्वारे " याचा समावेश होतो " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे उपखंड (तीन) व (चार) जादा दाखल करण्यात आले.

[४] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २ द्वारे उपखंड (पाच) जादा दाखल करण्यात आला.

[५] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २(२) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम २ द्वारे खंड (लअ) दाखल करण्यात आला.

[७] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(एक) कोणत्याही महसूल प्राधिकरणाने किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाने वाटणी करण्याविषयी दिलेला अंतिम आदेश ;

(दोन) ज्यात वाटणी करण्याचा निदेश देण्यात आला असेल असा लवादाचा निवाडा ; आणि

(तीन) असा कोणताही संलेख निष्पादित केल्याशिवाय कोणतीही वाटणी करण्यात आली असेल तेव्हा, सहमालकांनी सही केलेला आणि अशा वाटणीच्या अधिकथनाच्या रूपाने किंवा अन्यथा सहमालकांमधील अशा वाटणीच्या अटी अभिलिखित करणारा असा कोणताही संलेख किंवा असे कोणतेही संलेख ;

(न) भाडेपट्टा याचा अर्थ, [१][ स्थावर किंवा जंगम (किंवा दोन्ही) मालमत्तांचा ] भाडेपट्टा, असा आहे व त्यात पुढील दस्तऐवजांचाही समावेश होतो,

(एक) पट्टा ;

(दोन) कबुलायत किंवा स्थावर मालमत्तेची मशागत करण्याविषयी, तिचा भोगवटा करण्याविषयी किंवा तिचे भाडे देण्याविषयी किंवा ते सुपूर्द करण्याविषयी दिलेली, भाडेपट्ट्याचे प्रतिरूप नसलेली इतर लेखी हमी ;

(तीन) ज्या संलेखाद्वारे कोणत्याही वर्णनाचे पथकर बसवण्याचे हक्क भाड्याने दिले जातात असा कोणताही संलेख ;

(चार) भाडेपट्ट्यासाठी केलेला अर्ज मंजूर झाला आहे हे दर्शविण्याच्या उद्देशाने अर्जावर लिहिलेला कोणताही मजकूर ;

२ [ (पाच) भाडेपट्ट्याच्या संबंधातील, कोणत्याही दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा किंवा अंतिम आदेश :

परंतु, नंतर अशा हुकूमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार भाडेपट्ट्याचा संलेख करण्यात आला असेल त्याबाबतीत, असा हुकूमनामा किंवा आदेश यांवर कोणतेही मुद्रांक शुल्क पूर्वीच भरण्यात व वसूल करण्यात आलेले असल्यास, त्याचे, अशा संलेखावर बसविण्यायोग्य असलेल्या एकूण शुल्कासाठी समायोजन करण्यात येईल ; ]

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २८ (ब) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८(ब) (दोन) द्वारे उपखंड (पाच) समाविष्ट करण्यात आला.

[१] [ (नअ) एखाद्या संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात " बाजारमूल्य " याचा अर्थ, असा संलेख ज्या दिनांकास निष्पादित करण्यात आला असेल त्या दिनांकास ती मालमत्ता खूल्या बाजारात विकली असता जी किंमत आली असती अशी किंमत ] [२] [ किंवा संलेखात नमूद करण्यात आलेली मोबदल्याची रक्कम, यांपैकी जी अधिकतम असेल ती ] रक्कम, असा आहे ;

(ओ) " विक्रेय रोखा" याचा अर्थ, भारतातील [३] [ * * * ] कोणत्याही रोखे बाजारात विक्री करण्याजोगा असेल अशा प्रकारचा रोखा, असा आहे ;

(प) " गहाणखत " यामध्ये, कर्ज म्हणून दिलेला किंवा द्यावयाचा पैसा किंवा एखादे विद्यमान किंवा भावी ऋण किंवा एखाद्या अभिसंकेताचे पालन प्रतिभूत करण्याच्या प्रयोजनासाठी ज्या संलेखाद्वारे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या प्रित्यर्थ एखाद्या विनिर्दिष्ट मालमत्तेवरील किंवा तिच्या संबंधातील हक्क हस्तांतरित करते किंवा निर्माण करते, अशा प्रत्येक संलेखाचा समावेश होतो ;

[४] [ (पअ) " जंगम मालमत्ता " या शब्दप्रयोगात, ज्याद्वारे, कोणताही हक्क किंवा दायित्व निर्माण करण्यात आले आहे, हस्तांतरित करण्यात आले आहे, मर्यादित करण्यात आले आहे, विस्तारित करण्यात आले आहे, नष्ट करण्यात आले आहे किंवा नमूद करण्यात आले आहे किंवा ते तसे करण्यात आल्याचे अभिप्रेत आहे असे, स्थावर मालमत्तेव्यतिरिक्त, इमारती लाकडाची उभी झाडे, वाढ होत असलेली पिके व गवत, झाडांवरील फळे आणि झाडांतील रस व इतर प्रत्येक प्रकारची मालमत्ता यांचा समावेश होतो ; ]

(क्यु) " कागद " यामध्ये, ज्यावर एखादा संलेख लिहिता येईल असे वत्सपत्र, चर्मपत्र किंवा अन्य कोणतीही सामग्री यांचा समावेश होतो ;

(र) " मुखत्यारनामा " यामध्ये. ज्या संलेखावरून, तो निष्पादित करून देणाऱ्या व्यक्तीकरिता व तिच्या नावाने एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीस काम चालविणाचा अधिकार प्रदान करण्यात येतो अशा (न्यायालय फी संबंधीच्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये फी आकारण्यास पात्र नसलेल्या) कोणत्याही संलेखाचा समावेश [५] [ तसेच त्यात, विधि व्यवसायी नसेल अशा व्यक्तीला ज्याद्वारे, कोणत्याही पक्षकाराच्यावतीने, कोणत्याही कार्यवाहीबाबत कोणत्याही न्यायालयात, न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे हजर राहण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल त्या संलेखाचा समावेश होतो ; ]

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २ द्वारे खंड (नअ) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २(ई) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(फ) द्वारे " किंवा युनायटेड किंग्डम मधील " हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २८(क) द्वारे तथा खंड (पअ) समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २(ग) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१] [ (रअ) " लोक अधिकारी " याचा अर्थ, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या कलम २ खंड (१७) मध्ये व्याख्या केल्यानुसार लोक अधिकारी, असा आहे ; ] १९०८ चा ५.

(स) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ट) " संव्यवस्था " याचा अर्थ, स्थावर किंवा जंगम मालमत्तेची,—

(एक) विवाहाच्या प्रतिफलार्थ ;

(दोन) संव्यवस्थाकर्त्याची मालमत्ता, त्याच्या कुटुंबात किंवा ज्यांच्याकरिता तरतूद करण्याची त्याची इच्छा असेल त्यांच्यामध्ये वाटून देण्याच्या प्रयोजनार्थ किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या एखाद्या व्यक्तीसाठी तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा

(तीन) कोणत्याही धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी,

लेखी केलेली कोणतीही मृत्युपत्रेतर व्यवस्था, असा आहे ; आणि या संज्ञेत अशी व्यवस्था करण्याविषयीच्या एखाद्या लेखी कराराचा समावेश होतो आणि जेथे अशी कोणतीही व्यवस्था लेखी करण्यात आलेली नसेल तेथे, विश्वस्तव्यवस्था जाहीर करून त्याद्वारे किंवा अन्यथा अशा कोणत्याही व्यवस्थेच्या अटी अभिलिखित करणाऱ्या कोणत्याही संलेखाचा समावेश होतो ;

(प) " सैनिक " यामध्ये सेना अधिनियम, १९५० अन्वये जिचे नाव नोंदलेले आहे अशा, अराजादिष्ट अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो. १९५० चा ४६.

प्रकरण दोन

## मुद्रांक शुल्क

### (अ) संलेखांची शुल्कपात्रता

**शुल्क आकारण्यास पात्र असलेले संलेख.**

**३.** या अधिनियमाच्या तरतुदी व अनुसूची एकमधील माफी यांच्या अधीन राहून पुढील संलेख, त्या त्या संलेखाकरिता उचित शुल्क म्हणून जी रक्कम अनुसूची एकमध्ये अनुक्रमे दर्शविण्यात आली असेल तितक्या रकमेचे शुल्क आकारले जाण्यास पात्र असतील :—

(अ) पूर्वी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून न दिलेला जो संलेख, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा दिनांकानंतर राज्यात निष्पादित करून देण्यात आला असेल असा, अनुसूची एकमध्ये उल्लेख केलेला प्रत्येक संलेख ;

(ब) पूर्वी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून न दिलेला जो संलेख, उक्त दिनांकास किंवा त्या दिनांकानंतर, राज्याबाहेर निष्पादित करून दिलेला असेल व जो या राज्यात असलेल्या कोणत्याही मालमत्तेसंबंधीचा किंवा राज्यात केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही बाबींसंबंधीचा किंवा गोष्टींसंबंधीचा असेल व या राज्यात प्राप्त झालेला असेल असा, अनुसूची एकमध्ये उल्लेख केलेला प्रत्येक संलेख :

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २७ याच्या कलम २(ह) द्वारे खंड (रअ) समाविष्ट करण्यात आला.

[१] [परंतु, जो या कलमाच्या तरतुदींअन्वये मुद्रांक शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल अशा मूळ संलेखाचा उतारा प्रत - मग तो मूळ संलेखाची सत्य प्रत म्हणून प्रमाणित केलेली असो किंवा नसो आणि तिची प्रतिरूप असो किंवा नसो किंवा अन्य प्रकारे मूळ संलेखाची प्रतिमा असो किंवा नसो - अशा मूळ संलेखाकरिता देय असलेले योग्य शुल्क भरले गेले नसेल तर, अनुसूची एक मध्ये निर्देश करण्यात आलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क आकारण्यास पात्र असेल :]

[२] [परंतु आणखी असे की,] पुढील संलेखाच्या संबंधात कोणतेही शुल्क आकारणीपात्र असणार नाही :—

(१) ही माफी देण्यात आली नाही तर, ज्या बाबतीत शासनाने किंवा शासनाच्या वतीने किंवा शासनाच्या प्रीत्यर्थ निष्पादित करून दिलेल्या कोणत्याही संलेखाच्या संबंधात आकारण्यास पात्र असे शुल्क भरण्यास शासन दायी असेल अशा बाबतीतील [३] [किंवा ज्या बाबतीत शासनाने शुल्क प्रदानाच्या संबंधातील खर्च सोसण्याचे अभिवचन दिले असेल] अशा बाबतीतील असा कोणताही संलेख ;

(२) मुंबई समुद्रकिनारी जलयान अधिनियम, १८३८ याअन्वये किंवा [४] [व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १९५८] याअन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही जहाच्या किंवा जलयानाच्या अथवा त्याचा किंवा त्यातील एखादा भाग, हितसंबंध, हिस्सा किंवा मालमत्ता यांच्या कायम वा गहाणाच्या रूपाने वा अन्यथा करण्यात येणाऱ्या विक्रीबाबतचा, हस्तांतरणाबाबतचा किंवा इतर व्यवस्थेबाबतचा कोणताही संलेख.

१९३८ चा १९.
१९५८ चा ४४.

**[८] [विकास करार], विक्री, गहाण किंवा संव्यवस्था अशा एकाच व्यवहारामध्ये उपयोगात आणलेले अनेक संलेख.**

**४.** (१) जेव्हा [५] [कोणताही विकास करार] विक्री, गहाण किंवा संव्यवस्था यांच्या बाबतीत, व्यवहार पूर्ण करण्यासाठी अनेक संलेखांची योजना केली असेल तेव्हा, अभिहस्तांतरणपत्र, [६][विकास करार], गहाण किंवा संव्यवस्था यांसाठी अनुसूची एकमध्ये विहित केलेले शुल्क फक्त प्रमुख संलेखावरच आकारण्यात येईल, आणि इतर संलेखापैकी प्रत्येक संलेखावर त्या अनुसूचित त्यासाठी जे शुल्क (कोणतेही असल्यास) विहित केले असेल त्याऐवजी [७][शंभर रुपये] शुल्क आकारण्यात येईल.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ याच्या कलम ६(अ) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(ब) द्वारे " परंतु " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३(अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) द्वारे " भारतीय जहाज नोंदणी अधिनियम, १८४१ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३ (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ द्वारे " वीस रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३(१) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ३(२) द्वारे " विक्री " या मजकुरापूर्वी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) याप्रमाणे उपयोगात आणलेल्या संलेखांपैकी कोणता संलेख पोट-कलम (१) च्या प्रयोजनांकरिता प्रमुख संलेख मानावयाचा ते पक्षकारांना स्वतःच ठरविता येईल.

[१] [ (३) प्रमुख संलेख कोणता हे पक्षकार आपापसात ठरविण्यात कसूर करतील त्या बाबतीत, ज्याच्यासमोर तो संलेख सादर करण्यात आला असेल अशा अधिकाऱ्याला, प्रमुख संलेख कोणता हे या कलमाच्या प्रयोजनार्थ निर्धारित करता येईल : ]

परंतु, अशाप्रकारे निर्धारित केलेल्या संलेखावर आकारणीपात्र शुल्क हे, उपयोगात आणलेल्या उक्त संलेखांपैकी कोणत्याही संलेखासंबंधात आकारता येईल अशा सर्वाधिक शुल्काइतके असेल.

**अनेक वेगवेगळ्या बाबींच्या संबंधातील संलेख.**

**५.** अनेक वेगवेगळ्या बाबी समाविष्ट असलेल्या किंवा अशा बाबींसंबंधीच्या कोणत्याही संलेखावर, अशा बाबींपैकी एकेक बाब समाविष्ट असलेल्या किंवा अशा एकेका बाबीसंबंधीच्या प्रत्येक वेगवेगळ्या संलेखावर या अधिनियमाखाली जे जे शुल्क आकारता येईल त्यांच्या एकूण रकमेइतके शुल्क आकारले जाईल.

**अनुसूची एकमधील अनेक वर्णनांमध्ये मोडणारे संलेख.**

**६.** कलम ५ च्या तरतुदींच्या अधीन राहून, अनुसूची एकमधील दोन किंवा अधिक वर्णनांमध्ये मोडेल अशा तऱ्हेने तयार केलेल्या संलेखावर, त्या अनुसूचीखाली आकारणीपात्र अशी शुल्के निरनिराळी असल्यास, त्यांपैकी जे सर्वाधिक असेल तेवढे शुल्क आकारण्यात येईल :

परंतु, जो शुल्क आकारणीला पात्र असून व ज्याबाबत योग्य ते शुल्क देण्यात आले आहे अशा कोणत्याही संलेखाचा प्रतिसंलेख किंवा प्रतिलिपी, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे [२] [ शंभर रुपयांहून ] अधिक शुल्क आकारले जाण्यास पात्र होणार नाही.

**विवक्षित संलेखांच्या बाबतीत अधिकतम शुल्क भरणे.**

**७.** (१) कलम ४ किंवा ६ यात किंवा इतर कोणत्याही अधिनियमितीत काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये आकारण्यास पात्र असे शुल्क-

(अ) प्रमुख संलेखावर किंवा यथास्थिति, मूळ संलेखावर, किंवा

(ब) या कलमाच्या तरतुदींअनुसार

भरण्यात आले आहे असे सिध्द झाले नसेल तर, प्रमुख संलेखाहून अन्य विक्रीच्या, गहाणाच्या किंवा संव्यवस्थेच्या संलेखावर किंवा कोणत्याही प्रतिसंलेखावर, प्रतिलिपीवर किंवा प्रतीवर आकारणीपात्र शुल्क हे, ज्यावेळी प्रमुख किंवा मूळ संलेख या राज्यात प्राप्त झाला त्यावेळी, या अधिनियमान्वये अधिकतम दराने शुल्क आकारण्यास तो पात्र झाला असता तर, प्रमुख किंवा मूळ संलेखावर कलम १९ अन्वये जे शुल्क आकारता आले असते असे शुल्क असेल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २७ याच्या कलम ४(ब) द्वारे पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

२ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ द्वारे " दहा रुपयांहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीत काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाअन्वये शुल्क आकारण्यास पात्र असलेला कोणताही संलेख, प्रतिसंलेख, प्रतिलिपी किंवा प्रत ही, या कलमाअन्वये त्यावर आकारण्यास पात्र असे शुल्क भरण्यात आलेले असल्याखेरीज पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही :

परंतु, ज्या कोणत्याही न्यायालयासमोर असा कोणताही संलेख, प्रतिलिपी किंवा प्रत सादर केली असेल त्या न्यायालयास, या कलमाअन्वये आकारणीपात्र शुल्क त्यावर भरू देण्याची परवानगी देता येईल व त्यानंतर तो पुरावा म्हणून स्वीकारता येईल.

[१][(३) या अधिनियमाच्या तरतुदी व त्याखाली करण्यात आलेले नियम, कलम ३ खाली संलेखांवर आकारणीपात्र असलेल्या शुल्कांच्या वसुलीशी जेथवर संबंधित असतील तेथवर, पोट-कलम (१) खाली संलेखांच्या प्रतिसंलेखावर, प्रतिलिपिवर किंवा प्रतीवर आकारणीपात्र असलेल्या शुल्कांच्या वसुलीच्या संबंधात शक्यतोवर लागू होतील.]

**सन १९१४ चा अधिनियम क्रमांक ९ खाली किंवा इतर कायद्याखाली कर्जासाठी काढलेल्या ऋणपत्रांहून अन्य बंधपत्रे किंवा रोखे.**

**८.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, स्थानिक प्राधिकरण कर्ज अधिनियम, १९१४ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखाली ऋणपत्रांहून अन्य बंधपत्रे किंवा रोखे काढून त्याद्वारे कर्ज उभारणाऱ्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणावर, अशा कर्जाच्या संबंधात त्याने विक्रीस काढलेल्या अशा बंधपत्रांच्या किंवा रोख्यांच्या एकूण रकमेवर [२][दोन टक्के] इतके शुल्क आकारण्यात येईल आणि अशी बंधपत्रे किंवा रोखे मुद्रांकित करावे लागणार नाहीत आणि त्यांचे नवीकरण, एकत्रीकरण, पोट-विभागणी केल्यावर किंवा अन्यथा त्यांवर आणखी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. १९१४ चा ९.

(२) विवक्षित बंधपत्रे किंवा रोखे यांना मुद्रांकित करण्यापासून व आणखी विवक्षित शुल्क आकारण्यापासून माफी देणाऱ्या, पोट-कलम (१) च्या तरतुदी, त्यांत उल्लेख केलेल्या प्रकारच्या सर्व अदत्त कर्जासंबंधीच्या ऋणपत्रांव्यतिरिक्त इतर बंधपत्रांस किंवा रोख्यांस लागू होतील आणि अशी सर्व बंधपत्रे किंवा रोखे--मग ते मुद्रांकित असोत किंवा नसोत--विधिग्राह्य असतील.

(३) या कलामन्वये आवश्यक असलेले शुल्क भरण्याबाबत बुध्दिपुरस्सर दुर्लक्ष करण्यात आले असेल तर, स्थानिक प्राधिकरण, देय शुल्काच्या रकमेच्या दहा टक्क्यांइतकी रक्कम राज्य शासनाकडे समपहृत करण्यास व पहिल्या महिन्यानंतर जितक्या महिन्यांपर्यंत असे दुर्लक्ष करणे चालू राहिल त्या प्रत्येक महिन्यागणिक तशाच शास्तीस पात्र होईल.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २९ द्वारे पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे " दीड टक्का " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शुल्के कमी करण्याचा किंवा सूट देण्याचा किंवा त्याबाबत आपसाती करण्याचा अधिकार.

**९.** [१][लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री होईल तर, त्यास] **राजपत्रात** नियम किंवा आदेश प्रसिध्द करून त्याद्वारे —–

(क) शुल्क आकारण्यास पात्र असे कोणतेही संलेख किंवा संलेखांचा कोणताही विशिष्ट वर्ग किंवा अशा वर्गातील संलेखांपैकी कोणताही संलेख किंवा कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या व्यक्तींनी किंवा प्रीत्यर्थ किंवा अशा वर्गाच्या कोणत्याही सदस्यांनी किंवा त्यांच्या प्रित्यर्थ निष्पादित करून दिलेले कोणतेही संलेख यांवर आकारली जाणारी शुल्के, संपूर्ण राज्यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने कमी करता येतील किंवा त्याबाबत सूट देता येईल, आणि

(ख) कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनीने किंवा अन्य निगम निकायाने ऋणपत्रांहून अन्य बंधपत्रे किंवा विक्रेय रोखे विक्रीस काढले असतील त्या शुल्कांबाबत आपसमेळ किंवा त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत तरतूद करता येईल.

## (ब) मुद्रांक व त्यांचा वापर करण्याची पध्दती

शुल्के कशा रीतीने भरावयाची.

**१०.** (१) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करून एरव्ही, कोणत्याही संलेखावर आकारणीपात्र सर्व शुल्के,—–

(अ) यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींअनुसार ; किंवा

(ब) अशी कोणतीही तरतूद त्यास लागू नसेल तेव्हा, राज्य शासन नियमांद्वारे निदेशित करील त्याप्रमाणे,

मुद्रांकांच्या रूपाने भरण्यात येतील आणि ती अशी भरण्यात आल्याचे, अशा संलेखांवर दर्शविण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या नियमांद्वारे, इतर गोष्टींबरोबरच, खालील बाबींचे विनियमन करता येईल,—–

(अ) प्रत्येक प्रकारच्या संलेखाच्या बाबतीत, वापरता येतील अशा मुद्रांकांचे वर्णन ;

(ब) उमट मुद्रांक लावलेल्या संलेखांच्या बाबतीत, वापरता येतील अशा मुद्रांकांची संख्या.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][(२-१-अ) मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २००३ अंमलात आल्याच्या दिनांकापासून, उमट मुद्रांकांनी मुद्रांकित केलेल्या संलेखांच्या बाबतीत, अशा मुद्रांकांवर राज्यातील कोषागार, उप कोषागार किंवा मुख्य मुद्रांक कार्यालय याच्या प्राधिकृत अधिकाऱ्याचा किंवा राज्यातील मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, मुद्रांक अधीक्षक किंवा मुद्रांक समाहारक याने नियुक्त केलेल्या समुचित अधिकाऱ्याचा शिक्का व दिनांकासह सही असेल : २००३ चा महा. १०.

परंतु, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट दिनांकापासून अशी आवश्यकता काढून टाकता येईल.]

[२][(२-अ) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास, शुल्क आकारणीपात्र असलेल्या संलेखांवर देय असलेले शुल्क भरण्यात आले असल्याचे दर्शविण्याकरिता अशा संलेखांवर मुद्रांक उमटविण्यासाठी फ्रँकिंग यंत्राचा किंवा कलम २ चा खंड (के) याचा उपखंड (चार) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही यंत्राचा वापर, त्या मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन राहून, करण्याचा प्राधिकार देता येईल.

(२-ख) (अ) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याची किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या मुद्रांक अधीक्षक, मुंबई याची, निष्पादित करून दिलेल्या संलेखांचे व त्यांवर आकारणीपात्र असलेल्या शुल्काचे प्रमाण लक्षात घेता, कोणत्याही व्यक्तीला, संस्थेला किंवा संघटनेला फ्रँकिंग यंत्रांचा किंवा इतर कोणत्याही यंत्राचा असा वापर करण्याचा प्राधिकार देणे हे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, याबाबत खात्री पटेल त्या बाबतीत, त्यास लेखी आदेशाद्वारे अशा व्यक्तीला, संस्थेला किंवा संघटनेला प्राधिकार देता येईल.

(ब) असा प्रत्येक प्राधिकार हा, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी या संबंधात कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्ती, कोणत्याही असल्यास, त्या शर्तींच्या अधीन असेल.

(२-क) अशा प्रकारे प्राधिकृत केलेला, फ्रँकिंग यंत्राचा किंवा इतर कोणत्याही यंत्राचा वापर विनियमित करण्याची कार्यपध्दती ही, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी आदेशाद्वारे ठरवून देईल त्याप्रमाणे असेल;]

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २(क) द्वारे पोट-कलम (२-१-अ) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३(१) द्वारे पोट-कलम (२-अ), (२-ब) आणि (२-क) समाविष्ट करण्यात आले.

[१][(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्यायोगे अनुसूची एकचा स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, आकारणीपात्र असलेले शुल्क, —

(एक) फ्रँकिंग यंत्राद्वारे,

(दोन) रोखीने,

(तीन) दर्शनी धनाकर्षाद्वारे, [२][ * * * ]

(चार) [३][प्रदानाद्वारे ; किंवा]

[४][ (पाच) ई — प्रदानाद्वारे];

कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उप कोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालयात [५][किंवा, यथास्थिति शासकीय पावती लेखांकन यंत्रणेत (आभासी कोषागार)] भरता येईल असे संलेख उक्त अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट करता येतील आणि मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने या प्रयोजनाकरिता, यथोचितरीत्या निर्दिष्ट केलेल्या समुचित अधिकाऱ्याने संलेखांवर केलेल्या तशा आशयाच्या पृष्ठांकनाद्वारे अशा शुल्काचे प्रदान केल्याचे दर्शविता येईल.

[६][(४) कोणत्याही संलेखावर यथास्थिति, पोट-कलम (२-अ), (२-ब) व (२-क) याअन्वये उमटविलेला मुद्रांक किंवा पोट-कलम (३) अन्वये [७][किंवा, कलम ३२ अ च्या पोट-कलम (२) अन्वये] केलेले पृष्ठांकन हे, जणू काही, त्या उमटवलेल्या मुद्रांकनामध्ये दर्शविलेल्या किंवा यथास्थिति, त्या पृष्ठांकनामध्ये नमूद केलेल्या रकमेइतके शुल्क पोट-कलम (१) अन्वये मुद्रांकांच्या सहाय्याने अशा संलेखाच्या संबंधात भरण्यात आलेले आहे व अशी भरलेली रक्कम पोट-कलम (१) अन्वये मुद्रांकाच्या सहाय्याने अशा संलेखावर दर्शविण्यात आली आहे अशा रीतीने त्याच प्रकारे अंमलात राहील.] १९९७ चा ९(७).

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २(ख) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (३) दाखल करण्यात आले.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३(क) द्वारे “ किंवा ” हा शब्द वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) द्वारे “ प्रदानादेशाव्दारे ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३(ग) द्वारे, हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३(घ) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३(२) द्वारे पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

[७] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

शासनाच्या नियंत्रणाखालील निकाय, विमा कंपन्या आणि बँकांनी रोखीने, दर्शनी धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने भरावयाचे शुल्क.

[1][**१०-अ.** कलम १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे निदेश देता येतील की, राज्य किंवा केंद्र सरकार यांची मालकी किंवा नियंत्रण असलेले निकाय, विमा कंपन्या आणि राष्ट्रीयीकृत बँका यांच्याबाबतीत, त्यांचे मुख्य कार्यालय किंवा प्रादेशिक कार्यालय किंवा क्षेत्रीय कार्यालय यांनी, त्यांचे शुल्क कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उप कोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे रोखीने, किंवा दर्शनी धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने भरता येईल आणि मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी अधिसूचित करील असा, शाखा व्यवस्थापकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला समुचित अधिकारी, शुल्काच्या संलेखांवर पुढीलप्रमाणे पृष्ठांकन करील :-

पावती / चलान क्रमांक ..................................... दिनांक ....................................... अन्वये रुपये .......................................................... एवढे शुल्क रोखीने किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे भरण्यात आले.

समुचित अधिकाऱ्याची सही.]

व्यापारी सदस्यांच्या लेख्यांमधून रोखे बाजार, इत्यादींनी मुद्रांक शुल्क वजा करणे.

[2][**१०-ब.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, वायदा संविदा (विनियमन) अधिनियम, १९५२ याच्या कलम २, खंड (क) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, रोखे बाजार किंवा एखादा संघ यांच्यामार्फत केलेल्या व्यवहारांच्या बाबतीत, यथास्थिति, रोखे बाजार किंवा संघ, असे व्यवहार पूर्ण करण्याच्या वेळी, देणे असलेले मुद्रांक शुल्क, व्यापारी सदस्यांच्या लेख्यामधून वजा करून वसूल करील. अशा प्रकारे वसूल केलेले मुद्रांक शुल्क, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने शासकीय कोषागारात, उप कोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालयात हस्तांतरित करण्यात येईल. (१९५२ चा ७४.)

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ, " रोखे बाजार " याचा अर्थ, रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या खंड (ज) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे रोखे बाजार, असा आहे.] (१९५६ चा ४२.)

लेखप्रमाणकाने रोखीने किंवा दर्शनी धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने भरावयाची शुल्के.

[3][**१०-क.** कलम १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लेखप्रमाणक अधिनियम, १९५२ अन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी लेखप्रमाणक नेमण्यात आला असल्यास, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये त्याला सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी देय असलेले शुल्क कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उप कोषागारात किंवा प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे रोखीने किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे भरता येईल आणि लेखप्रमाणक संलेखांवर पुढीलप्रमाणे पृष्ठांकन करील :- (१९५२ चा ५३.)

पावती / चलान क्रमांक ....................................., दिनांक ....................................... अन्वये रुपये ........................................................ एवढे मुद्रांक शुल्क *रोखीने/दर्शनी/ धनाकर्षाद्वारे/प्रदानादेशाद्वारे *शासकीय कोषागार/उप कोषागार, ......................................./ प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे भरण्यात आले.

लेखप्रमाणकाची मुद्रा. लेखप्रमाणकाची दिनांकासह सही.

*लागू नसेल ते खोडावे.

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[3] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ३ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

चिकट मुद्रांकाचा वापर.

**११.** पुढील संलेखांवर चिकट मुद्रांक लावता येतील. उदा.-

[१][(अ) [१][ * * * * * * * ]

(ब) [२][अनुसूची एक मधील ३ [अनुच्छेद १,] ५ (अ) ते (ग), १७, २९, ३७, [४][४१] ४२, ४३, ५९ (अ) आणि ६२ यांमध्ये नमूद केलेले संलेख.]

चिकट मुद्रांक रद्द करणे.

**१२.** (१) (अ) कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून दिलेल्या व शुल्क आकारण्यास पात्र अशा ज्या कोणत्याही संलेखावर जो कोणी कोणताही चिकट मुद्रांक लावील त्याने, तो लावतेवेळी, अशा मुद्रांकाचा पुन्हा वापर करणे शक्य होणार नाही अशा रीतीने तो रद्द केला पाहिजे ; आणि

(ब) जो कोणी, चिकट मुद्रांक असणाऱ्या कोणत्याही कागदावर कोणताही संलेख निष्पादित करून देईल त्याने तो निष्पादित करून देतेवेळी, जर असा मुद्रांक वर सांगितलेल्या रीतीने आधीच रद्द केलेला नसेल तर, त्याचा पुन्हा वापर करणे शक्य होणार नाही अशा रीतीने तो रद्द केला पाहिजे.

(२) पुन्हा वापर करणे शक्य होणार नाही अशा रीतीने रद्द न केलेला कोणातही चिकट मुद्रांक लावलेला संलेख हा, जेथवर अशा मुद्राकांचा संबंध असेल तेथवर, अमुद्रांकित आहे असे मानले जाईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये ज्या व्यक्तीने चिकट मुद्रांक रद्द करणे आवश्यक आहे त्या व्यक्तीला, त्या मुद्रांकावर किंवा त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आपले नाव किंवा आद्याक्षरे किंवा आपल्या व्यवसाय संस्थेचे नाव किंवा तिची आद्याक्षरे लिहून व आपण तसे लिहिल्याचा खरा दिनांक घालून किंवा इतर कोणत्याही परिणामकारक रीतीने तो मुद्रांक रद्द करता येईल.

उमट मुद्रांक लावलेले संलेख कसे लिहावेत.

[५][**१३.** ज्या संलेखासाठी उमट मुद्रांकाने मुद्रांकित केलेला कागद वापरण्यात आलेला असेल असा प्रत्येक संलेख हा, अशा कागदाच्या दर्शनी भागावर, आणि आवश्यकता भासल्यास त्याच्या मागील भागावर लिखाण करून अशा रीतीने लिहिण्यात येईल की, जेणेकरून तो अन्य कोणत्याही संलेखासाठी वापरता येणार नाही किंवा त्याचे उपयोजन करता येणार नाही :

**स्पष्टीकरण एक.—** कोणत्याही संलेखासंबंधात अकारणीपात्र शुल्काची रक्कम भरून काढण्यासाठी उमट मुद्रांक लावलेले दोन किंवा अधिक कागद वापरण्यात येतील तेव्हा, एकतर अशा रीतीने वापरलेल्या प्रत्येक कागदावर अशा संलेखाचा काही भाग लिहिण्यात येईल किंवा ज्या कागदावर संलेखाचा असा काही भाग लिहिण्यात येणार नाही त्यावर, ज्या कागदावर असा संलेख लिहिण्यात आलेला असेल त्या कागदाला जादा कागद जोडलेला आहे असे निर्दिष्ट करून त्या पृष्ठांकनासह त्यावर निष्पादकाला किंवा निष्पादकांपैकी एका निष्पादकाला सही करावी लागेल.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३४(अ) द्वारे खंड (अ) वगळण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ द्वारे मूळ खंड (ब) आणि (क) ऐवजी खंड (ब) दाखल करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३४(ब) द्वारे " क्रमांक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ८ द्वारे " ४१(अ) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ कलम १३ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

**स्पष्टीकरण दोन.**— उमद मुद्रांक असलेला/असलेले एक किंवा अनेक कागद, त्यांवर लिहिला जाणारा पूर्ण संलेख लिहिण्यास अपुरे असतील तेव्हा, असा संलेख लिहून पूर्ण करण्यास आवश्यक असतील तेवढे कोरे कागद त्यास जोडण्यात यावेत ; मात्र, अशा रीतीने जोडलेल्या कोऱ्या कागदावर संलेखाच्या कोणत्याही भागाचे लिखाण करण्यापूर्वी, त्या संलेखाचा बराचसा भाग मुद्रांकित कागदावर लिहिलेला असावा; आणि कोऱ्या कागदावर निष्पादकाने सहि केली तरी चालेल वा न केली तरी चालेल, परंतु, त्या कागदावर अशा रीतीने सही करण्यात आली नसेल तर तेवढ्याने तो संलेख योग्य प्रकारे मुद्रांकित केलेला नाही असे ठरणार नाही. ]

**त्याच मुद्रांकानिशी तो एकच तेवढा संलेख निष्पादित करावयाचा.**

**१४.** शुल्क आकारण्यास पात्र असा कोणताही संलेख ज्या मुद्रांकित कागदावर आधीच लिहिलेला असेल अशा कागदावर, शुल्क आकारण्यास पात्र असा दुसरा कोणताही संलेख लिहिता येणार नाही :

परंतु, कोणत्याही संलेखाद्वारे निर्माण होणारा किंवा त्यावरून दिसून येणारा कोणताही हक्क हस्तांतरित करण्याच्या किंवा अशा संलेखाद्वारे जो कोणताही पैसा किंवा माल जमा केल्याची, पैशाचा भरणा किंवा मालाची सुपूर्दगी सुनिश्चित करण्यात आली असेल त्याची पोच देण्याच्या प्रयोजनासाठी, अशा संलेखावर शुल्क लावून मुद्रांकित असे किंवा शुल्क आकारण्यास पात्र नसलेले कोणतेही पृष्ठांकन करण्यास या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे प्रतिबंध असणार नाही.

**संलेखामधील फेरफारांबाबत आकारणी कशी करावयाची.**

[१][**१४ अ.** इतर पक्षकारांच्या संमतीने किंवा संमतीविना एखाद्या पक्षकाराने संलेखात महत्त्वाचे फेरफार केल्यामुळे संलेखाच्या स्वरूपात मोठा किंवा ठळक फेरफार हात असेल तेव्हा, त्या संलेखाच्या फेरफार केलेल्या स्वरूपानुसार त्यासाठी नवीन मुद्रांकित कागदाचा वापर करणे आवश्यक असेल.]

**कलमे १३, [४][१४ किंवा १४-अ] याविरुद्ध लिहिलेला संलेख [४][ रितसर मुद्रांकित नाही असे मानले जाईल.]**

**१५.** कलम १३, [२][१४ किंवा १४ **अ**] याचे उल्लंघन करून लिहिलेला प्रत्येक संलेख [३][ रीतसर मुद्रांकित नाही ] असे मानले जाईल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १० द्वारे कलम १४-अ समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ११(अ) द्वारे " किंवा कलम १४ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियाच्या कलम ११(ब) द्वारे " अमुद्रांकित आहे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियाच्या कलम ११(क) द्वारे " किंवा कलम १४" या मजकुराऐवजी आणि " अमुद्रांकित मानला जाईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शुल्क दर्शविणे.

**१६.** जेथे एखाद्या संलेखावरील आकारणीपात्र शुल्क किंवा शुल्कातून त्यास मिळणारी माफी ही, कोणत्याही रीतीने दुसऱ्या एखाद्या संलेखासंबंधात प्रत्यक्ष भरण्यात आलेल्या शुल्कांवर अवलंबून असेल तेथे, शेवटी उल्लेखिलेले शुल्क भरलेले आहे ही गोष्ट, त्या प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज केलेला असल्यास आणि ते दोन्ही संलेख सादर केल्यानंतर, अशा प्रथम उल्लेख केलेल्या संलेखावर जिल्हाधिकाऱ्याच्या सहीनिशी पृष्ठांकनाद्वारे किंवा राज्य शासनास नियमांद्वारे विहित करता येईल अशा अन्य रीतीने (कोणतीही असल्यास) दर्शविण्यात येईल.

## (क) संलेख केव्हा मुद्रांकित करावेत

राज्यात निष्पादित केलेले संलेख.

**१७.** शुल्क आकारण्यास पात्र अशा व राज्यात कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून दिलेल्या सर्व संलेखांवर, निष्पादनापूर्वी किंवा निष्पादन करून देतेवेळी [१][ किंवा निष्पादन करून दिल्याच्या दिवसानंतर येणाऱ्या लगतनंतरच्या कामाच्या दिवशी ] मुद्रांक लावण्यात येतील :

[२][ परंतु, अनुसूची एकचे अनुच्छेद १९, २०, २१, २२ किंवा २३ यामध्ये वर्णन केलेली वटवणी यादी, जर अधिसंघाच्या वटवणीगृहाने आपले नियम व उपविधि यांस अनुसरून मुद्रांकित करण्यासाठी ती यादी मुद्रांक शुल्काच्या आवश्यक त्या रकमेसह सादर केली असेल तर, या अधिनियमाखाली केलेल्या नियामांन्वये राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, ती यादी निष्पादित करून दिल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत मुद्रांकित करता येईल.]

राज्याबाहेर निष्पादित केलेले संलेख.

**१८.** (१) केवळ या राज्याबाहेर निष्पादित केलेला, शुल्क आकारण्यास पात्र असलेला प्रत्येक संलेख, तो या राज्यात प्रथम प्राप्त झाल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत मुद्रांकित करता येईल.

(२) असा कोणताही संलेख, त्यासाठी विहित केलेल्या मुद्रांक वर्णनाच्या संदर्भात एखाद्या खाजगी व्यक्तीला रीतसर मुद्रांकित करता येत नसेल तर, तो संलेख उक्त तीन महिन्यांच्या कालावधीत जिल्हाधिकाऱ्याकडे घेऊन जाता येईल, आणि जिल्हाधिकारी, याप्रमाणे असा संलेख घेऊन येणाऱ्या व्यक्तीला जेवढ्या मूल्याचा मुद्रांक आवश्यक असेल व तेवढे पैसे भरल्यावर त्या मूल्याचा मुद्रांक लावून, तो संलेख, राज्य शासन नियमांद्वारे विहित करील अशा रीतीने मुद्रांकित करील.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३१ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९५ याच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

**[5][ महाराष्ट्र राज्यात वाढीव शुल्क देण्यास पात्र असलेल्या विवक्षित संलेखावरील [6][ किंवा त्यांच्या प्रतींवरील] शुल्क भरणे.**

**१९.** अनुसूची एकच्या कोणत्याही अनुच्छेदात वर्णन केलेल्या स्वरूपाचा व या राज्यात असलेली कोणतीही मालमत्ता किंवा या राज्यात केलेली किंवा करावयाची कोणतीही गोष्ट किंवा बाब यासंबंधीचा कोणताही संलेख राज्याबाहेर निष्पादित करून देण्यात आला असेल व नंतर [१][असा संलेख किंवा त्या संलेखाची प्रत ] राज्यात प्राप्त झाली असेल तेव्हा—

(अ) अशा संलेखावर [२][ किंवा त्या संलेखाच्या प्रतीवर ] आकारणीपात्र शुल्काची रक्कम ही, या राज्यात निष्पादित करून दिलेल्या तशाच वर्णनाच्या दस्तऐवजावर अनुसूची एक अन्वये आकारणीपात्र शुल्काच्या रकमेतून, अशा संलेखावर तो निष्पादित करून देण्यात आला त्यावेळी जम्मू व काश्मीर राज्य सोडून भारतात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये अगोदरच चुकती केलेली शुल्काची कोणतीही रक्कम असल्यास, ती रक्कम कमी करून राहणाऱ्या उर्वरित रकमेइतकी असेल ;

(ब) आणि अशा संलेखावर [३][ किंवा त्या संलेखाचा प्रतीवर ] अगोदरच कोणतेही मुद्रांक लावलेले असतील तर, त्याच्या भरीला अशा संलेखावर [३][ किंवा त्या संलेखाच्या प्रतीवर ] जणू काही तो संलेख [३][ किंवा त्या संलेखाची प्रत ] ही, त्यावर अधिकतम शुल्क आकारण्यास पात्र झाला असेल अशा वेळी या राज्यात प्रथमच प्राप्त झालेला संलेख असल्याप्रमाणे त्याच रीतीने व त्याच वेळी व त्याच व्यक्तीने या कलमाच्या खंड (अ) खाली त्यावर आकारणीपात्र असणाऱ्या शुल्काची रक्कम भरण्यासाठी आवश्यक असलेले मुद्रांक लावले पाहिजेत, आणि

(क) कलम ३२, पोट-कलम (३) च्या परंतुकाच्या खंड (ब) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी अशा संलेखास, [४][ किंवा अशा संलेखाच्या प्रतीस ], जणूकाही तो उपरोक्त अधिकतम शुल्क आकारण्यास पात्र झाला असेल अशा वेळी, या राज्याबाहेर निष्पादित करून दिलेला किंवा प्रथमतः निष्पादित करून दिलेला आणि या राज्यात प्रथमच प्राप्त झालेला संलेख आहे असे समजून, लागू होतील, परंतु, उक्त परंतुकाच्या खंड (अ) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी त्यास लागू होणार नाहीत.

## (ड) शुल्कार्थ मूल्यांकनाविषयी

**परकीय चलनात दर्शविलेल्या रकमेचे रूपांतर.**

**२०.** (१) कोणताही संलेख भारतीय चलनाहून अन्य कोणत्याही चलनात दर्शविलेल्या कोणत्याही पैशाच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल तेव्हा, असे शुल्क, त्या संलेखाच्या दिनांकास चालू विनिमय दराप्रमाणे भारतीय चलनात अशा पैशांचे जे मूल्य असेल त्यावरून परिगणित करण्यात येईल.

---

१ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३२(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ३२(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ३२(क) द्वारे हा मजकूर त्याच्या व्याकराणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ३२(ड) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे " मुंबई राज्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३२(ई) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी ब्रिटीश किंवा अन्य कोणत्याही विदेशी चलनाचे भारतीय चलनात रूपांतर करण्याकरिता भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ याच्या कलम २०, पोट-कलम (२) खाली विहित केलेला विनिमयाचा दर, हा चालू दर असल्याचे मानण्यात येईल. १८९९ चा २.

**पुंजरोखा व विक्रेय रोखे यांचे मूल्यांकन करावयाचे.**

**२१.** कोणत्याही पुंजरोख्याच्या किंवा कोणत्याही विक्रेय अथवा इतर रोख्याच्या बाबतीत एखाद्या संलेख यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल तेव्हा, ते शुल्क त्या संलेखाच्या दिनांकास अशा पुंजरोख्याची किंवा रोख्यांची जी सरासरी किंमत असेल किंवा मूल्य असेल त्यानुसार असणाऱ्या त्याच्या मूल्यावरून परिगणिक करण्यात येईल.

**विनिमय-दर किंवा सरासरी किंमत यांबाबतच्या विधानाचा परिणाम.**

**२२.** एखाद्या संलेखात, त्या बाबतीत आवश्यक असेल त्याप्रमाणे विनिमयाचा चालू दर किंवा सरासरी किंमत यासंबंधीचे विधान अंतर्भूत असून त्या विधानानुसार तो मुद्रांकित केला असेल तेव्हा, अशा विधानाच्या विषयवस्तूचा संबंध असेल तेथवर, तो संलेख, तदविरुध्द सिध्द होईपर्यंत रीतसर मुद्रांकित केला असल्याचे गृहीत धरले जाईल.

**व्याजरक्षी संलेख.**

**२३.** एखाद्या संलेखाच्या अटीवरून व्याज देय होत असल्याचे व्यक्त होत असेल तेथे, जर अशा संलेखात व्याजाचा उल्लेख नसता तर त्यावर जेवढे शुल्क आकारणीपात्र झाले असते त्याहून अधिक शुल्क आकारले जाणार नाही.

**विक्रेय रोख्यांच्या गहाणांशी संबंधित असलेले विवक्षित संलेख, करार म्हणून शुल्क आकारावयास पात्र असणे.**

**२४.** (१) कोणताही संलेख –

(अ) जेथे कर्जरूपाने दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाबद्दल अथवा एखाद्या विद्यमान किंवा भावी ऋणाबद्दल प्रतिभूती म्हणून कोणताही विक्रेय रोखा निक्षिप्त करतेवेळी दिलेला असेल, किंवा

(ब) कोणताही विक्रेय रोख्याची प्रतिभूती म्हणून रीतसर मुद्रांकित केलेले हस्तांतरण विमोचनयोग्य किंवा मर्यादित करीत असेल,

तेथे, तो संलेख, जणू काही अनुसूची एकच्या अनुच्छेद ५ (ह) खाली मुद्रांक आकारण्यास पात्र असा करार किंवा कराराचा संक्षेपलेख असल्याप्रमाणे शुल्क आकारण्यास पात्र होईल.

(२) कोणत्याही अशा संलेखाबाबत परिमोचन किंवा ऋणमुक्ती झाल्यास त्या बाबतीत केवळ वर उल्लेखिल्याइतकेच शुल्क आकारले जाईल.

ऋणाच्या प्रतिफलार्थ किंवा भावी भरणा, इत्यादींच्या अधीन राहून केलेल्या हस्तांतरणावर शुल्क कसे आकारावयाचे.

[१][**२५.** जेव्हा कोणतीही मालमत्ता कोणत्याही व्यक्तीकडे,

(अ) तिला देणे असलेल्या कोणत्याही ऋणाच्या पूर्णतः किंवा अंशतः प्रतिफलार्थ किंवा

(ब) कोणताही पैसा किंवा पुंजरोखा,-मग तो त्या मालमत्तेवरील प्रभार किंवा बोजा असो वा नसो अथवा त्या मालमत्तेच्या प्रभारामध्ये किंवा बोज्यामध्ये अंतर्भूत असो वा नसो,-एकतर निश्चितपणे किंवा घटनासापेक्षतेने (तिला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला), प्रदान करण्याच्या किंवा (तिच्याकडे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडे) हस्तांतरित करण्याच्या अधीन राहून-

हस्तांतरित करण्यात आलेली असेल तेथे, असे ऋण, पैसा किंवा पुंजरोखा हा, ते हस्तांतरण ज्या प्रतिफलाच्या बाबतीत यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल त्या प्रतिफलाचा संपूर्ण भाग किंवा यथास्थिति, एक भाग असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट ही, अनुसूची एकच्या अनुच्छेद १६ मध्ये उल्लेखिलेल्या अशा कोणत्याही विक्री प्रमाणपत्रास लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.—** जेव्हा मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि ही विक्री गहाणाच्या किंवा अन्य बोज्याच्या अधीन असेल तेव्हा, आणि कोणतेही न दिलेले गहाणधन किंवा प्रभारित केलेले धन (कोणतेही असल्यास) व त्याच्यावर देणे असणारे व्याज हे विक्रीच्या प्रतिफलाचा भाग असल्याचे मानण्यात येईल,— मग ती रक्कम स्वतः देण्याचे अथवा ती रक्कम देणे विक्रेत्याला भाग पाडल्यास विक्रेत्याला त्याबद्दल क्षतिपूर्ती करून देण्याचे अभिवचन खरेदीदाराने विक्रत्याला दिलेले असो किंवा नसो :

परंतु, जेव्हा गहाणाधीन असलेली कोणतीही मालमत्ता गहाणधारकाकडे हस्तांतरित करण्यात येईल तेव्हा, गहाणासंबंधात अगोदर भरण्यात आलेले कोणतेही शुल्क, हस्तांतरणाबाबत देय होणाऱ्या शुल्कातून वजा करण्याचा त्याला हक्क असेल.

### उदाहरणे

१. “ अ ” हा “ ब ” चे १,००० रुपये देणे लागतो, ५०० रुपये आणि त्याच्या जोडीला मागील १,००० रुपयांच्या ऋणाचे परिमोचनाच्या प्रतिफलार्थ “ अ ” हा “ ब ” मालमत्ता विकतो. त्यासाठी १,५०० रुपयांवर मुद्रांक शुल्क देय असेल.

२. “ अ ” हा “ ब ” ला ५०० रुपयांस मालमत्ता विकतो. ती मालमत्ता १,००० रुपये मुद्दल व त्यावरील न दिलेले व्याज २०० रुपये एवढ्या रकमेसाठी “ क ” कडे गहाण आहे. ही विक्री गहाणाच्या अधीन आहे. त्यासाठी १,७०० रुपयांवर मुद्रांक शुल्क देय असेल.

३. “ अ ” हा १०,००० रुपये किंमतीचे घर “ ब ” कडे ५,००० रुपयांसाठी गहाण ठेवतो. नंतर “ ब ” ते घर “ अ ” कडून विकत घेतो. अगोदर गहाणासाठी भरलेली मुद्रांक शुल्काची रक्कम वजा करून १०,००० रुपयांवर मुद्रांक शुल्क देय असेल.]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १३ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

**वार्षिकी, वगैरेच्या बाबतीत मूल्यांकन.**

**२६.** वार्षिकी किंवा नियतकालाने देय असलेली इतर रक्कम यांचे प्रदान सुनिश्चित करण्यासाठी कोणताही संलेख निष्पादित करून दिला असेल किंवा अभिहस्तांतरणपत्राचे प्रतिफल म्हणजेच वार्षिकी किंवा नियतकालाने देय असलेली इतर रक्कम असेल तेथे, यथास्थिति, अशा संलेखाद्वारे सुनिश्चित झालेली रक्कम किंवा अशा अभिहस्तांतरणपत्राचे प्रतिफल हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता,—

(अ) एका निश्चित कालावधीकरिता रक्कम देय असेल आणि त्यामुळे देण्यात यावयाची एकूण रक्कम अगोदरच सुनिश्चित करता येत असेल तेथे, अशी एकूण रक्कम ;

(ब) जेथे रक्कम ही शाश्वत काळाकरिता किंवा अशा संलेखाच्या वा अभिहस्तांतरणपत्राच्या दिनांकास हयात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या हयातीत समाप्त न होणाऱ्या अनिश्चित काळकरिता देय असेल तेथे, ज्या दिनांकास पहिले प्रदान देणे असेल त्या दिनांकास परिगणना केलेल्या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये अशा संलेखाच्या किंवा अभिहस्तांतरणपत्राच्या अटीअन्वये जी देय होईल किंवा होऊ शकेल अशी संपूर्ण रक्कम ; आणि

(क) जेथे रक्कम ही, अशा संलेखाच्या वा अभिहस्तांतरणपत्राच्या दिनांकास हयात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या हयातीत समाप्त होणाऱ्या अनिश्चित काळाकरिता देय असेल तेथे, ज्या दिनांकास पहिले प्रदान देणे असेल त्या दिनांकापासून परिगणना केलेल्या बारा वर्षांच्या कालावधीमध्ये, पूर्वोक्त रीतीने जी देय होईल किंवा होऊ शकेल अशी कमाल रक्कम, असल्याचे समजण्यात येईल.

**विषयवस्तूचे मूल्य अनिश्चित असेल तेव्हा लावावयाचा मुद्रांक.**

**२७.** यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र अशा कोणत्याही संलेखाच्या विषयवस्तूची रक्कम किंवा तिचे मूल्य हे, तो संलेख निष्पादित करून दिल्याच्या दिनांकास विनिश्चित करता येत नसेल किंवा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निष्पादित करून दिलेल्या संलेखाच्या बाबतीत तो प्रथम निष्पादित करून दिल्याच्या दिनांकास विनिश्चित करता आला नसता तेथे, ज्या सर्वाधिक रकमेसाठी तशाच वर्णनाच्या एखाद्या संलेखात नमूद केलेले असल्यास प्रत्यक्षात वापरलेला मुद्रांक, तो संलेख निष्पादित करून दिल्याच्या दिनांकास [१][पुरेसा ठरला असा] अशा संलेखाखाली मूल्याच्या अशा सर्वाधिक रकमेपेक्षा अधिक कशाचीही मागणी करता येणार नाही [१][आणि त्याहून अधिक रकमेच्या संबंधात संलेखावर अपुरे मुद्रांक लावण्यात आलेले आहेत असे समजण्यात येईल व संलेख पुराव्यासाठी दाखल करण्याच्या संबंधात कलम ३४ च्या तरतुदी तद्नुसार लागू होतील :

परंतु, कलम ३४ अशा संलेखाला लागू करण्याच्या प्रयोजनार्थ, शुल्कातील तफावतीची रक्कम भरणे पुरेसे होईल व त्यानंतर दंडाची रक्कम बसविण्यात येणार नाही :]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १४(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][परंतु आणखी असे की], एखाद्या खाणीच्या भाडेपट्ट्याच्या बाबतीत स्वामित्वधन किंवा त्या खाणीच्या उत्पन्नाचा काही हिस्सा भाड्यादाखल किंवा भाड्याच्या भागादाखल प्राप्त होत असेल तेव्हा, असे स्वामित्वधन किंवा अशा हिश्श्याचे मूल्य, मुद्रांक शुल्काच्या प्रयोजनाकरिता पुढीलप्रमाणे अंदाजित करणे पुरेसे असेल,—

(अ) जेव्हा तो भाडेपट्टा शासनाकडून किंवा त्याच्यावतीने देण्यात आलेला असेल तेव्हा, भाडेपट्ट्यानुसार स्वामित्वधन किंवा हिस्सा म्हणून सरकारला देय होऊ शकेल अशी, याबाबतची सर्व परिस्थिती लक्षात घेऊन, जिल्हाधिकारी अंदाजित करील ती रक्कम किंवा ते मूल्य ; किंवा

(ब) जेव्हा तो भाडेपट्टा कोणत्याही इतर व्यक्तीकडून देण्यात आलेला असेल तेव्हा, दरवर्षी [२][पन्नास हजार रुपये];

आणि अशा स्वामित्वधनाच्या किंवा हिश्श्याच्या पूर्ण रकमेची—मग ती कितीही असो—अशा भाडेपट्ट्यानुसार मागणी करता येईल :

परंतु असेही की, कलम ३१ किंवा ४० यांखाली एखाद्या संलेखाच्या संबंधात कार्यवाही करण्यात आलेली असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केलेली रक्कम ही, तो संलेख निष्पादित करून दिल्याच्या दिनांकास प्रत्यक्ष वापरण्यात आलेला मुद्रांक असल्याचे मानण्यात येईल.

**शुल्कावर परिणाम करणारी अशी तथ्ये संलेखात मांडावयाची.**

**२८.** कोणत्याही संलेखाच्या शुल्कपात्रतेवर किंवा तो संलेख जे शुल्क आकारण्यास पात्र असेल त्या शुल्काच्या रकमेवर ज्याचा परिणाम होईल असे प्रतिफल (कोणतेही असल्यास), [३][बाजार मूल्य] आणि इतर सर्व तथ्ये व परिस्थिती व बाबी त्या संलेखात पूर्णपणे व खरेपणाने मांडण्यात येतील.

**विवक्षित अभिहस्तांतरणपत्रांच्या बाबतीत शुल्कास अनुलक्षून निदेश.**

**२९.** (१) कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत त्या संपूर्ण मालमत्तेची एका प्रतिफलार्थ विक्री करण्यासाठी संविदा करण्यात आली असेल व ती मालमत्ता खरेदीदाराकडे वेगवेगळ्या संलेखाद्वारे अलग अलग भागांमध्ये अभिहस्तांतरित केली असेल तेथे, [४][बाजार मूल्याचे] संविभाजन पक्षकारांना योग्य वाटेल अशा रीतीने करण्यात येईल. परंतु, अशा संलेखाच्या संबंधातील अभिहस्तांतरणपत्रात प्रत्येक स्वतंत्र भागाकरिता अलग [४][बाजार मूल्य दिलेले राहील] आणि अशा अभिहस्तांतरणपत्रावर, अशा अलग [४][बाजार मूल्याच्या संबंधात] यथामूल्य शुल्क आकारण्यात येईल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १४(ब) द्वारे परंतुकातील " परंतु " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३३ द्वारे " पंचवीस हजार रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५(अ) द्वारे " प्रतिफल " या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेर-फारांसह समाविष्ट करण्यात आला.

(२) जी मालमत्ता दोन किंवा अधिक व्यक्तींनी संयुक्तपणे किंवा कोणत्याही व्यक्तीने स्वतःकरिता व इतरांकरिता किंवा पूर्णतः इतरांकरिता एका प्रतिफलार्थ खरेदी करावयाची संविदा केलेली असेल ती मालमत्ता ज्यांनी किंवा ज्यांच्याकरिता खरेदी केली त्या व्यक्तीकडे प्रतिफलाच्या अलग अलग भागांकरिता स्वतंत्र संलेखाद्वारे भागशः अभिहस्तांतरित करण्यात आली असेल तेथे, प्रत्येक स्वतंत्र भागाचे अभिहस्तांतरणपत्र, [१][मालमत्तेचे अशा भागाच्या बाजार मूल्याच्या] संबंधात अशा स्वतंत्र भागाकरिता यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल.

(३) जिने कोणतीही मालमत्ता खरेदी करण्याची संविदा केलेली आहे परंतु तिने तिचे अभिहस्तांतरणपत्र मिळविलेले नाही अशी एखादी व्यक्ती, ती मालमत्ता इतर कोणत्याही व्यक्तीस विकण्यासाठी संविदा करील व त्यामुळे ती मालमत्ता ताडबतोब त्या पोट-खरेदीदाराकडे अभिहस्तांतरित होत असेल तेथे, ते अभिहस्तांतरणपत्र मूळच्या खरेदीदाराने पोट-खरेदीदारास केलेल्या [२][विक्रीच्या वेळी असलेल्या मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या] बाबतीत यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल.

(४) जिने कोणतीही मालमत्ता खरेदी करण्याची संविदा केलेली आहे परंतु तिने तिचे अभिहस्तांतरणपत्र मिळविलेले नाही अशी एखादी व्यक्ती, ती संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना विकण्यासाठी संविदा करील आणि परिणामी, ती मूळ विक्रेत्याकडून निरनिराळ्या व्यक्तींकडे भागशः अभिहस्तांतरित होत असेल तेथे, पोट-खरेदीदारास विकलेल्या प्रत्येक भागाचे अभिहस्तांतरणपत्र हे, [३][केवळ अशा पोट-खरेदीदारास विकण्यात आलेल्या भागाच्या बाजार मूल्याच्याच संबंधात-मूळ विक्रेत्याने अभिहस्तांतरित केलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्याची रक्कम लक्षात न घेता-यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल ; आणि अशा मालमत्तेच्या उरलेल्या भागाचे (कोणताही असल्यास) मूळ खरेदीदारास दिलेले अभिहस्तांतरणपत्र, अशा उरलेल्या भागाच्या बाजार मूल्याच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल :]

परंतु, अनुसूची एकच्या अनुच्छेद २५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा शेवटी नमूद केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावरील शुल्क, कोणत्याही बाबतीत, ४[दहा रुपयांहून] कमी असणार नाही.

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५(ब) द्वारे " त्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रतिफलाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या आधारे कलम ५(क) विक्रीबद्दलच्या प्रतिफलाच्या या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५(ड) द्वारे "अशा दुय्यम खरेदीदाराने " या शब्दांनी सुरू होणाऱ्या व " केवळ यथामूल्य आकारण्यास योग्य होईल " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १५(अ) द्वारे " तीन रुपयांहून " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(५) एखादा पोट-खरेदीदार हा, त्याला आपले हितसंबंध प्रत्यक्ष विकणाऱ्या व्यक्तीकडून अभिहस्तांतरणपत्राची विषयवस्तु असेल अशा मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असे आणि तद्नुसार रीतसर मुद्रांकित करण्यात आले असे, अशा हितसंबंधाचे प्रत्यक्ष अभिहस्तांतरणपत्र घेत असेल त्याबाबतीत, त्या मूळ विक्रेत्याने त्याच मालमत्तेच्या संबंधात त्यास त्यानंतर करून द्यावयाच्या कोणत्याही अभिहस्तांतरणपत्रावर, त्या अभिहस्तांतरणपत्राची विषयवस्तु असेल अशा मालमत्तेच्या बाजारमूल्याबद्दलच्या अभिहस्तांतरणावर जितके शुल्क आकारण्यास पात्र होऊ शकेल तितके शुल्क किंवा असे शुल्क जे [२][पन्नास रुपयांहून] अधिक होत असेल तेव्हा [२][पन्नास रुपये] शुल्क आकारण्यात येईल.]

### (ई) शुल्के कोणी द्यावीत

**शुल्के कोणी द्यावीत.**

३०. विरुद्ध असा कोणताही करार झाला नसल्यास, योग्य मुद्रांकाची तरतूद करावयास लागणारा खर्च पुढे दर्शविल्याप्रमाणे त्या त्या व्यक्तींना सोसावा लागेल,—

(क) अनुसूची एकच्या पुढील अनुच्छेदांपैकी कोणत्याही अनुच्छेदात वर्णन केलेल्या कोणत्याही संलेखाच्या बाबतीत, असा संलेख विकर्षित करणाऱ्या किंवा निष्पादित करणाऱ्या व्यक्तीने खर्च सोसला पाहिजे :—

क्रमांक २ (प्रशासन बंधपत्र),

क्रमांक ६ (हक्कलेखनिक्षेप, हडप किंवा तारण यासंबंधीचा करार),

क्रमाक १३ (बंधपत्र),

क्रमांक १४ (नौतारण बंधपत्र),

क्रमांक २८ (सीमाशुल्क बंधपत्र),

क्रमांक ३३ (अधिक भार),

क्रमांक ३५ (क्षतिपूर्ति बंधपत्र),

क्रमांक ४० (गहाणखत),

क्रमांक ५२ (परिमोचन पत्र),

क्रमांक ५३ (नौभार बंधपत्र),

क्रमांक ५४ (प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत),

क्रमांक [३][५९ (अ)] (भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ याच्या कलम ८ यात ज्यांबद्दल तरतूद केली ती ऋणपत्रे खेरीजकरून, जी ऋणपत्रे विक्रेय रोखे असतील त्यांचे हस्तांतरण— मग ती ऋणपत्रे शुल्क आकारण्यास पात्र असोत किंवा नसोत—), १८९९ चा २.

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५(ई) द्वारे मूळ मजकुराऐवजी पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र क्रमांक २७ याच्या कलम १५(ब) द्वारे " सात रुपये पन्नास पैशांहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १६(अ) द्वारे " ५८(अ) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

क्रमांक ५९ (ब) (बंधपत्र, गहाणखत किंवा विमापत्र यांद्वारे प्रतिभूत केलेल्या कोणत्याही हितसंबंधाचे हस्तांतरण;

(ब) अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत (गहाण मालमत्तेचे अभिहस्तांतरणपत्र धरून) हमीदाराला; भाडेपट्ट्याच्या किंवा भाडेपट्ट्याच्या कराराच्या बाबतीत-पट्टेदाराला किंवा उद्देशित पट्टेदाराला;

(क) भाडेपट्ट्याच्या प्रतिलेखाच्या बाबतीत, पट्टेदाराला;

(ड) विनिमय संलेखाच्या बाबतीत, पक्षकारांना समान हिश्श्यांत;

(ई) विक्रीच्या प्रमाणपत्राच्या बाबतीत, ते प्रमाणपत्र ज्या मालमत्तेसंबंधीचे असेल तिच्या खरेदीदाराला; [१][* *].

(फ) वाटणीपत्राच्या बाबतीत, ते करून देणाऱ्या पक्षकारांना, वाटणी केलेल्या त्यांच्या संपूर्ण मालमत्तेतील आपापल्या हिश्श्यांच्या प्रमाणात किंवा जेव्हा ती वाटणी महसूल प्राधिकारणाने किंवा दिवाणी न्यायालयाने किंवा लवादाने दिलेल्या आदेशाचे पालन म्हणून केली जात असेल तेव्हा, असे प्राधिकरण, न्यायालय किंवा लवाद निदेश देईल त्या प्रमाणात; [२][आणि],

[३][ (ग) अन्य कोणत्याही बाबतीत, संलेख निष्पादित करून देणाऱ्या व्यक्तीला.]

शुल्क वित्तीय संस्थेने देणे.

[४][ **३०-अ.** (१) कलम ३० मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कलम ३० च्या खंड (अ) ते (ग) यांमध्ये निर्दिष्ट केलेला जो कोणताही संलेख, बँक, बँकेतर वित्त कंपनी, गृहनिर्माण वित्त कंपनी किंवा तत्सम संस्था यांसारख्या कोणत्याही वित्तीय संस्थेच्या प्रीत्यर्थ किंवा त्या संस्थेने, अशा कोणत्याही वित्तीय संस्थेच्या प्रीत्यर्थ कोणताही हक्क निर्माण करील असा कोणताही संलेख महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, २०१३ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्या दिनांकानंतर निष्पादित केला असेल त्याबाबतीत, अन्य पक्षकारांकडून मुद्रांक शुल्क वसूल करण्याच्या तिच्या कोणत्याही हक्कास बाधा न पोहोचता, असे उचित मुद्रांक शुल्क भरण्याचे दायित्व हे अशा संबंधित वित्तीय संस्थेवर राहील. २०१३ चा महा. ८.

(२) महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, २०१३ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी निष्पादित केलेल्या आणि अंमलात असलेल्या अशा कोणत्याही संलेखांच्या संबंधात उचित मुद्रांक भरले नसेल तेव्हा, ती वित्तीय संस्था असे संलेख ३० सप्टेंबर २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी अवरुध्द करील आणि ते वसुलीसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील. २०१३ चा महा. ८.

(३) अशी वित्तीय संस्था पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे असे संलेख अवरुध्द करण्यात कसूर करील तेव्हा, संबंधित वित्तीय संस्था, अशा संलेखावर देय असलेल्या मुद्रांक शुल्काएवढी शास्ती भरण्यास पात्र ठरेल.]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १६(ब) द्वारे “ आणि ” हा शब्द वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १६(क) द्वारे “ आणि ” हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १६(ड) द्वारे खंड (ग) जादा दाखल करण्यात आला.

[४] सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ द्वारे कलम ३०-अ समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण तीन

## मुद्रांकांबाबत अभिनिर्णय

३१. [१][(१) जेव्हा कोणताही संलेख,—मग तो निष्पादित करून दिलेला असो किंवा नसो आणि तो पूर्वीच मुद्रांकित केलेला असो किंवा नसो,— [२][त्या संलेखाच्या कोणत्याही एका पक्षकाराकडून जिल्हाधिकाऱ्याकडे आपला जाईल आणि तो आणणारी अशी व्यक्ती] त्या संलेखावर किती (कोणतेही असल्यास) शुल्क आकारणीपात्र ठरेल [३][किंवा अनुसूची एकच्या कोणत्या अनुच्छेदान्वये] तो शुल्क आकारण्यास पात्र ठरेल याबाबत त्या अधिकाऱ्याचे मत घेण्यासाठी अर्ज करील आणि यथामूल्य तत्त्वानुसार मुद्रांक शुल्क अंतर्भूत असेल त्याबाबतीत, [४][शंभर रुपये इतकी] व किमान पाच रुपये व कमाल पंचवीस रुपये या रकमांच्या अधीन राहून, प्रत्येक १,००० रुपयांस किंवा त्याच्या भागास एक रुपया फी देईल तेव्हा, जिल्हाधिकारी, आपल्या निर्यणशक्तीअनुसार त्या संलेखावर किती शुल्क आकारणीपात्र ठरेल ते शुल्क (कोणतेही असल्यास) [५][किंवा अनुसूची एकच्या कोणत्या अनुच्छेदान्वये] तो शुल्क आकारण्यास पात्र ठरेल ते निर्धारित करील.] उचित मुद्रांकांबाबत अभिनिर्णय.

(२) जिल्हाधिकाऱ्यास या प्रयोजनासाठी [५][त्या संलेखाची सत्य प्रत अथवा] गोषवारा आणि ज्यांचा त्या संलेखाच्या शुल्कपात्रतेवर किंवा त्यावर जे शुल्क आकारण्यास पात्र असेल त्या शुल्काच्या रकमेवर परिणाम होईल अशी सर्व तथ्ये व परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने त्यात मांडण्यात आली आहे हे सिध्द करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल असा प्रतिज्ञालेख किंवा इतर पुरावा दाखल करण्यास फर्मावता येईल [६][आणि त्याचप्रमाणे अशी सत्य प्रत अथवा असा गोषवारा] व पुरावा दाखल करण्यात येईपर्यंत अशा कोणत्याही अर्जावर कार्यवाही करण्यास त्यास नकार देता येईल.

परंतु,—

(अ) या कलमाला अनुलक्षून दाखल करण्यात आलेला कोणताही पुरावा, तो ज्या संलेखाशी संबंधित असेल अशा संलेखावर किती शुल्क आकारणीपात्र आहे याबाबतची चौकशी खेरीज करून एरव्ही, कोणत्याही दिवाणी कार्यवाहीत कोणत्याही व्यक्तीविरुध्द वापरला जाणार नाही; आणि

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ८(अ) द्वारे " जिल्हाधिकाऱ्यांकडे आणला जाईल आणि तो आणणारी व्यक्ती " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १७(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १७(ब)(एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १७(ब)(दोन) द्वारे " आणि त्याचप्रमाणे असा गोषवारा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) ज्या ज्या व्यक्तीने असा कोणताही पुरावा दाखल केला असेल त्या प्रत्येक व्यक्तीस, तो पुरावा लागू असणाऱ्या संलेखावर जेवढे शुल्क आकारणीपात्र असेल ते पूर्ण शुल्क भरल्यावर अशा संलेखात उपरोक्त तथ्ये किंवा परिस्थिती यापैकी कोणत्याही तथ्याचा किंवा परिस्थितीचा खरेपणाने उल्लेख न केल्या कारणाने या अधिनियमाखाली जी शास्ती तिला द्यावी लागली असती त्या कोणत्याही शास्तीपासून तिला सूट देण्यात येईल.

[१][ (३) पोट-कलम (१) आणि (२) खालील कार्यार्थ जिल्हाधिकारी हा, त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी नसेल व अभिनिर्णयासाठी त्याच्याकडे आलेल्या संलेखाची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेचे बाजारमूल्य हे, त्यामध्ये खरेपणाने मांडण्यात आलेले नाही असे त्यास सकारण वाटत असेल त्याबाबतीत, [२][तो, मुद्रांक शुल्काचे निर्धारण करण्याच्या प्रयोजनाकरिता, मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ यामध्ये दिल्याप्रमाणे अशा मालमत्तेचे खरे बाजारमूल्य ठरवील.] ]

[३][ (४) (एक) राज्यात अशा संलेखाचे निष्पादन करण्यात आल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा राज्यात अशा संलेखाचे प्रथम निष्पादन केल्यापासून एक महिन्याच्या आत; किंवा

(दोन) असा संलेख राज्याबाहेर निष्पादित करण्यात आला असेल किंवा प्रथम राज्याबाहेर निष्पादित करण्यात आला असेल त्याबाबतीत, असा संलेख या राज्यामध्ये प्रथम मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत,

एखाद्या संलेख जिल्हाधिकाऱ्याकडे अभिनिर्णयासाठी आणण्यात आला असेल त्याबाबतीत, कलम ३० अन्वये मुद्रांक शुल्क भरण्यास पात्र असलेली व्यक्ती, जिल्हाधिकाऱ्याद्वारे अभिनिर्णय झालेल्या मुद्रांक शुल्काच्या बाबतीतील मागणीची नोटीस (तिला) देण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत ते शुल्क भरेल. उक्त कालावधीत असे मागणी केलेले मुद्रांक शुल्क भरण्यास त्या व्यक्तीने कसूर केल्यास, ती, राज्यात असा संलेख निष्पादित केल्याच्या किंवा यथास्थिति, असा संलेख प्रथम मिळाल्याच्या दिनांकापासून प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या काही भागासाठी मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या रकमेवर २ टक्के दराने शास्तीची रक्कम भरण्यास पात्र असेल :]

[४][ परंतु, कोणत्याही परिस्थितीत, अशी शास्तीची रक्कम, मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाही.]

**जिल्हाधिकाऱ्यां-कडून प्रमाणपत्र.**

**३२. (१)** जेव्हा कलम ३१ खाली जिल्हाधिकाऱ्याकडे आणलेला एखादा संलेख त्याच्या मते शुल्क आकारणीपात्र अशा एखाद्या वर्णनाचा असेल आणि-

(क) तो अगोदरच पूर्ण मुद्रांकित आहे असे जिल्हाधिकाऱ्याने निर्धारित केले असेल तेव्हा, किंवा

(ख) जिल्हाधिकाऱ्याने कलम ३१ खाली निर्धारित केलेले शुल्क किंवा त्या संलेखाच्या संबंधात अगोदरच भरण्यात आलेल्या शुल्कासह जी रक्कम याप्रमाणे निर्धारित केलेल्या शुल्काइतकी होईल ती रक्कम भरण्यात आली असेल तेव्हा,

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६ द्वारे पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २(अ) द्वारे " त्यास मुद्रांक शुल्काची " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " पाठविता येईल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(ब) द्वारे पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[४] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २(ख) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

जिल्हाधिकारी, त्या संलेखावर आकारण्यास पात्र असे पूर्ण शुल्क भरले गेले आहे असे त्यावर [१][ (अनुसूची एकमधील संबध्द अनुच्छेद व रक्कम नमूद करून)] पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील.

(२) जेव्हा असा संलेख, त्याच्या मते शुल्क आकारण्यास पात्र नसेल तेव्हा, तो असा संलेख शुल्क आकारण्यास पात्र नाही असे पूर्वोक्त रीतीने प्रमाणित करील.

(३) [२][ कलम **५३-क** च्या तरतुदींच्या अधीन राहून,] या कलमाखाली ज्यावर पृष्ठांकन करण्यात आले आहे असा कोणताही संलेख यथास्थिति, रीतसर मुद्रांकित असलेला किंवा शुल्क आकारण्यास पात्र नसलेला मानण्यात येईल, आणि जर तो शुल्क आकारण्यास पात्र असेल तर, तो पुरावा म्हणून किंवा अन्यथा ग्राह्य होईल, आणि जणूकाही तो मुळातच रीतसर मुद्रांकित असावा त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही करता येईल व त्याची नोंदणी करता येईल :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे जिल्हाधिकाऱ्यास, खालील संलेखांवर पृष्ठांकन करण्याचा प्राधिकार मिळणार नाही :—

(क) राज्यात निष्पादित करून दिलेल्या किंवा प्रथम निष्पादित करून दिलेला आणि तो निष्पादित करून दिल्याच्या किंवा यथास्थिति प्रथम निष्पादित करून दिल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचा अवधी समाप्त झाल्यानंतर त्याच्याकडे आणण्यात आलेला कोणताही संलेख ;

(ख) राज्याबाहेर निष्पादित करून दिलेला किंवा प्रथम निष्पादित करून दिलेला आणि या राज्यात प्रथम प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांचा अवधी समाप्त झाल्यानंतर त्याच्याकडे आणण्यात आलेला कोणताही संलेख ; किंवा

(ग) योग्यरीतीने मुद्रांकित नसलेल्या कागदावर विकर्षित केल्यावर किंवा निष्पादित करून दिल्यावर त्याच्याकडे आणण्यात आलेला, वीस नवे पैसे किंवा त्याहून कमी शुल्क आकारण्यास पात्र असा कोणताही संलेख.

**अभिहस्तांतरणपत्र, इत्यादी संलेखांचे कमी मूल्य दर्शविल्यास त्यासंबंधात कोणती कार्यवाही करावी.**

[३][ **३२-अ**. (१) प्रत्येक अभिहस्तांतरणपत्र, देवघेवपत्र, दानपत्र, विक्रीचे प्रमाणपत्र, वाटणीपत्र अथवा स्थावर मालमत्तेची विक्री करण्यासाठी प्रतिफलार्थ दिलेला मुखत्यारनामा, संपत्तिव्यवस्था पत्र अथवा अभिहस्तांकनाद्वारे भाडेपट्ट्याचे हस्तांतरणपत्र हे, नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदींखाली नोंदणीसाठी सादर करण्यात येईल तेव्हा, त्यासोबत त्याची सत्य प्रत जोडावी लागेल : १९०८ चा १६.

परंतु, ४ जुलै, १९८० रोजी किंवा त्यानंतर, मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापर्यंत निष्पादित केलेल्या संलेखांच्या बाबतीत, नोंदणी अभिलेखातून घेण्यात येणारा अशा संलेखातील उतारा हा, नोंदणीसाठी सादर करण्यात आलेल्या संलेखासोबत जोडलेली सत्य प्रत आहे, असे पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल. १९८५ चा महाराष्ट्र २७.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १८(अ) द्वारे "(रक्कम नमूद करून)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १८(ब) द्वारे "या कलमाखाली" या मजकुरापूर्वी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १९ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम **३२-अ** हे दिनांक ४ जुलै, १९८० पासून दाखल करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल.

[१][ (२) नोंदणीकरिता असा संलेख प्राप्त झालेल्या कोणत्याही नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यास, यासंदर्भात त्याला उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे, अशा संलेखांची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे बाजारमूल्य हे त्यामध्ये खरेपणाने मांडण्यात आलेले नाही, असे सकारण वाटत असेल तर, तो अधिकारी, असा संलेख त्याला प्राप्त झाल्यावर लगेच, अशा मालमत्तेचे खरे बाजार मूल्य निर्धारित करण्यासाठी तो संलेख जिल्हाधिकाऱ्याकडे निर्देशित करील :

परंतु, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी नोंदणीकरिता सादर केलेल्या संलेखाबाबत, उक्त संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे खरे बाजारमूल्य हे त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात आलेले नाही. असे नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे मत असेल अशा बाबतीत, त्या नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याने, मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ अन्वये निर्धारित केलेल्या, स्थावर मालमत्तेच्या दरांच्या वार्षिक विवरणपत्रानुसार अशा मालमत्तेच्या खऱ्या बाजार मूल्याची पडताळणी करणे, आणि जी व्यक्ती, कलम ३० अन्वये मुद्रांक शुल्क भरण्यास दायी असेल अशा व्यक्तीवर, अशा संलेखाच्या निष्पादनाच्या दिनांकापासून प्रत्येक महिन्यासाठी अथवा त्याच्या भागासाठी मुद्रांक शुल्काची तुटीची रक्कम आणि मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या रकमेच्या भागाच्या २ टक्के या दराने शास्तीची रक्कम भरण्याचे फर्माविणारी नोटीस बजावणे कायदेशीर असेल : १९९७ चा महाराष्ट्र १९.

परंतु, आणखी असे की, अशी नोटीस मिळाल्यावर, मुद्रांक शुल्काची तुटीची रक्कम आणि शास्ती भरण्यास दायी असलेल्या व्यक्तीने, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, मुद्रांक शुल्काची तुटीची रक्कम, आणि तसेच दोनशे पन्नास रुपये एवढी शास्तीची निश्चित रक्कम भरली असेल तर, ती व्यक्ती, पहिल्या परंतुकामध्ये तरतदू केल्याप्रमाणे २ टक्के या दराने शास्ती भरण्यास दायी असणार नाही; आणि जिल्हाधिकाऱ्याकडे अगोदरच पाठविलेले निर्देश रद्द होतील :

परंतु, तसेच, कोणत्याही बाबतीत, या परंतुकान्वये आकारावयाची शास्तीची रक्कम ही, मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाही. ]

(३) ज्या व्यक्तीपुढे कोणताही असा संलेख सादर करण्यात येईल किंवा जिच्या कामकाजाच्या ओघात तो येईल अशा, कलम ३३ मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे बाजारमूल्य हे त्यामध्ये खरेपणाने मांडण्यात आलेले नाही असे सकारण वाटत असेल तर, तिला, अशा संलेखासंबंधीचे आपले काम पार पाडल्यानंतर, अशा मालमत्तेचे खरे बाजारमूल्य व संलेखावर देय असणारे योग्य शुल्क निर्धारित करण्यासाठी अशा संलेखाच्या एका सत्य प्रतीसह तो संलेख जिल्हाधिकाऱ्याकडे निर्देशि करता येईल :

---

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ४ द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[१][ परंतु, ज्या व्यक्तीपुढे कोणताही असा संलेख सादर करण्यात येईल किंवा जिच्या कामकाजाच्या ओघात तो तिच्यापुढे येईल अशी व्यक्ती ही कलम २ च्या खंड (फ) अन्वये जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त केलेला अधिकारी असेल आणि तिला, अशा संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे बाजार मूल्य, हे, त्यामध्ये खरेपणाने मांडण्यात आलेले नाही असे सकारण वाटत असेल तर, ती मुद्रांक शुल्क निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी, मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ यामध्ये विहित करण्यात आलेल्या रीतीने अशा मालमत्तेचे खरे बाजारमूल्य ठरवील. ]

(४) पोट-कलम (२) किंवा (३) खाली, यथास्थिति, तो संलेख किंवा संलेखाची सत्यप्रत प्राप्त झाल्यानंतर, त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आणि त्या संबंधात राज्य शासनाने केलेल्या नियमांस अनुसरून, संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे खरे बाजार मूल्य व त्यावर देय असलेले योग्य शुल्क निर्धारित करील. ते असे निर्धारित केल्यांनतर, त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, शुल्क भरण्यास पात्र असणाऱ्या पक्षकारास, या पोट-कलमाखाली निर्धारित केलेली शुल्काची रक्कम आणि त्याने अगोदरच भरलेली शुल्काची रक्कम यातील फरक भरून काढण्यास फर्मावील व तसेच, अशा पक्षकारास त्याच्या भरीला, [२][ संलेखाच्या निष्पादनाच्या दिनांकापासून मुद्रांक शुल्काच्या फरकाच्या रकमेवर [३][ प्रत्येक महिन्याला किंवा त्याच्या भागासाठी २ टक्के ] एवढी शास्तीची रक्कम भरण्यास फर्मावील ]; आणि अशी रक्कम भरण्यात आल्यावर पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये प्राप्त झालेला संलेख, त्यामध्ये निर्देशिलेल्या अधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे परत करण्यात येईल :

परंतु, संलेखात मांडण्यात आलेली बाजारमूल्याची रक्कम आणि जिल्हाधिकाऱ्याने निर्धारित केलेली बाजारमूल्याची रक्कम यांच्यातील फरक, जिल्हाधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या बाजारमूल्याच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक होत नसेल तर, या पोट-कलमाअन्वये अशा कोणत्याही पक्षकारास, फरक भरून काढण्यासाठी किंवा शास्ती देण्यासाठी कोणतीही रक्कम देण्यास फर्माविले जाणार नाही :

[४][ परंतु, आणखी असे की, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९६ याच्या प्रारंभापूर्वी, संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर १९९७ चा महा. ९.
मालमत्तेचे खरे बाजारमूल्य निर्धारित करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित असणाऱ्या निर्देशांच्या बाबतीत, कलम ३० खाली मुद्रांक शुल्क भरण्यास दायी असलेली व्यक्ती ही, तिने तिला जिल्हाधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत मुद्रांक शुल्क आणि शास्ती भरल्यास रुपये २५० पेक्षा अधिक रकमेची शास्ती भरण्यास दायी नसेल.]

[५][परंतु, तसेच कोणत्याही परिस्थितीत, अशी शास्तीची रक्कम मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाही. ]

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३(ब) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ९(ब)(एक) द्वारे "दिनांक १ मार्च, १९९०" या मजुकाराने सुरू होणाऱ्या आणि "भरण्यास फर्मावील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३(क) द्वारे "दर वर्षाला किंवा त्याच्या भागाला १५ टक्के" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ९(ब) (दोन) द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[५] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ३(ख) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(५) त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास स्वतः होऊन किंवा कोठून तरी माहिती मिळाल्यावरून पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही संलेखाच्या (ज्यावर कलम ३२ अन्वये पृष्ठांकन करण्यात आलेले आहे किंवा ज्याच्या बाबतीत पोट-कलम (४) अन्वये त्याने योग्य शुल्क निर्धारित केलेले आहे किंवा जो ४ जुलै, १९८० पूर्वी निष्पादित करून देण्यात आलेला आहे असा संलेख नव्हे) नोंदणीच्या दिनांकापासून [१][ दहा वर्षात ] नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याकडून संलेखाची सत्य प्रत किंवा त्याचा गोषवारा मागविता येईल आणि अशा संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या अचूकतेविषयी व त्यावर देय असलेल्या शुल्काविषयी स्वतःची खात्री करून घेणाच्या प्रयोजनास्तव त्याची तपासणी करता येईल, आणि जर अशा तपासणीनंतर, अशा मालमत्तेची बाजार मूल्य संलेखात खरेपणाने व पूर्णपणे मांडण्यात आलेले नाही असे त्याला सकारण वाटत असेल तर तर, तो, पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करील.

[२][ (६) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने किंवा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, या कलमाअन्वये जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याला मिळालेला कोणताही निर्देश हा, मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ याच्या अनुसार निकालात काढण्यासाठी कोणत्याही अन्य अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करणे विधिसंमत असेल. ]

अपील. [३][ **३२-ब.** (१) कलम ३१, पोट-कलम (३) अन्वये किंवा कलम ३२ अन्वये बाजारमूल्य ठरविणाऱ्या कोणत्याही आदेशामुळे किंवा कलम ३२ **क** अन्वये कोणतीही शास्ती लादणाऱ्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, (राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा, तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या फीसह ; आणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी फीचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील) लेखी अर्जाद्वारे अशा आदेशाविरुद्ध उप नोंदणी महानिरीक्षक आणि उप मुद्रांक नियंत्रक, यांच्याकडे अपील दाखल करता येईल आणि तो त्यावर विचार केल्यानंतर त्याबाबतीत त्यास न्याय व योग्य वाटेल असा आदेश देईल ; आणि अशा प्रकारे देण्यात आलेला आदेश हा, कलम ३२ **क** च्या तरतुदींच्या अधीन राहून, अंतिम असेल आणि तो आदेश कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर प्रश्नास्पद करता येणार नाही ;

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३(ड) द्वारे " आठ वर्षात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३(ई) द्वारे मूळ पोट-कलम (६) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ३ द्वारे मूळ कलम ३२-ख ऐवजी ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

परंतु, मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, १९८९ (यापुढे, या कलमात ज्याचा निर्देश "सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, सुधारणा अधिनियम अंमलात येण्याच्या लगतपूर्वी कलम **३२ ब** ज्या स्वरूपात अस्तित्वात होते त्या स्वरूपात त्या कलमान्वये निर्णयासाठी न्यायालयांकडे निर्देशित करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे करण्यात आलेले व त्याच्याकडे प्रलंबित असलेले सर्व अर्ज, सुधारणा अधिनियम अंमलात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडून उपनोंदणी महानिरीक्षक आणि उप मुद्रांक नियंत्रक यांच्याकडे हस्तांतरित करण्यात येतील व हस्तांतरित करण्यात आलेले असे अर्ज, उप नोंदणी महानिरीक्षक आणि उप मुद्रांक नियंत्रक यांच्याकडे दाखल करण्यात आलेली व प्रलंबित असलेली अपिले असल्याचे मानण्यात येईल ; आणि तो, या कलमानुसार तो निकालात काढील : १९८९ चा महाराष्ट्र १८.

परंतु, आणखी असे की, पोट-कलम (१) मध्ये आणि पहिल्या परंतुकात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींचा, सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी जिल्हाधिकाऱ्याकडून अगोदरच न्यायालयांकडे पाठविण्यात आलेल्या आणि न्यायालयांकडे प्रलंबित असलेल्या निर्देशांच्या बाबतीत परिणाम होणार नाही ; आणि जणू काही सुधारणा अधिनियम मंजूर करण्यात आलेला नाही असे मानून संबंधित न्यायालयांकडून ते निकालात काढण्यात येतील.

(२) उप नोंदणी महानिरीक्षक आणि उप मुद्रांक नियंत्रक याने पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशाविरुद्ध पुनरीक्षणासाठी कोणतेही अपील व कोणताही अर्ज दाखल करता येणार नाही.

पुनरीक्षण **३२-क.** कलम **३२-ब** च्या तरतुदींच्या आणि राज्य शासनाकडून याबाबतीत तयार करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीन राहून, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, स्वाधिकारे, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांन्वये, कोणत्याही अधिकाऱ्याकडून काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा (अपिलामध्ये काढण्यात आलेल्या आदेशासह) अभिलेख मागवू शकेल आणि त्याची तपासणी करू शकेल आणि त्यावर, त्याला न्याय्य य योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल ; आणि असा काढलेला आदेश अंतिम असेल आणि तो आदेश, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे प्रश्नास्पद करता येणार नाही :

परंतु पुनरीक्षण करावयाचा आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून या कलमान्वये अभिलेख मागविण्यासंबंधीची कोणतीही नोटीस बजविण्यात येणार नाही अशा दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याखाली उक्त प्राधिकाऱ्याकडून पुनरीक्षणाचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, अशा व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होईल असा कोणताही आदेश या कलमान्वये काढण्यात येणार नाही. ]

## प्रकरण चार

## रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख

**संलेखाची तपासणी करणे व ते अवरुद्ध करून ठेवणे.**

**३३.** (१) [१][ कलम **३२-अ** च्या तरतुदींच्या अधीन राहून, ] कायद्याने किंवा पक्षकारांच्या संमतीने पुरावा घेण्याचा प्राधिकार असलेली प्रत्येक व्यक्ती आणि पोलीस अधिकाऱ्यांखेरीज [२][ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली अपराधांचा तपास करण्यासाठी कायद्याने अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणताही अन्य अधिकाऱ्याखेरीज ] लोक कार्यपदाचा प्रभार असलेली प्रत्येक व्यक्ती, तिच्या मते शुल्क आकारण्यास पात्र असणारा कोणताही संलेख तिच्यासमोर सादर करण्यात येईल किंवा तिच्या कामकाजाच्या ओघात तो तिच्यापुढे येईल तेव्हा, जर तो संलेख रीतसर मुद्रांकित झाला नसल्याचे तिला दिसून आले तर, [३][ तो संलेख, कायद्यानुसार विधिग्राह्य आहे की नाही हे लक्षात न घेता ] अवरुद्ध करून ठेवील.

(२) त्या प्रयोजनासाठी अशी प्रत्येक व्यक्ती, याप्रमाणे शुल्क आकारण्यास पात्र असलेल्या व अशा रीतीने सादर करण्यात आलेल्या किंवा तिच्यासमोर आलेल्या प्रत्येक संलेखाची, तो जेव्हा निष्पादित करून देण्यात आला किंवा प्रथम निष्पादित करून देण्यात आला त्यावेळी राज्यात अंमलात असलेल्या कायद्यान्वये आवश्यक असणाऱ्या मूल्याचा व वर्णनाचा मुद्रांक त्यावर लावलेला आहे किंवा कसे याची खातरजमा करून घेण्यासाठी तपासणी करील :

परंतु,–

(अ) कोणत्याही दंडाधिकाऱ्याला किंवा फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाला [४][ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहाचा भाग (घ) ] खालील कार्यवाहीखेरीज अन्य कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात त्याच्यापुढे येणाऱ्या काणेत्याही संलेखाची तपासणी करणे किंवा तो अवरुद्ध करून ठेवणे योग्य वाटत नसेल तर, त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे ते आवश्यक आहे असे मानले जाणार नाही ; १९७४ चा २.

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ८ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २०(अ) (एक) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २०(अ) (दोन) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २०(ब) द्वारे " फौजदारी व्यवहार संहिता, १८९८ याचे प्रकरण १२ किंवा ३६ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) एखाद्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या बाबतीत, या कलमाखाली कोणत्याही संलेखाची तपासणी करण्याचे व तो अवरुद्ध करून ठेवण्याचे काम, ते न्यायालय याबाबतीत नेमील अशा अधिकाऱ्याकडे सोपविता येईल ;

(३) या कलमाच्या प्रयोजनांकरिता, शंकास्पद बाबतीत,—

(अ) कोणती कार्यपदे ही लोक कार्यपदे असल्याचे मानण्यात यावे हे, राज्य शासनाला निर्धारित करता येईल ; आणि

(ब) कोणत्या व्यक्ती लोक कार्यपदाच्या प्रभारी व्यक्ती असल्याचे मानण्यात यावे हे, राज्य शासनाला निर्धारित करता येईल.

**नोंदणी झाल्यानंतर संलेख अवरुद्ध करून ठेवणे.**

[१][ **३३-अ.** रीतसर मुद्रांकित न केलेला कोणताही संलेख चुकीने किंवा अन्य कारणाने, नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला असेल तर, नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याला पक्षकाराकडून मूळ संलेख मागवून घेता येईल व पक्षकारास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि कारणे लेखी नमूद करून त्याची एक प्रत पक्षकारास देऊन, तो अवरुद्ध करून ठेवता येईल. पक्षकाराने असा मूळ संलेख सादर न केल्यास, नोंदणी अभिलेखातून घेण्यात आलेली अशा संलेखाची सत्य प्रत ही. या कलमाच्या प्रयोजनार्थ संलेखाची मूळ प्रत असल्याचे मानण्यात येईल. ] १९०८ चा १६.

**रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख हे, पुराव्यात अस्वीकार्य असणे, इत्यादी.**

**३४.** शुल्क आकारण्यास पात्र असा [२][ * * * ] कोणताही संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नसेल [३][ किंवा जर तो संलेख उमट मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहिलेला असला तरी [४][असा मुद्रांकित कागद संलेखाच्या पक्षकारांपैकी एका पक्षकाराच्या नावे खरेदी करण्यात आलेला नसेल ] ] तर, कायद्याने किंवा पक्षकाराच्या संमतीने पुरावा स्वीकारण्याचा प्राधिकार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रयोजनाकरिता तो पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही किंवा अशा कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही लोक कार्यपदाधिकाऱ्याला त्याच्या आधारे कोणतीही कार्यवाही करता येणार नाही किंवा त्याची नोंदणी करता येणार नाही किंवा तो अधिप्रमाणित करता येणार नाही :

परंतु, [५][ (अ) असा कोणताही संलेख,—

(एक) त्याच्यावर आकारणीपात्र असे शुल्क भरल्यानंतर, किंवा अपुरे मुद्रांक लावलेल्या संलेखाच्या बाबतीत, असे शुल्क भरून काढण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम भरल्यानंतर ; आणि

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २१ द्वारे कलम **३३-अ** समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २(१) द्वारे "(कलम ३२-अ, पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेला कोणताही संलेख नसेल असा)" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १० द्वारे " व निष्पादक " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि "व्यक्ती असेल" या शब्दांनी संपणाऱ्या या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २२(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी खंड (अ) दाखल करण्यात आला.

[१][ (दोन) अशा संलेखाने निष्पादन केल्याच्या दिनांकापासून प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाच्या २ टक्के दराने शास्ती भरल्यानंतर :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत, अशी शास्तीची रक्कम मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाही ; ]

सर्व योग्य अपवादांच्या अधीन राहून, पुराव्यात स्वीकारला जाईल. ]

(ब) जेव्हा कोणत्याही प्रकारची संविदा किंवा करार दोन किंवा अधिक पत्रांचा समावेश असलेल्या पत्रव्यवहाराद्वारे झाला असेल आणि त्या पत्रांपैकी कोणत्याही एका पत्रावर योग्य मुद्रांक लावलेला असेल तेव्हा, ती संविदा किंवा तो करार रीतसर मुद्रांकित असल्याची मानण्यात येईल ;

(क) यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे [२][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे १९७४ चा २. प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहाचा भाग (घ) ] याखालील कार्यवाहीतून अन्य, फौजदारी न्यायालयातील इतर कोणत्याही कार्यवाहीत कोणताही संलेख पुराव्यात स्वीकारला जाण्यास प्रतिबंध होणार नाही ;

(ड) यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे, जेव्हा एखादा संलेख सरकारने किंवा सरकारच्यावतीने निष्पादित केलेला असेल किंवा अशा संलेखाला या अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये किंवा इतर कोणत्याही तरतुदींद्वारे तरतूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र लावलेले असेल तेव्हा, असा संलेख कोणत्याही न्यायालयात स्वीकारला जाण्यास प्रतिबंध होणार नाही ;

३[ (ई) खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेले मुद्रांक शुल्क किंवा मुद्रांक शुल्काचा तुटीचा भाग आणि शास्ती भरण्यात आली तर, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे, कोणत्याही संलेखाची प्रत स्वीकारली जाण्यास किंवा कोणत्याही संलेखातील मजकूर तोंडी स्वरूपात स्वीकारला जाण्यास प्रतिबंध होणार नाही. ]

**संलेखाचा स्वीकार केव्हा प्रश्नास्पद करता येणार नाही.**

**३५.** एखादा संलेख पुराव्यात स्वीकारण्यात आला असेल तेव्हा, कलम ५८ मध्ये तरतूद केली असेल तेवढी सोडून एरव्ही, अशी स्वीकृती, तो संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नाही या कारणास्तव त्याच दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर प्रश्नास्पद केली जाणार नाही.

**अयोग्यरीत्या मुद्रांकित केलेले संलेख स्वीकृत करणे.**

**३६.** जेव्हा एखाद्या संलेखावर, पुरेशा रकमेचा पण अयोग्य वर्णनाचा मुद्रांक लावलेला असेल तेव्हा, त्या संलेखाचे आकारणीपात्र असे शुल्क भरल्यावर तो रीतसर मुद्रांकित असल्याचे प्रमाणित करण्यात येईल आणि याप्रमाणे प्रमाणित केलेला कोणताही संलेख, त्यानंतर निष्पादनाच्या दिनांकापासून रीतसर मुद्रांकित झाला असल्याचे मानण्यात येईल, अशी तरतूद करणारे नियम राज्य शासनास करता येतील.

---

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २२(ब) द्वारे " फौजदारी व्यवहार संहिता, १८९८ चे प्रकरण १२ किंवा प्रकरण ३६ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २२ (क) द्वारे खंड (ई) जादा दाखल करण्यात आला.

**अवरुद्ध करून ठेवलेल्या संलेखाच्या संबंधात कशाप्रकारे कार्यवाही करावी.**

**३७.** (१) जेव्हा कलम ३३ खाली संलेख अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीस कायद्याने किंवा पक्षकारांच्या संमतीने पुरावा स्वीकारण्याचा प्राधिकार असेल आणि ती व्यक्ती, कलम ३४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शास्ती किंवा कलम ३६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शुल्क भरण्यात आल्यावर असा संलेख पुराव्यात स्वीकारील तेव्हा, त्या संलेखाची अधिप्रमाणित प्रत व त्याबरोबर त्या संलेखासंबंधात बसवलेल्या शुल्काची व शास्तीची रक्कम नमूद करणारे एक लेखी प्रमाणपत्र ती जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि अशी रक्कम जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा तो याबाबतीत नेमील अशा व्यक्तीकडे पाठवील.

१ [ (२) अन्य प्रत्येक प्रकरणी, अशाप्रकारे मूळ संलेख अवरुद्ध करून ठेवणारी व्यक्ती, अशा संलेखाची एक अधिप्रमाणित प्रत तयार करील आणि तो संलेख कलम ३१ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली सत्य प्रति किंवा गोषवारा असेल किंवा कलम **३३-अ** मध्ये निर्दिष्ट केलेली सत्य प्रत असेल त्या बाबतीत, ती व्यक्ती अशी अधिप्रमाणित प्रत किंवा सत्य प्रत यांवर किंवा यथास्थिति, त्या गोषवाऱ्यावर, जणू काही तो मूळ संलेख असावा त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या आणि कलम ३९, पोट-कलम (१), खंड (अ) खाली किंवा यथास्थिति, कलम ४१, पोट-कलम (१) खालील संलेखाच्या संदर्भातील त्यावर प्रमाणपत्र पृष्ठांकित करण्याच्या प्रयोजनासाठी, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील. अधिप्रमाणित प्रत, सत्य किंवा यथास्थिति, गोषवारा, त्यावर उपरोक्तप्रमाणे प्रमाणपत्र पृष्ठांकित करून मिळाल्यावर मूळ संलेख जिने अवरुद्ध करून ठेवलेला असेल ती व्यक्ती, अधिप्रमाणित प्रतीवरील पृष्ठांकित केलेल्या प्रमाणपत्रावर मूळ संलेखाची नक्कल करून घेईल आणि असे प्रमाणपत्र अधिप्रमाणित करील; आणि सत्य प्रतीवर किंवा गोषवाऱ्यावर उपरोक्तप्रमाणे प्रमाणपत्र पृष्ठांकित करण्यात आलेले असेल त्याबाबतीत, ज्याने सत्य प्रत किंवा गोषवारा अग्रेषित केला होता तो नोंदणी करणारा अधिकारी, त्याने ठेवलेल्या संबंधित नोंदवहीत तो संलेख ज्या संलेखाची सत्य प्रत किंवा गोषवारा असेल त्या संलेखाच्या संबंधात, योग्य त्या नोंदी करील आणि त्याबाबतीत अर्ज करण्यात आल्यावर तो, त्या संलेखाच्या संबंधात उचित शुल्क किंवा यथास्थिति उचित शुल्क व शास्ती (प्रत्येकाची रक्कम नमूद करून) बसविण्यात आलेली आहे अशा अर्थाचे आपल्या सहीचे एक प्रमाणपत्र देईल आणि असे शुल्क व शास्ती भरणाऱ्या व्यक्तीचे नाव व राहण्याचे ठिकाण नमूद करील.]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २३ द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

**कलम ३७, पोट-कलम (१) खाली दिलेली शास्तीची रक्कम परत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.**

**३८.** (१) जेव्हा एखाद्या संलेखाची प्रत कलम ३७, पोट-कलम (१) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविली असेल तेव्हा, तो, त्यास योग्य वाटेल तर, अशा संलेखाबद्दल भरलेल्या पाच रुपयांहून अधिक शास्तीचा कोणताही भाग परत करू शकेल.

(२) जेव्हा असा संलेख, केवळ तो कलम १३ किंवा कलम १४ याचे उल्लंघन करून लिहिण्यात आलेला आहे एवढ्याच कारणासाठी अवरुद्ध करून ठेवलेला असेल तेव्हा, जिल्हाधिकारी, त्याप्रमाणे भरलेली संपूर्ण शास्तीची रक्कम परत करू शकेल.

**अवरुद्ध करून ठेवलेले संलेख मुद्रांकित करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.**

**३९.** (१) जेव्हा जिल्हाधिकारी, वीस नवे पैसे किंवा त्याहून कमी शुल्क आकारण्यास पात्र असलेला संलेख नसेल असा अन्य कोणताही संलेख कलम ३३ खाली अवरुद्ध करून ठेवील किंवा कलम ३७, पोट-कलम (२) खाली त्याच्याकडे पाठविलेला तसा कोणताही संलेख स्वीकारील तेव्हा, तो खालील कार्यपद्धती अवलंब करील :—

(क) असा संलेख रीतसर मुद्रांकित केलेला आहे किंवा तो शुल्क आकारण्यास पात्र नाही असे त्याचे मत असेल तर, तो संलेख रीतसर मुद्रांकित आहे किंवा यथास्थिती तो शुल्क आकारण्यास पात्र नाही, असे तो त्यावर पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील ;

(ख) जर असा संलेख शुल्क आकारणीस पात्र आहे व तो रीतसर मुद्रांकित नाही, असे त्याचे मत असेल तर, तो योग्य शुल्क किंवा ते शुल्क पूर्ण भरण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम [१][कमीत कमी शंभर रुपये इतकी शास्ती देण्याच्या अधीन राहून, संलेखाच्या निष्पादनाच्या दिनांकापासून [२][प्रत्येक महिन्याला किंवा त्याच्या भागाला मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाच्या २ टक्के रकमेएवढ्या [शास्तीसह] भरण्यास फर्मावील:

[३][परंतु, कोणत्याही परिस्थितीत, अशी शास्तीची रक्कम मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाही :]

[४][परंतु आणखी असे की,] जेव्हा असा संलेख केवळ तो कलम १३ किंवा कलम १४ चे उल्लंघन करून लिहिण्यात आलेला आहे, एवढ्याच कारणासाठी अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल तेव्हा, जिल्हाधिकारी, त्यास योग्य वाटेल तर, या कलमाद्वारे विहित केलेली संपूर्ण शास्ती माफ करू शकेल.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ११ द्वारे " पाच रुपयांच्या शास्तीसह " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि कमी होत असो या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४ द्वारे " प्रत्येक वर्षाला " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि " टक्के रकमेच्या " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५(एक) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५(दोन) " परंतु " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) [१][कलम ५३-अ च्या तरतुदींच्या अधीन राहून] पोट-कलम (१), खंड (अ) खालील प्रत्येक प्रमाणपत्र हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता त्यात नमूद केलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा असेल.

(३) एखाद्या संलेख, कलम ३७ पोट-कलम (२) अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात आला असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकारी, या कलमाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे त्यावर कार्यवाही केल्यावर तो संलेख अवरुद्ध करून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याकडे परत पाठवील.

**अभावितपणे रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख.**

**४०.** वीस नवे पैसे किंवा त्याहून कमी शुल्क आकारण्यास पात्र असलेला संलेख नसेल असा अन्य कोणताही संलेख जर शुल्क आकारणीस पात्र असेल व तो रीतसर मुद्रांकित केलेला नसेल आणि तो निष्पादित करून दिल्याच्या किंवा प्रथम निष्पादित करून दिल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत कोणत्याही व्यक्तीने, स्वतः होऊन जिल्हाधिकाऱ्याकडे सादर केला असेल आणि अशा व्यक्तीने, तो संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नाही ही वस्तुस्थिती जिल्हाधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिली असेल व योग्य शुल्क किंवा ते शुल्क पूर्ण भरण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम जिल्हाधिकाऱ्याकडे भरणा करण्यासाठी देऊ केली असेल आणि जर जिल्हाधिकाऱ्याची, तो संलेख अभावितपणे, चुकीमुळे किंवा अत्यंत निकडीमुळे रीतसर मुद्रांकित करण्याचा राहून गेला आहे, अशी खात्री पटली असेल तर, त्यास, कलम ३३ आणि कलम ३९ खाली कार्यवाही करण्याऐवजी अशी रक्कम स्वीकारून यापुढे विहित केल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**ज्या संलेखावर कलमे ३४, ३९ किंवा ४० यांखाली शुल्क भरलेले असेल त्यांवर पृष्ठांकन करणे.**

**४१.** (१) जेव्हा [२][(कलम **३२-अ** पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला कोणताही संलेख नसेल अशा)] एखाद्या संलेखाच्या बाबतीत बसविण्यायोग्य शुल्क व शास्ती (कोणतीही असल्यास) ही, कलम ३४, कलम ३९ किंवा कलम ४० खाली भरण्यात आली असेल तेव्हा, तो संलेख पुराव्यात स्वीकारणारी व्यक्ती किंवा यथास्थिति, जिल्हाधिकारी, त्यावर पृष्ठांकन करून, त्या संलेखाबाबत उचित शुल्क किंवा यथास्थिति, उचित शुल्क व शास्ती (प्रत्येकाची रक्कम नमूद करून) बसविण्यात आल्याचे प्रमाणित करील आणि ती भरणाऱ्या व्यक्तीचे नाव व राहण्याचे ठिकाण नमूद करील.

(२) [३][कलम **५३-अ** च्या तरतुदींच्या अधीन राहून,] याप्रमाणे पृष्ठांकित केलेला प्रत्येक संलेख त्यानंतर पुराव्यात स्वीकार्य असेल आणि तो जणू काही रीतसर मुद्रांकित करण्यात आलेला होता अशा रीतीने त्याची नोंदणी करता येईल व त्याच्या आधारे कार्यवाही करता येईल, तसेच तो अधिप्रमाणित करता येईल [४][आणि याबाबतीत अर्ज केल्यावर, जिने तो सादर केला असेल त्या व्यक्तीच्या किंवा तो ज्या व्यक्तीच्या ताब्यातून अवरुद्ध करून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याकडे आला असेल त्या व्यक्तीच्या किंवा अशा व्यक्तीने दिलेल्या निदेशानुसार अन्य कोणत्याही व्यक्तीच्या सुपुर्द करण्यात येईल :]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम १० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २५ (अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २५ (ब) द्वारे "आणि तो अडकून ठेवणाऱ्या" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "स्वाधीन करण्यात येईल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु,-

(अ) कलम ३४ खाली शुल्क आणि शास्ती भरल्यावर, जो पुराव्यात स्वीकारण्यात आला आहे असा कोणताही संलेख, अशा रीतीने अवरुद्ध करून ठेवल्याच्या दिनांकापासून एक महिना संपण्यापूर्वी किंवा जर तो आणखी अवरुद्ध करून ठेवणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केले असेल व ते प्रमाणपत्र त्याने रद्द केले नसेल तर, तो अशाप्रकारे सुपूर्द केला जाणार नाही ;

(ब) या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या अनुसूची एक मधील आदेश तेराच्या नियम ९ च्या तरतुदींस बाध येणार नाही. १९०८ चा ५.

**मुद्रांक कायद्याविरुद्धच्या अपराधाबद्दल खटला भरणे.**

**४२.** कोणत्याही संलेखाच्या बाबतीत या प्रकरणाखाली कार्यवाही करण्यामुळे किंवा शास्ती भरण्यामुळे, ज्या व्यक्तीने अशा संलेखाच्या संबंधात मुद्रांक कायद्याविरुद्ध एखादा अपराध केल्याचे आढळून येईल, त्या कोणत्याही व्यक्तीवर खटला भरण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु, ज्याबाबत शास्ती भरण्यात आली आहे, अशा कोणत्याही संलेखाच्या बाबतीत योग्य शुल्क भरण्याची टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने तो अपराध केला गेला आहे असे जिल्हाधिकाऱ्यास दिसून आल्याशिवाय अशा प्रकारचा कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

**शुल्क किंवा शास्ती भरणाऱ्या व्यक्तींना ती विवक्षित बाबतीत वसूल करता येईल.**

**४३.** (१) जेव्हा एखाद्या संलेखाच्या संबंधात एखाद्या व्यक्तीने कलम ३४, कलम ३६, कलम ३९ किंवा कलम ४० खाली कोणतेही शुल्क किंवा शास्ती भरलेली असेल आणि जेव्हा कराराद्वारे किंवा कलम ३० च्या तरतुदींखाली किंवा असा संलेख निष्पादित करून देतेवेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही अधिनियमितीअनुसार अन्य एखादी व्यक्ती अशा संलेखासाठी योग्य मुद्रांकाची तरतूद करण्याचा खर्च करण्यास बांधील असेल तेव्हा, प्रथम उल्लेखिलेल्या व्यक्तीला याप्रमाणे भरलेल्या शुल्काची किंवा शास्तीची रक्कम अशा अन्य व्यक्तीकडून वसूल करण्याचा हक्क असेल.

(२) अशी रक्कम वसूल करण्याच्या प्रयोजनाकरिता अशा संलेखाच्या संबंधात या अधिनियमाखाली देण्यात आलेले कोणतेही प्रमाणपत्र, त्यात प्रमाणित केलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा असेल.

(३) अशी रक्कम, न्यायालयास योग्य वाटल्यास, ज्या दाव्यात किंवा कार्यवाहीत अशा व्यक्ती पक्षकार असतील आणि त्यात असा संलेख पुराव्यात दिला असेल, अशा कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत झालेल्या खर्चाबाबतच्या कोणत्याही आदेशात समाविष्ट करता येईल. जर न्यायालयाने [१][कारणे लेखी नमूद करून अशा कारणांस्तव] ती रक्कम अशा आदेशात समाविष्ट केली नाही तर, ती रक्कम वसूल करण्यासाठी आणखी कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**विवक्षित बाबतीत शास्ती किंवा अधिक शुल्क परत करण्याचा महसूल प्राधिकाऱ्याचा अधिकार.**

**४४.** (१) जेव्हा कलम ३४ किंवा कलम ३९ खाली कोणतीही शास्ती भरलेली असेल तेव्हा, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, ती भरल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत लेखी अर्ज करण्यात आल्यावर, अशी शास्ती पूर्णतः किंवा अंशतः परत करू शकेल.

(२) जेव्हा कायद्याने आकारणीपात्र असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारण्यात आलेले असून ते कलम ३४ किंवा कलम ३९ खाली भरण्यात आले आहे, असे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, असा प्राधिकारी, संबंधित पक्षकाराने ते शुल्क आकारण्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून [१][एक वर्षाच्या] आत लेखी अर्ज केल्यावर, अधिक असेल तेवढे शुल्क परत करू शकेल.

**कलम ३७ खाली पाठवलेले संलेख गहाळ झाल्याबद्दल दायित्व नसणे.**

**४५.** (१) जर कलम ३७, पोट-कलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविलेला कोणताही संलेख, मध्येच गहाळ झाला नसेल, नष्ट झाला असेल किंवा खराब झाला असेल तर, तो संलेख गहाळ झाल्याबद्दल, नष्ट झाल्याबद्दल किंवा खराब झाल्याबद्दल असा संलेख पाठविणारी व्यक्ती उत्तरदायी असणार नाही.

(२) जेव्हा कोणताही संलेख याप्रमाणे पाठवला जाण्याच्या बेतात असेल तेव्हा, ज्या व्यक्तीच्या ताब्यातून तो अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीच्या हाती आला असेल, अशा प्रथम उल्लेखिलेल्या व्यक्तीला आपल्या खर्चाने, अशा संलेखाची प्रत तयार करण्यात यावी व तो अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीने ती अधिप्रमाणित करावी अशी मागणी करता येईल.

**शुल्के व शास्ती यांची वसुली.**

**४६.** [२][ (१) या [३][अधिनियमाखाली] भरावी लागणारी सर्व शुल्के, शास्ती व इतर रकमा, ज्या व्यक्तीकडून त्या देणे असतील त्या व्यक्तीच्या जंगम मालमत्तेवर टाच आणून व ती विकून किंवा जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, जिल्हाधिकाऱ्यास वसूल करता येतील.

[४][ (२) जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे अशी वसुली करण्यासाठी,—

(अ) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याला, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आयुक्ताचे सर्व अधिकार असतील आणि तो त्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि सर्व कर्तव्यांचे पालन करील ; १९६६ चा ४१.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २७ द्वारे " तीन महिन्यांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ५ द्वारे कलम ४६ ला पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३५ द्वारे " प्रकरणाखाली " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ५ द्वारे पोट-कलम २ आणि पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

(ब) कलम २ च्या खंड (फ) अन्वये जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला, उक्त संहितेअन्वये जिल्हाधिकाऱ्याचे सर्व अधिकार असतील आणि तो त्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि सर्व कर्तव्यांचे पालन करील.

(३) पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली प्रत्येक नोटीस किंवा देण्यात आलेला आदेश, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, या अधिनियमान्वये काढण्यात आलेली नोटीस किंवा देण्यात आलेला आहे असे मानण्यात येईल.]

प्रकरण पाच

## विवक्षित प्रकरणांत मुद्रांकांबाबत सवलती देणे.

**खराब झालेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे.** **४७.** आवश्यक असणाऱ्या पुराव्याबाबत किंवा करावयाच्या चौकशीबाबत राज्य शासन करील अशा नियमांच्या अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास, कलम ४८ मध्ये विहित केलेल्या कालावधीच्या आत त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर व वस्तुस्थितीबद्दल त्याची खात्री पटल्यावर, यापुढे उल्लेखिलेल्या प्रकरणांमध्ये खराब झालेल्या उमट मुद्रांकांच्या बाबतीत सवलत देता येईल :—

(अ) कोणत्याही कागदावर लिहिलेला कोणताही संलेख कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून देण्यापूर्वी, अशा कागदावरील, अनवधानामुळे व अहेतुकपणे खराब झालेला, अस्पष्ट झालेला किंवा लेखप्रमादामुळा किंवा अन्यथा नियोजित प्रयोजनासाठी अयोग्य ठरलेला मुद्रांक ;

(ब) जो दस्तऐवज पूर्णतः किंवा अंशतः लिहिलेला आहे, परंतु तत्संबंधी कोणत्याही पक्षकाराने सही केलेली नाही किंवा जो निष्पादित करून दिलेला नाही, अशा कोणत्याही दस्तऐवजावरील मुद्रांक;

(क) जो संलेख तत्संबंधी कोणत्याही पक्षकाराने निष्पादित करून दिलेला असून, तो—

(१) सुरुवातीपासून कायद्याने सर्वथा शून्य असल्याचे [१][पक्षकाराला] नंतर आढळून आले असेल;

[२][(१-क) विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ याच्या कलम ३१ अन्वये सुरुवातीपासून सर्वथा शून्य असल्याचे, न्यायालयाला नंतर आढळून आले असेल;] १९६३ चा ४७.

(२) त्यामधील कोणत्याही त्रुटीमुळे किंवा चुकीमुळे मूळ नियोजित प्रयोजनांसाठी अयोग्य असल्याचे नंतर आढळून आले असेल;

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८ (अ) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ (अ) (दोन) द्वारे खंड (१-अ) समाविष्ट करण्यात आला.

(३) तो ज्या कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करणे आवश्यक आहे ती व्यक्ती, तो निष्पादित न करताच मरण पावल्यामुळे किंवा अशा कोणत्याही व्यक्तीने तो निष्पादित करण्यास नकार दिल्यामुळे प्रस्तावित स्वरूपात नियोजित व्यवहार घडवून आणण्याच्या दृष्टीने पूर्ण करता येत नसेल;

(४) एखाद्या महत्त्वाच्या पक्षकाराने निष्पादित न केल्यामुळे व त्यावर सही करण्यास ता असमर्थ असल्यामुळे किंवा नकार देत असल्यामुळे, नियोजित प्रयोजनासाठी तो वस्तुतः अपूर्ण व अपर्याप्त असेल;

(५) कोणत्याही व्यक्तीने त्यानुसार कृती करण्यास किंवा प्रतिभूत करावयाचा योजिलेला कोणताही पैसा देण्यास नकार दिल्यामुळे किंवा त्याद्वारे देण्यात आलेले कोणतेही पद नाकारल्यामुळे किंवा न स्वीकारल्यामुळे नियोजित प्रयोजन सर्वथा फसले असेल;

(६) त्याद्वारे जो व्यवहार घडवून आणण्याचे योजिले असेल तो व्यवहार त्याच पक्षकारांच्या दरम्यान झालेल्या व त्यापेक्षा कमी मूल्य नसलेला मुद्रांक लावलेल्या कोणत्याही अन्य संलेखाद्वारे घडवून आणल्यामुळे निरुपयोगी होत असेल;

(७) अपुऱ्या मूल्याच्या असेल आणि त्याद्वारे जो व्यवहार घडवून आणण्याचे योजिले असेल तो व्यवहार त्याच पक्षकारांच्या दरम्यान झालेल्या व त्यापेक्षा कमी मूल्य नसलेला एखादा मुद्रांक लावलेल्या कोणत्याही इतर संलेखाद्वारे घडवून आणला असेल;

(८) तो अनवधानाने आणि अहेतुकपणे खराब झाला असेल आणि त्याच्याऐवजी त्याच पक्षकारांच्या दरम्यान व त्याच प्रयोजनासाठी दुसरा संलेख रीतसर मुद्रांकित व निष्पादित करून दिलेला असेल;

त्या कोणत्याही संलेखासाठी वापरलेला मुद्रांक :

परंतु, [१][उप-खंड (१ अ) याखाली येणारा संलेख वगळता,] एखाद्या निष्पादित करून दिलेल्या संलेखाच्या बाबतीत, ज्या कार्यवाहीमध्ये तो संलेख पुराव्यात देता किंवा देऊ करता आला असता, अथवा दिला किंवा देऊ केला गेला असता अशी कोणतीही कायदेविषयक कार्यवाही सुरू करण्यात आलेली नसावी आणि तो संलेख रद्द करण्यासाठी दिला गेलेला असावा [२][किंवा रद्द करण्यासाठी अगोदर न्यायालयाकडे दिलेला असावा.]

**स्पष्टीकरण :—** संलेखावर जेवढे शुल्क आकारणपात्र असेल ते पूर्ण भरण्यात आल्याबद्दलचे कलम ३२ खालील जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र हे, या कलमाच्या अर्थांतर्गत उमट मुद्रांक असेल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८(ब)(एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ (ब) (दो) द्वारे " रद्द करण्यासाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कलम ४७ खाली सूटमोकळ मिळण्यासाठी अर्ज केव्हा करावयाचा.

**४८.** कलम ४७ खाली सूटमोकळ मिळण्यासाठी खाली दिलेल्या कालावधीत अर्ज करण्यात येईल :—

(१) खंड (क) (५) मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणांत, संलेखाच्या दिनांकापासून [१][सहा महिन्यांच्या] आत:

[२][परंतु, ज्या बाबतीत अनुसूची एकच्या अनुच्छेद २५ अन्वये, ज्यावर मुद्रांक शुल्क भरले आहे असा, स्थावर मालमत्तेच्या विक्रीचा करारनामा, नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदींअन्वये, नोंदणीकरिता सादर करण्यात आलेला असेल आणि विक्रत्याने, अशा करारनाम्याची विषयवस्तू असलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा सुपूर्द करण्यास नकार दिला असेल तर, संलेखाच्या दिनांकापासून दोन वर्षां आत अर्ज करता येईल;] [३][किंवा जागेच्या संबंधात वाद असल्यास, अपुरी वित्तव्यवस्था असल्यास, मान्य केलेल्या प्रतिफलाच्या शर्तींवरून वाद असल्यास, किंवा बेकायदेशीर बांधकाम केल्याचे नंतर आढळून आल्यास किंवा अन्य कोणतेही वस्तुस्थितीजन्य तथ्य दाबून ठेवल्यास या कारणांवरून असा करार नोंदणीकृत रद्द विलेखाद्वारे रद्द करण्यात आल्यास, अशा नोंदणीकृत रद्द विलेखाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत अर्ज करता येईल.

[४][ (२) ज्या संलेखाच्या बदली दुसरा संलेख निष्पादित करून देण्यात आलेला असेल, असा कोणताही संलेख अपरिहार्य परिस्थितीमुळे रद्द करण्यासाठी सोडून देता येत नसेल त्याबाबतीत, बदली संलेख निष्पादित करून दिल्याच्या दिनांकानंतर, सहा महिन्यांच्या आत;

(३) कोणत्याही अन्य बाबतीत, मुद्रांक खरेदी केल्याच्या दिनांकापासून [५][सहा महिन्यांच्या] आत.]

निगमांना पुढे आवश्यकता नसलेल्या छापील नमुन्यांच्या बाबतीत सवलत देणे.

**४९.** मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यास अधिकार प्रदान केला असेल तर, त्यास, कोणत्याही बँक व्यवसायीने किंवा कायद्याने संस्थापित अशा कोणत्याही कंपनीने किंवा इतर निगम निकायाने संलेखाच्या छापील नमुन्यांसाठी वापरलेल्या मुद्रांकित कागदांच्या बाबतीत, उक्त बँक व्यवसायीला, कंपनीला किंवा निगम निकायाला कोणत्याही पुरेशा कारणासाठी अशा नमुन्यांची आवश्यकता राहिलेली नसेल तर, सवलत देता येईल, याला कालमर्यादा नाही:

परंतु, अशा मुद्रांकित कागदांच्या बाबतीत शुल्क रीतसर भरले असल्याबद्दल अशा प्राधिकाऱ्याची खात्री पटली पाहिजे.

चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे.

**५०.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने, शुल्क आकारण्यास पात्र अशा कोणत्याही संलेखाकरिता या अधिनियमाखाली केलेल्या नियमांमध्ये अशा संलेखाकरिता विहित केले असेल त्या वर्णनाहून अन्य वर्णनाचा एखादा मुद्रांक किंवा आवश्यक असेल त्याहून अधिक मूल्याचा एखादा मुद्रांक अनवधानाने वापरला असेल किंवा कोणतेही शुल्क आकारण्यास पात्र नसलेल्या एखाद्या संलेखासाठी एखादा मुद्रांक अनवधानाने वापरला असेल तेव्हा; किंवा

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २९(अ) द्वारे " दोन महिन्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २ द्वारे हे परंतुक दाखल करण्यात आले.

[३] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २९(ब) द्वारे मूळ खंड (२), (३) आणि परंतुक याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ४ द्वारे " एका वर्षाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) जेव्हा एखाद्या संलेखासाठी वापरलेला मुद्रांक हा, अशा प्रकारचा संलेख, कलम १३ च्या तरतुदींचे उल्लंघन करून लिहिण्यात आल्याकारणाने कलम १५ खाली अनवधानाने निरुपयोगी झाला असेल तेव्हा ;

जिल्हाधिकाऱ्यास, जया संलेखाच्या दिनांकानंतर [१][ सहा महिन्यांच्या ] आत किंवा जर त्यावर दिनांक नसेल तर, ज्या व्यक्तीने तो प्रथमतः किंवा एकटीने निष्पादित करून दिला असेल त्या व्यक्तीने तो निष्पादित करून दिल्याच्या दिनांकानंतर [१][ सहा महिन्यांच्या ] आत अर्ज करण्यात आल्यावर आणि तो संलेख शुल्क आकारण्यास पात्र असल्यास, त्यावर योग्य शुल्काचे मुद्रांक पुन्हा लावल्यानंतर याप्रमाणे चुकीचा वापर केलेला किंवा निरुपयोगी झालेला मुद्रांक हा खराब झालेला मुद्रांक म्हणून रद्द करता येईल व त्याबाबत सवलत देता येईल.

**खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत कशी द्यावयाची.**

[२][ **५१.** खराब झालेल्या मुद्रांकांच्या संबंधात कलम ४७ खाली किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांच्या संबंधात कलम ५० खाली किंवा पुढे आवश्यकता नसलेल्या छापील नमुन्यांच्या संबंधात कलम ४९ खाली सवलत द्यावयाची असेल अशा कोणत्याही बाबतीत जिल्हाधिकारी, त्याऐवजी,—

(अ) मुद्रांकांच्या एकूण मूल्यातून [३][ राज्य शासनाकडून त्याबाबतीत तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी रक्कम ] वजा करून पैशाच्या स्वरूपात तितकेच मूल्य ; किंवा

(ब) अर्जदाराला तशी आवश्यकता असल्यास, त्याच वर्णानाचे व मूल्याचे अन्य मुद्रांक ; किंवा

(क) अर्जदाराला तशी आवश्यकता असल्यास, इतर कोणत्याही वर्णनाचे तेवढ्याच मूल्याचे मुद्रांक, देऊ शकेल :

परंतु, खंड (ब) आणि (क) च्या कक्षेत येणाऱ्या प्रकरणांत, राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल असा लेखनसाम्रगी खर्चही, खराब झालेले अथवा चुकीचा वापर केलेले जे मुद्रांकित कागद परत करण्यात आले असतील, त्यांच्या बाबतीत वसूल करण्यात येईल.]

**वापरासाठी न लागणाऱ्या मुद्रांकांबाबत सवलत देणे.**

**५२.** जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात जो खराब झालेला नाही किंवा नियोजित प्रयोजनाच्या दृष्टीने अयोग्य किंवा निरुपयोगी ठरलेला नाही असा किंवा असे मुद्रांक असतील, परंतु, त्याचा किंवा त्यांचा त्या व्यक्तीला लगेच वापर करावा लागणार नसेल तेव्हा, जिल्हाधिकारी हा, अशा व्यक्तीला, [४][ राज्य शासनाकडून त्याबाबतीत तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी रक्कम ] त्या मुद्रांकाच्या किंवा मुद्रांकांच्या एकूण मूल्यातून वजा करून अशा एक अथवा अधिक मुद्रांकांचे मूल्य पैशाच्या स्वरूपाने परत करील. मात्र, अशा व्यक्तीला असे मुद्रांक रद्द करण्याकरिता ते जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करावे लागतील आणि जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ५ द्वारे " एका वर्षाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३१ द्वारे मूळ कलम ५१ ऐवजी कलम ५१ दाखल करण्यात आले.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ६ द्वारे " दर रुपयामागे किंवा रुपयाच्या भागामागे दहा पैसे अथवा प्रत्येक मुद्रांकासाठी पंचवीस रुपये यांपैकी जी कमी असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७(१) द्वारे " दर रुपयामागे किंवा रुपयाच्या भागामागे दहा पैसे अथवा प्रत्येक मुद्रांकासाठी पंचवीस रुपये यांपैकी जी कमी असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

असे सिद्ध करावे लागेल की,—

(अ) अशा व्यक्तीने असा मुद्रांक किंवा असे मुद्रांक त्यांचा वापर करण्याच्या खऱ्याखुऱ्या उद्देशाने विकत घेतले होते ; आणि

(ब) तिने त्याची किंवा त्यांची पूर्ण रक्कम भरली आहे ; आणि

(क) ते ज्या दिनांकास याप्रमाणे सुपूर्द करण्यात आले होते त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या [१][ सहा महिन्यांच्या ] कालावधीच्या आत ते याप्रमाणे विकत घेण्यात आलेले होते :

परंतु, जेथे ती व्यक्ती लायसनधारक मुद्रांक विक्रेता असेल तेथे, जिल्हाधिकारी, त्याला योग्य वाटेल तर त्या मुद्रांक विक्रेत्या व्यक्तीने प्रत्यक्ष भरलेली रक्कम, तीमधून पूर्वोक्तप्रमाणे कोणतीही रक्कम वजा न करता परत करू शकेल.

**शुल्काबाबत सवलत देणे.**

[२][ **५२-अ.** कलमे ४७, ५०, ५१ आणि ५२ यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कलम १० च्या पोट-कलम (३) किंवा कलम **१०-अ** किंवा कलम **१०-ब** अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, मुद्रांकाद्वारे किंवा रोखीने शुल्क भरले असेल आणि भरण्यात आलेल्या शुल्काची रक्कम एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, संबंधित जिल्हाधिकारी, खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या किंवा वापरासाठी आवश्यक नसलेल्या मुद्रांकांच्या बाबतीत किंवा चलानांद्वारे भरलेल्या रोख रकमेच्या बाबतीत सवलत देणार नाही, मात्र तो, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, असा अर्ज त्यावरील आपल्या शेऱ्यासह,—

(क) मुंबई शहर जिल्ह्यात व मुंबई उपनगर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी हाताळलेल्या प्रकरणांबाबत असल्यास, अपर मुद्रांक नियंत्रक याच्याकडे पाठवील ; आणि

(ख) खंड (क) मध्ये नमूद केलेल्या जिल्हाधिकाऱ्यांव्यतिरिक्त, अन्य जिल्हाधिकाऱ्यांनी हाताळलेल्या प्रकरणाबाबत असल्यास, विभागाचा संबंधित नोंदणी उप महानिरीक्षक आणि मुद्रांक उप नियंत्रक यांच्याकडे पाठवील.

(२) अपर मुद्रांक नियंत्रक किंवा यथास्थिति, विभागाचा संबंधित नोंदणी उप महानिरीक्षक आणि मुद्रांक उप नियंत्रक, असा अर्ज मिळाल्यावर, त्यावर विचार करील आणि अशी सवलत द्यावी किंवा कसे याबाबत निर्णय घेईल आणि तद्नुसार, जर सवलतींची रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, ती सवलत देईल आणि ती दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, असा अर्ज, त्यावरील आपल्या शेऱ्यासह, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे निर्णयासाठी सादर करील.

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ७ (१) द्वारे " एका वर्षाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी कलम **५२-अ** समाविष्ट करण्यात आले.

(३) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, असा अर्ज मिळाल्यावर, अशी सवलत द्यावी किंवा कसे याबाबत योग्यतेनुसार निर्णय घेईल आणि त्यास न्याय्य व योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यावर आदेश देईल आणि तो आदेश अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणात हरकत घेता येणार नाही. ]

**मुद्रांक विधिअग्राह्य ठरविणे व व्यावृत्ती.**

[1][ **५२-ब.** कलमे ४७, ५०, ५१ आणि ५२ यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी,–

(क) जे कोणतेही मुद्रांक खरेदी करण्यात आले असतील परंतु वापरण्यात आले नसतील किंवा मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, १९८९ याच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश " प्रारंभाचा दिनांक " असा करण्यात आला आहे) लगतपूर्वीच्या दिवशी किंवा तत्पूर्वी ज्यांच्या संबंधात सवलत मागितली नसेल त्याबाबतीत, आणि असे मुद्रांक खरेदी केल्याच्या दिनांकापासून प्रारंभाच्या दिनांकापूर्वी सहा महिन्यांचा कालावधी लोटलेला नसेल तर, असे मुद्रांक, ते खरेदी केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी वापरता येतील किंवा या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदीअन्वये सवलत मागण्याकरिता सुपूर्द करता येतील ; आणि पूर्वोक्त कालावधीमध्ये अशा प्रकारे न वापरलेले किंवा सुपूर्द न केलेले मुद्रांक हे, विधिग्राह्य ठरतील. १९८९ चा महा. १८.

(ब) जे मुद्रांक प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर खरेदी करण्यात आले असतील परंतु वापरण्यात आले नसतील अथवा खरेदीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यांच्याबाबत सवलत मागितली नसेल असे कोणतेही मुद्रांक विधिग्राह्य ठरतील. ]

## प्रकरण सहा

## [2][ निर्देश, पुनरीक्षण आणि अपील ]

**मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याचे नियंत्रण व प्रकरणाचे कथन त्याच्याकडे पाठविणे.**

**५३.** (१) [3][ प्रकरण तीन ], प्रकरण चार व प्रकरण पाच याखाली व कलम २७ च्या [4][ दुसऱ्या परंतुकाच्या ] खंड (अ) अन्वये जिल्हाधिकाऱ्याला वापरता येण्यायोग्य असलेले असे अधिकार, सर्व प्रकरणांत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याच्या नियंत्रणाधीन असतील :

[5][ परंतु, या पोट-कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, कलम ३२ अ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या [6][ संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे वास्तविक बाजारमूल्य निर्धारित करणाऱ्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशाच्या संबंधात ] लागू होणार नाही. ]

---

[1] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ८ द्वारे कलम ५२-ब समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १२ द्वारे " निर्देश व पुनरीक्षण " या शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[3] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३४(अ)(एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३४ (अ) (दोन) द्वारे " पहिल्या परंतुकाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ११ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[6] सन ११९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १३(अ) द्वारे " कोणत्याही संलेखाच्या संबंधात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (१-अ) प्रकरण तीन, प्रकरण चार, प्रकरण पाच आणि कलम २७ च्या दुसऱ्या परंतुकाचा खंड (अ) याखाली जिल्हाधिकाऱ्याने काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, तीनशे रुपये फी भरून लेखी अर्जाद्वारे अशा आदेशाच्या विरुद्ध मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकेल, आणि तो, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्या प्रकरणाचा विचार करील आणि त्यावर त्याला योग्य आणि न्याय्य वाटेल असा आदेश देईल आणि अशा प्रकारे देण्यात आलेला आदेश अंतिम असेल. ]

(२) जर कलम ३१, कलम ३९ किंवा कलम ४० खाली कार्यवाही करणाऱ्या कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही संलेखावर आकारणीपात्र असलेल्या शुल्काच्या रकमेबाबत शंका असेल तर, त्यास, त्या प्रकरणाचे कथन तयार करता येईल व त्यावर आपले अभिप्राय देऊन ते मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे निर्णयाकरिता निर्देशित करता येईल.

(३) असा प्राधिकारी, [२][ पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ] त्या प्रकरणाचा विचार करून आपल्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवील आणि जिल्हाधिकारी अशा निर्णयानुरूप शुल्काचे (कोणतेही असल्यास) मूल्यनिर्धारण करण्याची व ते आकारण्याची कार्यवाही करील.

**कलमे ३२, ३९ व ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाचे पुनरीक्षण.**

[३][ **५३-अ.** (१) कलम ३२ चे पोट-कलम (३), कलम ३९ चे पोट-कलम (२) आणि कलम ४१ चे पोट-कलम (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जिल्हाधिकाऱ्याने चुकून किंवा अन्यथा कोणत्याही संलेखावर बसविण्यायोग्य शुल्कापेक्षा यथास्थिति कमी शुल्क आकारले असेल किंवा तो संलेख शुल्क आकारणीपात्र नाही असे त्याने ठरविले असेल तेव्हा, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यथास्थिति, कलमे ३२, ३९ किंवा ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या आत, संबंधित पक्षकारास तो संलेख सादर करण्यास फर्मावू शकेल आणि पक्षकाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या संलेखावर कोणतेही शुल्क आकारणीपात्र आहे किंवा नाही अथवा त्यावर बसवलेले कोणतेही शुल्क कमी आहे किंवा कसे याची तपासणी करू शकेल आणि कोणतेही कमी शुल्क आकारले गेले असल्यास अशी तुटीची रक्कम संबंधित पक्षकाराकडून वसूल करण्याचा आदेश देऊ शकेल. शुल्काची अशी तुटीची रक्कम देण्यात आल्यानंतर संलेखावर पृष्ठांकन करण्यात येईल.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १३(ब) द्वारे पोट-कलम (१अ) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३४(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३५ द्वारे कलम **५३-अ** समाविष्ट करण्यात आले.

(२) पक्षकाराने मूळ संलेख सादर करण्यात कसूर केल्यास, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी या कलमान्वये, कलम ३१ किंवा कलम ३७ याचे पोट-कलम (२) अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडे दाखल केलेल्या संलेखाच्या सत्य प्रतीच्या किंवा गोषवाऱ्याच्या आधारे कार्यवाही करील आणि अशी प्रत किंवा गोषवारा हा, या कलमाच्या प्रयोजनार्थ, मूळ संलेख असल्याचे मानण्यात येईल. ]

**मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने उच्च न्यायालयाकडे प्रकरणाचे कथन पाठविणे.**

**५४.** [१][ (१) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी,—

(क) कलम ५३ याच्या पोट-कलम (२) अन्वये त्याच्याकडे निर्देशित केलेल्या ;

(ख) कायदेविषयक सारभूत प्रश्न उपस्थित करून तो निर्देशित करण्यासाठी संबंधित पक्षकाराने प्राधिकाऱ्याच्या मते वाजवी असेल अशा कालावधीत त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून ; किंवा

(ग) अन्यथा त्याच्या निदर्शनास येईल अशा,—

कोणत्याही प्रकरणाचे कथन तयार करून व नेमक्या प्रश्नाची मांडणी करून त्यावरील आपल्या मतासह असे प्रकरण उच्च न्यायालयाकडे निर्देशित करू शकेल. ]

(२) उच्च न्यायालयाचे तीनपेक्षा कमी नाहीत इतके न्यायाधीश अशा प्रत्येक प्रकरणाचा निर्णय करतील आणि त्यांच्यात काही मतभेद झाल्यास त्याचा निर्णय बहुमतानुसार होईल.

**कथन केलेल्या प्रकरणासंबंधी अधिक तपशील मागवण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.**

**५५.** अशा प्रकरणात अंतर्भूत असलेली कथने ही, प्रकरणात उपस्थित झालेल्या प्रश्नांचा निर्णय करण्यास पुरेशी आहेत, याबद्दल उच्च न्यायालयाची खात्री पटली नाही तर, उच्च न्यायालयास त्या कथनाबाबत ते निदेश देईल अशी त्यात भर घालण्यासाठी किंवा असा फेरफार करण्यासाठी, ज्या महसूल प्राधिकाऱ्याकडून ते कथन निर्णयार्थ पाठविण्यात आले होते त्याच्याकडे, ते प्रकरण परत निर्देशित करता येईल.

**कथन केलेले प्रकरण निकालात काढण्याची कार्यपद्धती.**

**५६.** (१) उच्च न्यायालय, अशा कोणत्याही प्रकरणाची सुनावणी झाल्यावर, त्याद्वारे उपस्थित झालेल्या प्रश्नांचा निर्णय करील आणि असा निर्णय ज्या कारणांवर आधारलेला आहे ती कारणे अंतर्भूत करून त्यावर आपला न्यायनिर्णय देईल.

(२) उच्च न्यायालय, ज्या महसूल प्राधिकाऱ्याने त्या प्रकरणाचे कथन तयार केले असेल त्याच्याकडे अशा न्यायनिर्णयाची एक प्रत न्यायालयाच्या मुद्रेनिशी व प्रबंधकाच्या सहीनिशी पाठवील; आणि महसूल प्राधिकारी अशी प्रत मिळाल्यावर [२][ अशा न्यायनिर्णयानुरूप ते प्रकरण निकालात काढण्यासाठी आवश्यक असे आदेश देईल.]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३६ द्वारे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे " अशा न्यायनिर्णयानुरूप ते प्रकरण निकालात काढील " या मजकुरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**इतर न्यायालयांनी उच्च न्यायालयाकडे प्रकरणांचे कथन पाठविणे.**

**५७.** (१) उच्च न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयास, कलम ३४ च्या परंतुकाच्या खंड (अ) खाली कोणत्याही संलेखाच्या संबंधात भरावयाच्या शुल्काच्या रकमेबाबत शंका असेल तर, न्यायाधीशास त्या प्रकरणाचे कथन तयार करता येईल आणि त्यावर आपले अभिप्राय देऊन ते कथन उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी निर्देशित करता येईल.

(२) उच्च न्यायालय, त्या प्रकरणावर, जणू काही ते प्रकरण कलम ५४ खाली निर्देशिलेले प्रकरण असावे त्याप्रमाणे कार्यवाही करील व आपल्या न्यायनिर्णयाची एक प्रत न्यायालयाच्या मुद्रेनिशी व प्रबंधकाच्या सहीनिशी मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे पाठवील व तशीच दुसरी प्रत ते प्रकरण निर्देशित करणाऱ्या न्यायाधिशाकडे पाठवील व तो न्यायाधीश ती प्रत मिळाल्यावर अशा न्यायनिर्णयाबरहुकूम ते प्रकरण निकालात काढील.

(३) पोट-कलम (१) खाली केलेला निर्देश हा जेव्हा एखाद्या जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या एखाद्या न्यायालयाकडून केला गेला असेल, तेव्हा तो निर्देश जिल्हा न्यायालयामार्फत करण्यात येईल आणि जेव्हा तो निर्देश कोणत्याही दुय्यम महसूल न्यायालयाकडून केला गेला असेल तेव्हा, तो निकट वरिष्ठ न्यायालयामार्फत करण्यात येईल.

[१][ (४) कलम ५८ च्या तरतुदींस बाध येऊ न देता, कोणतेही न्यायालय पुढील बाबतीत या कलमाखाली कारवाई करणार नाही :—

(अ) एखादा संलेख पूर्वीच अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल किंवा कलम ३४ च्या परंतुकाच्या खंड (क) खाली त्यासंबंधात शास्ती बसविण्यात आली असेल त्याबाबतीत, किंवा

(ब) कलम ३५ च्या बाबतीत लागू होते त्या बाबतीत. ]

**मुद्रांकाच्या पुरेसेपणाच्या संबंधाने न्यायालयाच्या विवक्षित निर्णयांचे पुनरीक्षण.**

**५८.** (१) जेव्हा कोणतेही न्यायालय आपल्या दिवाणी किंवा महसूल अधिकारितेचा वापर करताना किंवा कोणतेही फौजदारी न्यायालय, [२][ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहाचा भाग-घ याखालील ] कोणत्याही कार्यावाहीत एखादा संलेख, तो रीतसर मुद्रांकित आहे म्हणून किंवा त्याला मुद्रांकाची जरुरी नाही म्हणून, किंवा कलम ३४ खाली शुल्क व शास्ती भरल्यावर पुराव्यात स्वीकारण्याबद्दल कोणताही आदेश देईल तेव्हा, ज्या न्यायालयात अपिले दाखल केली आहेत. किंवा त्याच्याकडून प्रकरणे निर्देशित केली आहेत अशा प्रथम उल्लेख केलेल्या न्यायालयास, स्वत: होऊन किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या अर्जावरून, असा आदेश विचारात घेता येईल. १९७४ चा २.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३८ द्वारे पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३९(अ) द्वारे “ फौजदारी व्यवहार संहिता, १८९८, प्रकरण १२ किंवा प्रकरण ३६ खालील ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अशा रीतीने विचार केल्यानंतर कलम ३४ खालील शुल्क व शास्ती भरल्याशिवाय किंवा भरलेल्या शुल्क व शास्तीपेक्षा अधिकतम शुल्क व शास्ती भरल्याशिवाय तो संलेख पुरावा म्हणून स्वीकारायला नको होता असे अशा न्यायालयाचे मत होईल तर, त्यास तशा अर्थाचे अधिकथन अभिलिखित करता येईल आणि अशा संलेखावर जे शुल्क आकारण्यास पात्र असेल त्या शुल्काची रक्कम निर्धारित करता येईल, [१][ आणि —

(एक) आपणाकडे किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे कलम ३४ खालील शास्तीच्या रकमेसह योग्य शुल्काची रक्कम किंवा ती रक्कम भरून काढण्यासाठी आवश्यक असेल तेवढी रक्कम किंवा दिलेल्या शुल्कापेक्षा अधिकतम शुल्क आणि शास्तीची रक्कम भरण्यास संबंधित पक्षकाराला किंवा व्यक्तीला फर्मावू शकेल, आणि

(दोन) त्यावेळी असा संलेख जिच्या ताब्यात किंवा अखत्यारीत असेल त्या कोणत्याही व्यक्तीला तो सादर करण्यास फर्मावू शकेल आणि तो सादर केल्यावर अवरुद्ध करून ठेवू शकेल. ]

(३) जेव्हा पोट-कलम (२) खाली कोणतेही अधिकथन अभिलिखित करण्यात आले असेल तेव्हा, ते अभिलिखित करणारे न्यायालय, त्याची एक प्रत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि ते ज्या संलेखासंबंधी असेल तो संलेख अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल किंवा अन्यथा अशा न्यायालयाच्या ताब्यात असेल तेव्हा, असा संलेखही त्याच्याकडे पाठवील.

[२][ (३-अ) पोट-कलम (३) अन्वये करण्यात आलेल्या अधिकथनानुसार कोणत्याही संलेखाच्या संबंधात बसविण्यायोग्य असलेले आणि त्याखाली भरणे आवश्यक असलेले शुल्क व शास्ती यांची रक्कम न्यायालयाकडे किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे भरण्यात आली असेल तेव्हा, यथास्थिति, न्यायालय किंवा जिल्हाधिकारी अशा संलेखाच्या बाबतीत, अशा शुल्काची व शास्तीची रक्कम व ती भरणाऱ्या व्यक्तीचे नाव व राहण्याचे ठिकाण नमूद करून, योग्य ते शुल्क व शास्ती भरण्यात आली असल्याचे पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील.

(३-ब) याप्रमाणे पृष्ठांकित केलेला प्रत्येक संलेख त्यानंतर, त्या बाबतीत अर्ज करण्यात आल्यावर ज्या व्यक्तीच्या ताब्यातून तो अशा न्यायालयाच्या ताब्यात आला असेल त्या व्यक्तीस, किंवा ती व्यक्ती निदेशित करील त्याप्रमाणे तिने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करण्यात येईल.]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३९(ब) द्वारे " आणि त्यावेळी जिच्या ताब्यात " या शब्दांनी सुरू होणाऱ्या व " ठेवता येईल " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३९(क) द्वारे पोट-कलमे (३-अ) आणि (३-ब) समाविष्ट करण्यात आली.

(४) त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, असा संलेख पुराव्यात स्वीकारण्यासंबंधीच्या आदेशात, किंवा कलम ४१ खाली दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रात किंवा कलम ४२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुद्रांक कायद्याविरुद्ध कोणताही अपराध करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींवर, तो अपराध तिने अशा संलेखाच्या बाबतीत केला आहे असे वाटत असेल तर त्याला खटला भरता येईल :

परंतु,–

(अ) कलम ३४ खाली त्या संलेखासंबंधात न्यायालयाने निर्धारित केल्याप्रमाणे शुल्क व शास्तीसह मिळून देय होती ती, [१][ रक्कम न्यायालयात किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे भरण्यात आली असेल त्या बाबतीत ] योग्य शुल्क चुकविण्याच्या हेतूने अपराध केला गेला असे जिल्हाधिकाऱ्यास वाटत नसेल तर, असा कोणताही खटला दाखल करता येणार नाही.

(ब) अशा खटल्याची प्रयोजने खेरीज करून एरव्ही, या कलमाखाली केलेल्या कोणत्याही अधिकथनामुळे, कोणताही संलेख पुराव्यात स्वीकारण्याबद्दलच्या कोणत्याही आदेशाच्या किंवा कलम ४१ खाली दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्राच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

## प्रकरण सात

## अपराध व कार्यपद्धती

**रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख निष्पादित करून देणे, वगैरेबद्दल शास्ती.**

**५९.** (१) [२][जी कोणतीही व्यक्ती शुल्क चुकविण्याच्या हेतूने, शुल्क आकारण्यास पात्र असा कोणताही संलेख, तो रीतसर मुद्रांकित न करता निष्पादित करून देईल किंवा त्यावर साक्षीदार म्हणून सही न करता अन्यथा सही करील अशा व्यक्तीला ] अपराध सिद्ध झाल्यावर अशा प्रत्येक अपराधाबद्दल [३][ एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल : ]

परंतु, जेव्हा कलम ३४, कलम ३९ किंवा कलम ५८ खाली कोणत्याही संलेखाच्या संबंधात कोणतीही शास्ती भरण्यात आली असेल तेव्हा, अशी शास्ती भरणाऱ्या व्यक्तीवर त्याच संलेखाबाबत या कलमाखाली मागाहून जो द्रव्यदंड (कोणताही असल्यास) बसविला जाईल त्यातून या शास्तीची रक्कम वजा करण्याची परवानगी दिली जाईल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३९(क) द्वारे " रक्कम जिल्हाधिकाऱ्यास चुकती करण्यात आली असेल त्याबाबतीत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे " कोणतीही व्यक्ती " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि " सही करीत असेल तिला " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ९ द्वारे " पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) जर एखादे शेअर-अधिपत्र रीतसर मुद्रांकित न करता देण्यात आले असेल तर, ते देणाऱ्या कंपनीस व तसेच ते देतेवेळी कंपनीचा कार्यकारी संचालक किंवा सचिव किंवा अन्य प्रमुख अधिकारी म्हणून असलेल्या प्रत्येक व्यक्तीसदेखील अपराध सिद्ध झाल्यावर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

**न्यायालयाने संलेख दाखल करून घेतला असेल तर कलम ५९ खाली खटला भरता येणार नाही.**

[१][**५९-अ.** जो कोणताही संलेख न्यायालयात सादर केला होता व उक्त संलेख हा रीतसर मुद्रांकित होता किंवा त्याला मुद्रांकाची जरुरी नाही असा न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर जो स्वीकारण्यात आला होता अशा संलेखाच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीवर कलम ५९ अन्वये खटला भरता येणार नाही.]

**वटवणी यादीत खोटे अधिकथन केल्याबद्दल शास्ती.**

**६०.** जी कोणतीही व्यक्ती, वटवणी यादीत जे खोटे आहे आणि किंवा जे खोटे असल्याचे तिला एकतर माहीत आहे किंवा ते तसे असल्याबाबत तिला विश्वास आहे असे एखादे अधिकथन करील तिला, अपराध सिद्ध झाल्यावर [२][एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.]

**चिकट मुद्रांक रद्द करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.**

**६१.** ज्या कोणत्याही व्यक्तीने कलम १२ द्वारे चिकट मुद्रांक रद्द करणे आवश्यक असेल आणि जिने त्या कलमाद्वारे विहित केलेल्या रीतीने असा मुद्रांक रद्द करण्यात कसूर केली असेल त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यावर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

**कलम २८ च्या तरतुदींचे अनुपालन न करण्याबद्दल शास्ती.**

**६२.** शासनाला ठकवण्याच्या हेतूने जी कोणतीही व्यक्ती,—

(अ) ज्या संलेखात, कलम २८ द्वारे मांडणे आवश्यक असलेली सर्व वस्तुस्थिती व परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने मांडलेली नाही, असा कोणताही संलेख निष्पादित करील; किंवा

(ब) कोणताही संलेख तयार करण्यासाठी किंवा त्यासंबंधात ठरवून दिलेली निबद्ध अशी सर्व वस्तुस्थिती व परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने त्यात मांडण्याबाबत हयगय करील किंवा मांडण्याचे वगळेल; किंवा

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४१ द्वारे कलम **५९-अ** समाविष्ट करण्यात आले.

[२] १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १० द्वारे " सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(क) या अधिनियमाखालील कोणतेही शुल्क किंवा शास्ती मिळण्यापासून शासनाला वंचित करण्याच्या दृष्टीने [१][कोणतेही खोटे विधान करील किंवा], दुसरे कोणतेही कृत्य करील;

तिला, अपराध सिद्ध झाल्यावर पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

**मुद्रांकांच्या विक्रीसंबंधीच्या नियमाचा भंग करण्याबद्दल आणि अनाधिकृत विक्री करण्याबद्दल शास्ती.**

**६३. (अ)** मुद्रांकांची विक्री करण्यासाठी नियुक्त केलेली जी कोणतीही व्यक्ती, कलम ६९ खाली केलेल्या कोणत्याही नियमाची अवज्ञा करील ; आणि

[२][(ब) याप्रमाणे नियुक्त न केलेली जी कोणतीही व्यक्ती, वीस पैशांच्या किंवा त्यापेक्षा कमी किंमतीच्या चिकट मुद्रांकांहून अन्य मुद्रांकांच्या विक्रीचा धंदा चालू ठेवील तिला,]

अपराध सिद्ध झाल्यावर [३][एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.]

**विहित कालावधीत मुद्रांक शुल्काचा भरणा न भरणे हा अपराध मानणे.**

[४][**६३-अ.** (१) महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त दिनांक " असा करण्यात आला आहे), कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही व्यक्तीकडून मुद्रांक शुल्क म्हणून कोणतीही रक्कम वसूल केली तर, किंवा उक्त दिनांकानंतर कोणत्याही वेळी वसूल करीत असेल तर उक्त दिनांकापासून १२० दिवसांच्या आत किंवा यथास्थिति, अशी रक्कम वसूल केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सरकारी कोषागारात किंवा प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे किंवा याबाबतीत राज्य शासन, **राजपत्रात** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्या कोणत्याही अन्य ठिकाणी, भरणा करील. १९९७ चा महाराष्ट्र ३०.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्ध झाल्यावर, एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.]

**खटले दाखल करणे व चालविणे.**

**६४.** (१) या अधिनियमाखाली किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाखाली शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाबद्दल, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा याबाबत राज्य शासन सर्वसाधारणपणे किंवा जिल्हाधिकारी विशेषकरून ज्या अन्य अधिकाऱ्यास प्राधिकृत करील त्या अधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय कोणताही खटला दाखल करता येणार नाही.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४२ द्वारे " वंचित करण्याच्या दृष्टीने " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४३ द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (ब) दाखल करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ११ द्वारे " सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ७ द्वारे कलम **६३-अ** समाविष्ट करण्यात आले.

(२) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास किंवा याबाबत त्याने सर्वसाधारणपणे किंवा विशेषेकरून प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असा कोणताही खटला स्थगित करता येईल किंवा असा कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(३) अशा कोणत्याही आपसातील तडजोडीची रक्कम, कलम ४६ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने वसूल करतो येईल.

**६५.** (अपराधांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता) [सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४४ द्वारे वगळण्यात आले.]

**न्यायचौकशीचे ठिकाण.**

[१][**६६.** कोणत्याही संलेखासंबंधात करण्यात आलेल्या, या अधिनियमाखालील प्रत्येक अपराधाची न्यायचौकशी ही असा संलेख जेथे निष्पादित करण्यात आलेला असेल किंवा सापडला असेल अथवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये जेथे असा अपराध न्यायचौकशीयोग्य असेल, अशा कोणत्याही १९७४ चा २. जिल्ह्यामध्ये किंवा महानगर क्षेत्रामध्ये करता येईल.]

प्रकरण आठ

## पूरक तरतूद

**निरीक्षणासाठी पुस्तके, वगैरे खुली असणे.**

**६७.** ज्यांचे निरीक्षण केल्यामुळे काही शुल्क मिळण्याची शक्यता असेल किंवा कोणत्याही शुल्कासंबंधात कपट किंवा कसूर सिद्ध होण्याची किंवा तसे उघडकीस येण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते ही, ज्याच्या अभिरक्षेत असतील असा प्रत्येक लोक अधिकारी, [२][राज्य शासनाने किंवा] जिल्हाधिकाऱ्याने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या प्रयोजनासाठी फी किंवा आकार न घेता, त्या नोंदवह्या, पुस्तके, कागदपत्रे, दस्तऐवज व कार्यवृत्ते यांचे कोणत्याही वाजवी वेळी निरीक्षण करण्याची आणि त्यातून तिला आवश्यक वाटतील अशा टिपा व उतारे लिहून घेण्याची [३][व आवश्यक असल्यास, ते कलम ३३ अन्वये जप्त करण्याची व अवरुद्ध करून ठेवण्याची] परवानगी देईल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४५ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम ६६ दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४६(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४६(ब) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

**परिवास्तूमध्ये प्रवेश करण्यास व विवक्षित दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यास अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.**

**६८.** [१][अनुसूची एकमध्ये], [१] * * * * विनिर्दिष्ट केलेल्या संलेखांपैकी सर्व किंवा कोणत्याही संलेखावर या अधिनियमाखाली बसवण्यायोग्य शुल्क मुळीच आकारण्यात आलेले नाही किंवा चुकीचे आकारण्यात आलेले आहे असे मानण्यास जिल्हाधिकाऱ्यास संयुक्तिक कारण असेल तर, त्यास, कोणत्याही अधिकाऱ्यास जेथे अशा कोणत्याही संलेखासंबंधीच्या किंवा अशा संलेखाच्या बाबतीतील कोणत्याही नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते ठेवली आहेत, असे मानण्यास त्यास संयुक्तिक कारण असेल अशा कोणत्याही परिवास्तूत प्रवेश करण्यासाठी, त्यांचे निरीक्षण करण्यासाठी आणि अशा अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा नोंदी व उतारे त्यातून घेण्यासाठी लेखी प्राधिकृत करता येईल. अशा नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते अभिरक्षेत असणारी अशी किंवा ती ठेवणारी प्रत्येक व्यक्ती, जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास सर्व वाजवी वेळी त्यांचे निरीक्षण करण्याची व त्या अधिकऱ्यास आवश्यक वाटतील अशा नोंदी व उतारे घेण्याची [२][आणि त्यास आवश्यक वाटेल तर कलम ३३ अन्वये ते जप्त करण्याची आणि अवरुद्ध करून ठेवण्याची] परवानगी देईल.

**नियम करण्याचा अधिकार.**

[३][**६९.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने सर्वसाधारणपणे पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील, आणि अशा नियमांमध्ये, त्यांचा भंग केल्याचा अपराध सिद्ध झाल्यावर जास्तीत जास्त पाचशे रुपयांइतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, अशी तरतूद करता येईल.

(२) पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, आणि विशेषकरून, अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींचे [४][विनियमन करता येईल किंवा पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल] :-

(अ) मुद्रांकांचा व मुद्रांकित कागदांचा पुरवठा, विक्री व वापर;

(ब) ज्या व्यक्तींनीच केवळ अशी विक्री करावयाची आहे त्या व्यक्ती; [५][* *]

(क) अशा व्यक्तींची कर्तव्ये व त्यांचे पारिश्रमिक ; [६][* * *]

[७][(कअ) ई-प्रदानाद्वारे मुद्रांक शुल्क भरण्याची रीत आणि त्याचा परतावा ;]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४७ द्वारे " एकच्या नोंद क्र. ५, १३, १९, २०, २१, २२, २३, २८, २९, ३४, ३५, ३६, ४३, ५४ आणि ६२ मध्ये " हा मजकूर वगळण्यात आला आणि "अनुसूची एकच्या " या मजकुराऐवजी " अनुसूची एक मध्ये " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ४(ब) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४८ द्वारे मूळ कलमे ६९, ७० आणि ७१ यांऐवजी नवीन कलमे ६९, ७० आणि ७१ दाखल करण्यात आली.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३७(अ) द्वारे " विनियमन करता येईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३७(ब) द्वारे " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

[६] सन १९८९ चा महाराष्ट्र क्रमांक १८ याच्या कलम १२(अ) द्वारे " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

[७] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ४ द्वारे खंड (कअ) समाविष्ट करण्यात आला.

[१][(ड) स्थावर मालमत्तेचे खरे बाजार मूल्य ठरविण्याची रीत ;]

[२][(ई) स्वाधिकारे पुनरीक्षण कार्यवाहीची पद्धती ; आणि

(फ) कलमे ४७, ५० ५१ किंवा ५२ अन्वये मुद्रांकाबाबत सवलतीबाबत रकमेतून वजा करावयाची रक्कम :]

परंतु, अशा नियमांमुळे वीस पैशांच्या किंवा त्यापेक्षा कमी किंमतीच्या चिकट मुद्रांकांची विक्री करण्यावर निर्बंध येणार नाहीत.

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम, **राजपत्रात** ते अगोदर प्रसिद्ध करण्याच्या शर्तीच्या अधीन राहून करण्यात येतील :

[३][परंतु, त्वरित कारवाई करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली तर, त्यास, या कलमाखाली करण्यात यावयाचा कोणताही नियम अगोदर प्रसिद्ध करण्याची शर्त काढून टाकता येईल.]

(४) या कलमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल, आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल तर, अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमाखाली यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**देय शुल्क किंवा सवलत म्हणून द्यावयाची रक्कम यातील अपूर्णांक पूर्णांकित करणे.**

**७०.** [४][(१)] या अधिनियमाखाली देय असलेले शुल्क किंवा सवलत म्हणून द्यावयाची रक्कम निर्धारित करताना, पाच पैशांइतका किंवा पाच पैशांपेक्षा अधिक असलेला दहा पैशांचा कोणताही अपूर्णांक पुढील दहा पैशांत पूर्णांकित करण्यात येईल, आणि पाच पैशांहून कमी असलेले अपूर्णांक हिशेबात घेतले जाणार नाहीत.

[४][(२) या अधिनियमान्वये देय असलेले शुल्क, किंवा सवलत म्हणून द्यावयाची रक्कम निर्धारित करताना, ज्याच्या संबंधात शंभर रुपयांपेक्षा अधिक शुल्क देय असेल अशा संलेखांच्या बाबतीत, पन्नास रुपयांइतका किंवा पन्नास रुपयांपेक्षा अधिक असलेला शंभर रुपयाचा कोणताही अपूर्णांक पुढील शंभर रुपयात पूर्णांकित करण्यात येईल आणि पन्नास रुपयांहून कमी असलेले अपूर्णांक हिशेबात घेतले जाणार नाहीत.]

**७१.** [नियमांचे प्रकाशन.] (सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४८ अन्वये वगळण्यात आले.)

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३७(ड) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १२(ब) द्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम २ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला आणि कलम ७० ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

**७२.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,–

**विवक्षित अधिकारांचे प्रत्यायोजन.**

(अ) कलमे २ (फ), ३३ (३) (ब), ६४ [१][आणि ६९] यांद्वारे त्यास प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा त्यांपैकी कोणताही अधिकार मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे; आणि

(ब) कलमे ४४, ५३ (१) आणि ६४ (२) यांद्वारे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा त्यांपैकी कोणताही अधिकार अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दुय्यम महसूल प्राधिकाऱ्याकडे,–

प्रत्यायोजित करता येईल.

**७३.** या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे न्यायालय फीसंबंधी त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली आकारणीपात्र असलेल्या शुल्कांना बाध पोहचते असे मानले जाणार नाही

**न्यायालय फी बाबत व्यावृत्ती.**

**७३-अ.** [अनुज्ञेय असणाऱ्या भूतपूर्व राज्याच्या मुद्रांकांचा विवक्षित कालावधीसाठी वापर अधिसूचित करावयाचा.] (सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४९ द्वारे वगळण्यात आले.

**७३-ब.** [मुंबई शासनाच्या मुद्रांकांचा महाराष्ट्र शासनाने विवक्षित कालावधीसाठी वापर करावयाचा.] (सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४९ द्वारे वगळण्यात आले.)

**७४.** शंका टाळण्यासाठी, याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट, विनिमयपत्रे, धनादेश, वचनचिठ्ठ्या, भरणपत्रे, पतपत्रे, विमापत्रे, शेअर हस्तांतरणपत्रे, ऋणपत्रे, प्रतिपत्रे व पावत्या यांच्या बाबतीतील मुद्रांक शुल्काच्या दरांना लागू होणार नाही.

**विनिमयपत्रे, वगैरेवरील मुद्रांक शुल्काच्या दरांना हा अधिनियम लागू नसणे.**

**७५.** राज्य शासन, [२][या अधिनियमाचा मराठीमधील व हिंदीमधील] अनुवाद प्रत्येक प्रतीस [३][वेळोवेळी निश्चित करण्यात येईल] अशा किंमतीस विकण्याची तरतूद करील.

**अधिनियमाचा अनुवाद करून त्याची स्वस्त दराने विक्री करणे.**

**७६.** (१) येथे जोडलेल्या अनुसूची दोनच्या स्तंभ ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमिती, त्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि त्या व्याप्तीपर्यंत निरसित करण्यात येतील:

**अधिनियमितींचे निरसन.**

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३६ द्वारे " ६९ आणि ७५ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७६ याच्या कलम ५० (अ) द्वारे " आपल्या प्रशासनाखालील प्रदेशांमध्ये या अधिनियमाच्या प्रमुख देशी भाषांतील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३७ द्वारे " एक रुपयापेक्षा अधिक नसेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, त्या अधिनियमितीच्या अशा निरसनामुळे, याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींखालील—

(एक) अगोदरच संपादन केलेला, उपार्जित केलेला किंवा पत्करलेला कोणताही हक्क, मालकी-हक्क, आबंधन किंवा दायित्व यांवर, किंवा केलेल्या किंवा ओढवून घेतलेल्या कोणत्याही गोष्टींवर,

(दोन) असा कोणताही हक्क, मालकी हक्क, आबंधन किंवा दायित्व याच्या संबंधातील कोणत्याही कायदेविषयक कार्यवाहीवर किंवा उपाययोजनेवर,

कोणताही परिणाम होणार नाही आणि जणू काही, हा अधिनियम पारित झालेला नसावा त्याप्रमाणे अशी कोणतीही कार्यवाही दाखल करता येईल, चालू ठेवता येईल व निकालात काढता येईल आणि अशी कोणतीही उपाययोजना अंमलात आणता येईल.

(२) याद्वारे निरसित केलेल्या अधिनियमितींपैकी कोणत्याही अधिनियमितीखाली केलेली कोणतीही नेमणूक किंवा काढलेली अधिसूचना, नोटीस, आदेश किंवा केलेला नियम किंवा नमुना हा जेथवर, अशी नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम किंवा नमुना हा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तरतुदींखाली केलेला किंवा काढलेला आहे असे मानण्यात येईल आणि जोपर्यंत या अधिनियमाखाली केलेल्या नेमणुकीअन्वये किंवा काढलेल्या अधिसूचनेअन्वये, नोटीशीअन्वये, आदेशान्वये किंवा केलेल्या नियमान्वये किंवा नमुन्यान्वये अशी नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम, किंवा नमुना यांचे अधिक्रमण होत नाही तोपर्यंत अशी नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम किंवा नमुना अंमलात राहील.

(३) चार आणे किंवा त्याच्या पटीतील अभिधानाचे सर्व मुद्रांक हे, यथास्थिति, पंचवीस नवे पैसे किंवा त्यांच्या पटीतील मुद्रांक असल्याचे आणि त्यानुसार ते विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल.

---

[1][ **अनुसूची एक**

**संलेखांवरील मुद्रांक शुल्क**

(कलम ३ पहा)

| संलेखाचे वर्ण (१) | उचित मुद्रांक शुल्क (२) |
| --- | --- |
| **१. अभिस्वीकृती.**– [2][(१)] कोणत्याही ऋणाची, त्या ऋणाचा पुरावा म्हणून (बँक व्यवसायीच्या पासबुकाखेरीज इतर) कोणत्याही पुस्तकात किंवा एखाद्या स्वतंत्र कागदावर, ऋणकोने किंवा ऋणकोच्या वतीने लिहून किंवा सही करून दिलेली अभिस्वीकृती, जेव्हा असे पुस्तक किंवा कागद धनकोच्या कब्जात ठेवलेला असेल आणि अशा ऋणाची रक्कम,- | |
| [3][ * * * * ] | |
| (क) ५,००० रुपयांहून अधिक परंतु १०,००० रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ; आणि | एक रुपया. |
| (ड) दर १०,००० रुपयांसाठी किंवा १०,००० रुपयांहून अधिक असलेल्या प्रत्येक भागासाठी. | [4][शंभर रुपयांच्या] कमाल मर्यादेच्या अधीन राहून एक रुपया. |
| [5][(२) कोणत्याही स्वरूपाचे किंवा कोणत्याही वर्णनाचे किंवा कोणत्याही नावाने संबोधले जाणारे एखादे पत्र, वस्तू, दस्तऐवज पार्सल, पुडके किंवा माल पाठवणाऱ्याला एखाद्या व्यक्तीने, कुरिअर (विशेष वाहक) कंपनीने, व्यवसाय संस्थेने किंवा व्यक्तीसंस्थेने- मग ती कायद्याने संस्थापित केलेली असो किंवा नसो- दिलेले असे पत्र, वस्तू, दस्तऐवज, पार्सल, पुडके किंवा माल. | त्यासाठी आकारलेल्या रकमेपैकी दर शंभर रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया.] |

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ५१ द्वारे मूळ अनुसूची एक ऐवजी पुढील अनुसूची एक दाखल करण्यात आली.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(१) (अ) द्वारे “ कोणत्याही ऋणाची ” या मजकुराने सुरू होणाऱ्या व “ पन्नास रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने ” या मजकुराने संपणाऱ्या मजकुरास “ खंड (१) ” असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[3] सन २००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१) द्वारे उपखंड (क) आणि (ख) वगळण्यात आले.

[4] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(१) द्वारे “ पन्नास रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(१)(ब) द्वारे खंड (२) जादा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| १८७३ चा ५. १९२५ चा ३९. **२. प्रशासन बंधपत्र.**— सरकारी बचत बँक अधिनियम, १८७३ याच्या कलम ६ अन्वये किंवा भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ अन्वये देण्यात आलेल्या बंधपत्रासह प्रशासन बंधपत्र,- | |
| (अ) जेव्हा रक्कम २,५०० रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत, | तेवढ्याच रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत. | [१][दोनशे रुपये] |
| **३. दत्तकपत्र** म्हणजे, दत्तकग्रहणाची नोंद करणारा किंवा दत्तक घेण्याचा प्राधिकार प्रदान करणारा किंवा ज्याद्वारे असा प्राधिकार प्रदान झाला असे दिसते असा (मृत्युपत्राहून अन्य) कोणताही संलेख. | [२][दोनशे रुपये] |
| **४. प्रतिज्ञालेख** म्हणजे, एखादे लेखी निवेदन वस्तुस्थिति-कथन असल्याचे दिसत असून ते करणाऱ्या व्यक्तीने ते स्वाक्षरित केलेल असेल आणि तिने शपथेवर अथवा शपथग्रहणाच्या ऐवजी दृढकथन अथवा अधिकथन करण्यास कायद्याद्वारे मुभा मिळालेल्या व्यक्तींनी दृढकथनाद्वारे त्यास पुष्टी दिलेली असेल असे निवेदन. | [३][शंभर रुपये] |

**माफी**

प्रतिज्ञालेख किंवा लेखी अधिकथन जेव्हा ते,—

(क) वायुसेना अधिनियम, १९५०, भूसेना अधिनियम, १९५० किंवा नौसेना अधिनियम, १९५७ यांखाली नावनोंदणीची शर्त म्हणून ; सन १९५० चा ४५.

(ख) कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या अधिकाऱ्यापुढे दाखल करावयाच्या किंवा उपयोगात आणावयाच्या तात्कालिक प्रयोजनांसाठी ; किंवा सन १९५० चा ४६. सन १९५७ चा ६२.

(ग) कोणत्याही व्यक्तीला कोणतेही निवृत्तिवेतन किंवा धर्मादाय भत्ता घेणे शक्य व्हावे या एकमात्र प्रयोजनासाठी,

केलेले असेल तेव्हा.

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(२) द्वारे "पन्नास रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(क) द्वारे "शंभर रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(३) द्वारे "वीस रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **५. करार किंवा त्याचे अभिलेख किंवा करार संक्षेपलेख.–** | |
| (क) जर विनिमयपत्राच्या विक्रीसंबंधी असेल तर, .. | [१][विनिमयपत्राच्या रकमेच्या ०.००५ टक्के.] |
| (ब) सरकारी रोख्यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर, | [२][रोख्याच्या, यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळी असलेल्या मूल्याच्या] [३][०.००५ टक्के.] |
| (क) कोणत्याही विधिसंस्थापित कंपनीतील किंवा अशा कंपनीचे किंवा अन्य निगम निकायातील किंवा अशा निगम निकायाचे शेअर, पावती पत्र (स्क्रिप), पुंजरोखे, बंधरोखे, ऋणपत्रे, ऋणपत्ररोखे किंवा तशाच स्वरूपाचा अन्य कोणताही विक्रेय रोखा यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर,– | |
| (एक) जेव्हा अशा प्रकारचा करार किंवा करार संक्षेपलेख हा, रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ खाली मान्यता मिळालेल्या रोखे बाजाराच्या सदस्यांशी किंवा सदस्यांमार्फत किंवा सदस्यांमध्ये आपसात केलेला असेल तेव्हा ; (१९९५ चा ४२.) | रोख्याच्या, यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळी त्याचे जे मूल्य असेल त्या मूल्याच्या [४][०.००५ टक्के.] |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत असेल तर ; | रोख्याच्या, यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळी त्याचे जे मूल्य असेल त्या मूल्याच्या [५][०.००५ टक्के.] |
| (ड) कापसाची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; | [६][कापसाच्या मूल्याच्या [७][०.००५ टक्के.] |

[१] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(क)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(क)** द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(क)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(क) (तीन)(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २(क) (तीन)(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(ख)** द्वारे " संव्यवहाराच्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " एक रुपया " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(क)(चार) मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**अनुसूची एक --** चालू

| (१) | (२) |
|---|---|
| (ई) सोन्या-चांदीच्या लगडी अगर नाणी यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; .. | [१][ चांदी किंवा सोने किंवा यथास्थिति, सॉव्हरिन याच्या मूल्याच्या [२][ ०.००५ टक्के.] |
| (फ) गळीत धान्याची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; | [३][गळीत धान्यांच्या मूल्याच्या [४][०.००५ टक्के.] |
| (ग) कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; | [५][ कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजे-तर तेले किंवा यथास्थिति, कोणात्याही प्रकारचे मसाले यांच्या मूल्याच्या [६][ ०.००५ टक्के.] |

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(ग)** द्वारे खंड(अ), (ब) आणि (क) या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(क)(पाच) द्वारे मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(घ)** द्वारे “ गळित धान्याच्या ” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “ एक रुपया ” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(क)(सहा) द्वारे मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(ङ)** द्वारे “ कोणत्याही प्रकारचे सूत ” या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि “एक रुपया” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(क)(सात) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][(गअ) [२][(एक) कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील बांधकाम, तिचा विकास किंवा तिची विक्री किंवा तिचे हस्तांतरण (मग ते कोणत्याही स्वरूपाचे असो) यासाठी प्रवर्तक किंवा विकासक - मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो - यास प्राधिकार किंवा अधिकार देण्यासंबंधात असेल तर ; | [३][ मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या खंड (ब), [४][किंवा यथास्थिति (क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत आकारणीयोग्य असते, तितके शुल्क :]<br><br>परंतु कलम **३२-क** च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह त्या कलमाखालील संलेखास ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे अशा करार-नाम्यास, त्याच्या अभिलेखास किंवा संक्षेपलेखास लागू होतील :<br><br>परंतु आणखी असे की, अनुच्छेद ४८, खंड (छ) अन्वये जर त्याच मालमत्तेच्या संबंधात त्याच पक्ष-कारांमध्ये निष्पादित करण्यात आलेल्या मुखत्यारनाम्यावर यथोचित मुद्रांक शुल्क भरलेले असेल तर, या अनुच्छेदान्वये भरावयाचे मुद्रांक शुल्क शंभर रुपये इतके असेल. ] |

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(२) द्वारे खंड (छ) नंतर खंड (गअ) दाखल करण्यात आला आणि ७ फेब्रुवारी, १९९० पासून तो समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात आले.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(च)** द्वारे मूळ मजकुराला उपखंड (एक) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २(क)(एक) द्वारे “मालमत्तेच्या” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “ पाच रुपये ” या मजुकाराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][ (दोन) एखाद्या व्यक्तीने विकासकाकडून केलेल्या कोणत्याही योजनेतील किंवा प्रकल्पातील एका किंवा त्याहून अधिक युनिटांच्या खरेदीसंबंधात असेल तर : | युनिटाच्या बाजार मूल्यावर, अनुच्छेद २५ याच्या खंड (अ), (ब), [२][किंवा, यथास्थिति (क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्रावर बसवण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| परंतु, या उपखंडाखालील करारान्वये, त्या व्यक्तीने त्यानंतरच्या खरेदीदाराकडे केलेल्या मालमत्तेच्या अभिहस्तांतरणावर, असे हस्तांतरण किंवा अभिहस्तांकन, कराराच्या दिनांकापासून [३][एक वर्षाच्या कालावधीमध्ये] केलेले असेल तर, शंभर रुपये इतकी शिल्लक ठेवल्यानंतर, या उपखंडान्वये प्रत्येक युनिटासाठी आकारणीपात्र असलेले शुल्क, अनुच्छेद २५ (अभिहस्तांतरणपत्र) अन्वये आकारणी-पात्र असलेल्या शुल्कामध्ये समायोजित करण्यात येईल. समायोजनानंतर कोणतेही शुल्क देण्याची आवश्यकता नसेल तर, अभिहस्तांतरणासाठीचे किमा शुल्क शंभर रुपये इतके असेल. | |
| **स्पष्टीकरण**.- या उपखंडाच्या प्रयोजनासाठी, युनिट यामध्ये, सदनिका, वेश्म, गाळा, वेश्मिका किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने इमारतीच्या आराखड्यात मान्य केल्याप्रमाणे, कोणत्याही नावाने संबोधले जाणारे इतर कोणतेही युनिट, यांचा समावेश असेल.] | |
| [४][ * * * * ] | |
| [५][ * * * * ] | |

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(च)** द्वारे उपखंड (दोन) जादा दाखल करण्यात आला.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २(क)(दोन) द्वारे " तीन वर्षाच्या कालावधीमध्ये " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम (३)(१) द्वारे खंड (छख) वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम (३)(१)(ब) द्वारे स्पष्टीकरण दोन वगळण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][(गड) स्थावर मालमत्तेच्या भाडेदारीच्या हस्तांतरणाच्या बाबतीत असेल तर, ज्यामधील भाडेदारीचा हक्क हा, हस्तांतरणाची विषयवस्तू असेल अशा भाड्याने दिलेल्या आणि पुढील हद्दीत असलेल्या मालमत्तेच्या क्षेत्याच्या प्रत्येक चौरस मीटरला, | |
| (एक) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत,– | |
| (अ) कोणत्याही स्वरूपाच्या बिगरनिवासी वापराच्या प्रयोजनासाठी; | [२][अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क.] |
| [३][(ब) निवासी वापराच्या प्रयोजनार्थ,– | |
| (१) २७.८८ चौरस मीटर (३०० चौरस फूट) पर्यंत असलेल्या क्षेत्रासाठी ; | दोनशे रुपये. |
| (२) २७.८८ चौरस मीटर (३०० चौरस फूट) पेक्षा अधिक असलेल्या क्षेत्रासाठी. | अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क. |
| (दोन) ठाणे, पुणे, नागपूर, व नवी मुंबई या शहराच्या महानगर-पालिकांच्या हद्दीत,– | |
| (अ) कोणत्याही स्वरूपाच्या बिगरनिवासी वापराच्या प्रयोजनार्थ; | [४][अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क.] |
| [५][(ब) निवासी वापराच्या प्रयोजनार्थ, | |
| (१) २७.८८ चौरस मीटर (३०० चौरस फूट) पर्यंत असलेल्या क्षेत्रासाठी ; | शंभर रुपये. |
| (२) २७.८८ चौरस मीटर (३०० चौरस फूट) पेक्षा अधिक असलेल्या क्षेत्रासाठी. | अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क. |

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(२) द्वारे खंड (गड) आणि स्पष्टीकरणे एक आणि दोन समाविष्ट करण्यात आली.

२ सन २०११ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(क)(आठ)(क)(१) द्वारे " दोन हजार रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम २(क) आठ(क) (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम २(क)(आठ)(ख) (१) द्वारे " एक हजार रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम २(क)(आठ) (ख)(२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**अनुसूची एक --** चालू

| (१) | (२) |
|---|---|
| [१][ (तीन) स्तंभ (एक) आणि दोन) मध्ये नमूद केलेल्या महानगरपालिकांखेरीज अन्य कोणत्याही महानगपालिकेच्या हद्दीत,– | |
| (अ) कोणत्याही स्वरूपाच्या बिगरनिवासी वापराच्या प्रयोजनासाठी; | [२][अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क.] |
| [३][ (ब) निवासी वापराच्या प्रयोजनार्थ,– | |
| (१) २७.८८ चौरस मीटर (३०० चौरस फूट) पर्यंत असलेल्या क्षेत्रासाठी ; | पन्नास रुपये. |
| (२) २७.८८ चौरस मीटर (३०० चौरस फूट) पेक्षा अधिक असलेल्या क्षेत्रासाठी. | [३][अनुच्छेद ६० अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क.] |
| (गई) भाडे खरेदीच्या संबंधात असेल तर, | अनुच्छेद ३६ खाली जे शुल्क देय असेल तेच शुल्क.] |
| [४][* * *] | |
| [५][* * * *] | |

१ वरील अधिनियमाच्या कलम ६(ख)(३) द्वारे मूळ उपखंड (तीन) ऐवजी हा उपखंड (तीन) दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम २(क) आठ(ग)(१) द्वारे “ चारशे रुपय ” या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम २(क)(आठ)(ग)(२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २(१)(ब) द्वारे स्पष्टीकरण एक वगळण्यात आले.

५ वरील अधिनियमाच्या कलम ३(१)(ब) द्वारे स्पष्टीकरण दोन वगळण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][ (ह) [२][ (अ) जर,– | |
| (एक) कोणतेही उत्पादन किंवा कार्यक्रम किंवा साहेळा यांच्यापासून नफा मिळविण्याच्या किंवा व्यवसाय करण्याच्या हेतूने त्यांना चालना देण्यासाठी, प्रसार माध्यमावर केलेली कोणतीही जाहिरात, या संबंधात असेल तर,– | |
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |
| (दोन) एखादा सोहळा किंवा एखाद्या चित्रपट याचे दृकप्रसारण, ध्वनिक्षेपण किंवा प्रदर्शन यांचा संपूर्ण हक्क प्रदान करणे, यासंबंधात असेल तर,– | |
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |

१ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(२)**(छ)** द्वारे मूळ मजकुराऐवजी खंड (ह) दाखल करण्यात आला.

२ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २**(क)** द्वारे मूळ उप-खंड(अ) ऐवजी नवीन उप-खंड(अ) दाखल करण्यात आला.

| | (१) | (२) |
|---|---|---|
| | (तीन) कराराचे मूल्य १,००,००० रुपयांहून अधिक असेल अशा, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तीच्या गटाने सादर करावयाच्या विशिष्ट कार्यक्रमाच्या संबंधात असेल तर,— | |
| | (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| | (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |
| | (चार) कोणतेही आबंधन, हक्क किंवा हितसंबंध यांच्या निर्मितीच्या संबंधातील असेल आणि आर्थिक मूल्य असणारे परंतु अन्य कोणत्याही अनुच्छेदाखाली समाविष्ट केलेले नसेल तर,— | |
| | (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| | (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये. |
| १९५७ चा १४. | (पाच) कॉपीराईट अधिनियम, १९५७ अन्वये कॉपीराईटच्या अभिहस्तांकनाच्या संबंधात असेल तर,— | |
| | (अ) संमत करण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये पन्नास पैसे. |
| | (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. |

| (१) | (२) |
|---|---|
| [१][ (सहा) बांधा, वापरा व हस्तांतरित करा पद्धतीखालील प्रकल्प - मग तो पथकर किंवा फी वसूल करण्याचा हक्क यांसह असो किंवा याव्यतिरिक्त असो,— | |
| (अ) संमत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | किमान १०० रुपयांच्या अधिनतेने, करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | करारात संमत केलेल्या रकमेच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये.] |
| (ख) अन्यथा तरतूद केलेली नसेल तर, | शंभर रुपये. |
| **स्पष्टीकरण.--** अनुच्छेद **५१-अ** अन्वये उचित शुल्क भरले असेल तर, या अनुच्छेदाच्या उप-खंड (ख) आणि (ग) खाली समाविष्ट केलेले करार किंवा त्यांचा अभिलेख यांवर कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.] | |

**माफी**

**करार किंवा त्याचे अभिलेख किंवा कराररयादी--**

(अ) केवळ मालाच्या किंवा व्यापारी मालाच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी केलेले असेल किंवा खरेदी-विक्रीसंबंधी केलेले असेल तेव्हा-परंतु या अनुच्छेदातील नोंद (ड), नोंद (ई), नोंद (फ) किंवा नोंद (ग) अन्वये शुल्क आकारण्यास पात्र असेलला करार किंवा करारायादी अथवा अनुच्छेद ४३ अन्वये शुल्क आकारण्यास पात्र असलेली टिप्पणी किंवा ज्ञापन नव्हे ;

[२][ * * * ]

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४(१)**(क)** द्वारे “ दोन रुपये पन्नास पैसे ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३८(अ)(दोन) द्वारे “ माफी ” या शिर्षकाखालील खंड (ख) आणि (ग) वगळण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| **६. हक्कविलेख-निक्षेप, हडप, तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा करारनामा, म्हणजे पुढील बाबीसंबधीच्या कराराचा पुरावा असणारा कोणताही संलेख—** | |
| [1][ " (१) हक्कविलेख किंवा (विक्रेय प्रतिभूतिपत्राखेरीज इतर) कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेवर हक्क प्रस्थापित करणारा किंवा अशा हक्काचा पुरावा असणारा संलेख जेथे तो कर्जाच्या स्वरूपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या स्वरूपात निक्षेपित केलेला असेल त्याबाबतीत असा हक्कविलेख किंवा संलेख निक्षेप म्हणून ठेवणे,-- | |
| (अ) अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून दर एक हजार रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या, दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये. |
| (२) जंगम मालमत्तेचे हडप, तारण किंवा तारणगहाण, जेथे कर्जाच्या स्वरुपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या रुपाने असे हडप, तारण किंवा तारणगहाण करण्यात आले असेल अशा बाबतीत,— | |
| (अ) अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून दर एक हजार रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या, दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन रुपये."] |

१ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २(ख)(एक) द्वारे मूळ खंड (१) आणि (२) याऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| [१] **[ स्पष्टीकरण एक ]**—हक्कविलेख निक्षेपासंबंधी कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात, अथवा कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या आदेशात अथवा त्यासंबंधीच्या कोणत्याही पत्रात, टिप्पणीत, ज्ञापनात किंवा लेखात-मग हक्कविलेख—निक्षेप अंमलात आला तेव्हा किंवा त्यानंतर किंवा त्यापूर्वी तो केलेला असो आणि पहिले कर्ज किंवा मागाहून घेतलेले अतिरिक्त कर्ज किंवा कर्जे यांच्या प्रतिभूतीसंबंधी असो-काहीही अंतभूर्त असले तरी, अशा हक्कविलेख-निपेक्षासंबंधी वेगळा करार किंवा करार संक्षेपलेख नसेल तेव्हा, असे पत्र, टिप्पणी, ज्ञापन किंवा लेख हे, या अनुच्छेदाच्या खंड (१) च्या प्रयोजनार्थ, हक्कविलेख-निक्षेपासंबंधातील कराराचा पुरावा म्हणून मानण्यात येईल. | |
| [२][ * * * ] | |
| **माफी** | |
| (१) [३][ * * * ] | |
| (२) विनिमयपत्रासोबत असलेले तारणगहाणासंबंधीचे पत्र. | |

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८(क)(दोन) द्वारे विद्यमान स्पष्टीकरणास " स्पष्टीकरण एक " असा क्रमांक देण्यात आला आणि त्यानंतर " स्पष्टीकरण दोन " जादा दाखल करण्यात आले.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २(ख)(दोन) द्वारे स्पष्टीकरण दोन वगळण्यात आले.

[३] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(३)(ब) द्वारे ही नोंद वगळण्यात आली.

| (१) | (२) |
|---|---|
| **७. अधिकार वापरण्याकरिता नेमणूक,—** | |
| मृत्यूपत्राहून अन्य कोणताही लेखाद्वारे केली असेल तेथे,— | |
| (अ) विश्वस्त म्हणून | [१] [ शंभर रुपये ; ] |
| (ब) जंगम किंवा स्थावर मालमत्तेसाठी | [२] [ दोनशे पन्नास रुपये. ] |
| **८. मूल्यन किंवा मूल्यांकन.**—दाव्याच्या ओघात न्यायालयाने दिलेल्या आदेशाखाली नव्हे तर अन्यथा केलेले. | [३] [ शंभर रुपये. ] एवढ्या कमाल मर्यादेस अधीन राहून (अनुच्छेद १३) बंधपत्रावरील, शुल्काएवढे शुल्क. |
| **माफी** | |
| (अ) केवळ एकाच पक्षकाराच्या माहितीसाठी केलेले आणि एकतर करारामुळे किंवा कायद्याच्या प्रवर्तनामुळे कोणत्याही रीतीने पक्षकारांमध्ये बंधनकारक नसणारे मूल्यन किंवा मूल्यांकन ; | |
| (ब) एखाद्या जमीन मालकाला खंड म्हणून द्यावयाची रक्कम निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी केलेले पिकाचे मूल्यन. | |
| **९. शिकाऊ उमेदवारी - विलेख.**— यामध्ये कोणताही पेशा, उदीम किंवा कामधंदा शिकण्याकरिता कोणत्याही मालकाकडे ठेवलेल्या शिकाऊ उमेदवाराच्या, लिपिकाच्या किंवा नोकराच्या नोकरीसंबंधीचा किंवा शिकवणीसंबंधीचा, व्यवसाय उमेदवारी कराराहून (अनुच्छेद ११) अन्य असा प्रत्येक लेख समाविष्ट आहे. | [४] [ शंभर रुपये ; ] |
| **माफी** | |
| शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१ खाली निष्पादित करून दिलेला किंवा ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीस सार्वजनिक धर्मादाय संस्थेने किंवा तिच्या खर्चाने शिकाऊ उमेदवारीसाठी ठेवलेला असेल असा कोणत्याही शिकाऊ उमेदवारीसंबंधीचा संलेख. | |

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८(४)(अ) द्वारे " पन्नास रुपये " या मजकूराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३८(४)(ब)(एक) द्वारे " पंचावन्न रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(६) द्वारे " पन्नास रुपये " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १३ याच्या कलम ६(७) द्वारे " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **१०. एखाद्या कंपनीची संस्थापन नियमावली,—** | |
| [१] [ जेव्हा कंपनीचे कोणतेही भागभांडवल ; ] किंवा नाममात्र भागभांडवल किंवा वाढीव भागभांडवल [१] [ नसेल तेव्हा; ] | [२] [ ५०,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, ] दर ५,००,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक हजार रुपये ; |
| **माफी** | |
| १९५६ चा १. नफ्याकरिता स्थापन न केलेल्या व कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २५ खाली नोंदणी झालेल्या कोणत्याही अधिसंघाची नियमावली (कंपनीच्या संस्थापन समयलेख (अनुच्छेद ३९) देखील पहावा.) | |
| **११. व्यवसाय उमेदवारी करार** किंवा ज्याद्वारे एखादी व्यक्ती कोणत्याही उच्च न्यायालयात न्यायवादी म्हणून प्रवेश मिळविण्याकरिता प्रथमतः न्यायालय अधीक्षक म्हणून नोकरी करण्यासाठी बांधली जाते अशी संविदा. | [३] [ सातशे पन्नास रुपये ; ] |
| **अभिहस्तांकन :—** यथास्थिति, [४][ विकास करार (अनुच्छेद ५ (गअ) अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), हस्तांतरण (अनुच्छेद ५९) आणि भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०) पहावे. | |
| **मुखत्यार :—** मुखत्यार म्हणून केलेली नोंद (अनुच्छेद ३१) व मुख्यत्यारनामा (अनुच्छेद ४८) पहावे. | |
| **दत्तक अनुज्ञापत्र :—** दत्तकपत्र (अनुच्छेद ३) पहावे. | |
| **१२. निवाडा :—** म्हणजे एखाद्या दाव्याच्या ओघात न्यायालयाच्या आदेशाद्वारे नव्हे तर अन्यथा लवादाकडे किंवा पंचाकडे एखादी बाब निर्देशित केल्यावरून लवादाने किंवा पंचाने दिलेला, विद्यमान किंवा भविष्यकालीन मतभेद लवादाकडे निर्देशित करण्याविषयीच्या लेखी करारानुसार झालेला परंतु, वाटणीचा निदेश देण्याबाबतचा निवाडा सोडून अन्य कोणताही लेखी निर्णय,— | |

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३८(६) द्वारे " भाग भांडवल " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(ग) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८(६) द्वारे " तीनशे पंच्याहत्तर रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(४) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (अ) जिच्या संबंधात निवाडा असेल त्या मालमत्तेच्या निवाड्यात दिल्याप्रमाणे जे मूल्य असेल त्या रकमेवर, | [१] [ शंभर रुपयांच्या] कमाल मर्यादेस अधीन राहून, बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क ; |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत, | [२] [ शंभर रुपये ; ] |
| **माफी** | |
| १८७च्या मुंबई ३. १९६५ चा महाराष्ट्र ४०. मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १८७४ याच्या कलम १८ खाली किंवा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याच्या कलम ३३० खाली केलेला निवाडा. | |
| १९५९ चा मुंबई * ३६. **१३. बंधपत्र :—** ऋणपत्र नसलेले व या अधिनियमाद्वारे किंवा मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ याद्वारे अन्यथा तरतूद न केलेले बंधपत्र (मग अशा तरतूदी विशिष्ट प्रकारच्या बंधपत्रांशी संबंधित असोत किंवा नसोत) — प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता. | [३] [ शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून, पाच रुपये. ] |
| **माफी** | |
| धर्मार्थ दवाखाना किंवा रुग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे अन्य कोणतेही प्रयोजन यांना देण्यात आलेल्या खाजगी अभिदानांपासून मिळणारे स्थानिक उत्पन्न दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून दिलेले बंधपत्र. | |
| **१४. नौतारण बंधपत्र :—** म्हणजे, ज्या संलेखाद्वारे समुद्रपर्यटन करणाऱ्या जहाजाचा नौकाधिपती जहाजाचे जतन करण्याकरिता किंवा त्या जहाजाचा जलप्रवास चालू रहाणे शक्य व्हावे म्हणून, त्या जहाजाच्या प्रतिभूतीवर पैसे कर्जाऊ घेतो असा कोणताही संलेख. | तितक्याच रकमेकरिता बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८(७)(अ) द्वारे “ पन्नास रुपयांच्या ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३८(७)(ब) द्वारे “ पन्नास रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(८) द्वारे “ पाच रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूची दि. १ मे १९६० पासून या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात “ महाराष्ट्र न्यायालय-फी अधिनियम ” अशी सुधारणा करण्यात आली.

| (१) | (२) |
|---|---|
| **१५. रद्द करणे :–** त्यासंबंधीचा संलेख – तो साक्षांकित केलेला असेल व त्याविषयी अन्यथा तरतूद केलली नसेल तर ; | [१] [ शंभर रुपये ; ] |
| **माफी** | |
| मृत्यूपत्र रद्द करणारा संलेख. | |
| **१६. विक्रीचे प्रमाणपत्र.–** (वेगवेगळ्या लॉट म्हणून ठेवलेल्या व विकलेल्या प्रत्येक मालमत्तेच्या संबंधात दिवाणी किंवा महसूल न्यायालयाने अथवा जिल्हाधिकाऱ्याने अथवा अन्य महसूल अधिकाऱ्याने किंवा जाहीर लिलावाद्वारे मालमत्ता विकण्यास ज्याला कायद्याने प्राधिकृत केले आहे अशा कोणत्याही अन्य अधिकाऱ्याने जाहीर लिलावात विकलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या खरेदीदारास दिलेले. | मालमत्तेच्या बाजार मूल्यावर, अनुच्छेद २५ याच्या यथास्थिति, खंड (अ), (ब), [२](क) अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| [३][**१७. प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज.–** असे प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज धारण करणाऱ्याचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींचा कायद्याने संस्थापित अशा कोणत्याही कंपनीतील किंवा कंपनीचे अथवा अन्य निगम निकायातील किंवा निगम निकायाचे कोणतेही शेअर्स, पावती पत्र (स्क्रिप) किंवा पुंजरोखा याबाबतचा हक्क किंवा मागणीहक्क यांचा पुरावा दर्शविणारे अगर अशा कोणत्याही कंपनीतील किंवा कंपनीचा अथवा निगम निकायातील किंवा निगम निकायाचा शेअर्स, पावतीपत्र (स्क्रिप) किंवा पुंजरोखा याचा मालक होण्याबाबतचा हक्क किंवा मागणीहक्क याचा पुरावा दर्शविणारे. | शेअर्स, पावतीपत्र (स्क्रिप) किंवा पुंजरोखा यांच्या मूल्याच्या दर एक हजार रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (शेअर्स वाटपपत्र (अनुच्छेद ३७) देखील पहावे); | |
| **स्पष्टीकरण.--** या अनुच्छेदाच्या प्रयोजनासाठी, शेअर्स, पावतीपत्र, (स्क्रिप) किंवा पुंजरोखा यांच्या मूल्यामध्ये अधिमूल्याची रक्कम, कोणतीही असल्यास, तिचा समावेश असेल.] | |

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(घ) द्वारे " चाळीस रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(३) द्वारे मूळ अनुच्छेद १७ ऐवजी हा अनुच्छेद १७ दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
| --- | --- |
| **१८. नौभाटक लेख.—** म्हणजे, ज्याद्वारे एखादे जलयान किंवा त्याचा एखादा विनिर्दिष्ट प्रमुख भाग भाड्याने घेणाऱ्याच्या विशिष्ट प्रयोजनांकरिता भाड्याने दिला जातो असा(खेच-आगबोटीच्या भाड्याचा करार वगळून) कोणत्याही संलेख— मग त्यात शास्तीविषयक खंडाचा समावेश असो किंवा नसो. | [१] [ शंभर रुपये ; ] |
| **१९. (१) वटवणी यादी.—** सरकारी रोख्यांचा खरेदीच्या किंवा विक्रीच्या व्यवहारासंबंधीची, रोखे बाजाराच्या वटवणी गृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदीपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, रोख्यांच्या मूल्यावर सौदापूर्ती किंमतीस किंवा यथास्थिति, करार किंमतीस अनुसरून परिगणित केलेल्या अनुच्छेद ५ (ब) किंवा यथास्थिति, ४३ (ग) यांखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| **(२) वटवणी यादी.—** कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनीतील किंवा अन्य निगम-निकायातील शेअर्स, पावती पत्र (स्क्रिप), पुंजरोखा, बंधरोखा, ऋणपत्र, ऋणपत्ररोखा किंवा तत्सम स्वरूपाचा इतर विक्रेय रोखा यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या व्यवहारासंबंधीची, (१९५६ चा ४२.) रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ खाली मान्यता मिळालेल्या रोखे बाजाराच्या वटवणी गृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदीपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, रोख्यांच्या मूल्यावर सौदापूर्ती किंमतीस किंवा यथास्थिति, करार किंमतीस अनुसरून परिगणित केलेल्या अनुच्छेद ५(क) (एक) किंवा यथास्थिति, ४३(फ) यांखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| **(३) वटवणी यादी.—** कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनीतील किंवा अन्य निगम-निकायातील शेअर, पावती पत्र (स्क्रिप), पुंजरोखा, बंधरोखा, ऋणपत्र, ऋणपत्ररोखा किंवा तत्सम स्वरूपाचा इतर विक्रेय रोखा यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या (१९५६ चा ४२.) व्यवहारासंबंधीची, रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ खाली मान्यता मिळालेल्या रोखे बाजाराच्या वटवणी गृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदीपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, रोख्यांच्या मूल्यावर सौदापूर्ती किंमतीस किंवा यथास्थिति, करार किंमतीस अनुसरून परिगणित केलेल्या अनुच्छेद ५(क) (दोन) किंवा यथास्थिति, ४३(फ) यांखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(९) द्वारे " वीस रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **२०. वटवणी यादी.—** कापसाच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या व्यवहारासंबंधीची, कापूस अधिसंघाच्या वटवणी गृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदीपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, व्यवहार-युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर अनुच्छेद ५(ड) यथास्थिति, ४३(अ) यांखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| **२१. वटवणी यादी.—** सोन्या-चांदीच्या लगडी व नाणी यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या व्यवहारासंबंधीची, सोने-चांदी अधिसंघाच्या वटवणी गृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदीपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, व्यवहार-युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर अनुच्छेद ५(ई) किंवा यथास्थिति, ४३(ब) यांखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| **२२. वटवणी यादी.—** गळित धान्यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या व्यवहारासंबंधीची, गळित धान्य अधिसंघाच्या वटवणी गृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदीपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, व्यवहार-युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर अनुच्छेद ५(फ) किंवा यथास्थिति, ४३(क) यांखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| **२३. वटवणी यादी.—** कोणत्याही प्रकारचे सूत किंवा खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या व्यवहारासंबंधीची. | अशा यादीतील नोंदीपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात व्यवहार-युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर अनुच्छेद ५(ग) किंवा यथास्थिति, ४३ (ड) यांखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| **२४. तडजोडनामा.—** म्हणजे, ज्याद्वारे एखादा ऋणको आपली मालमत्ता धनकोंच्या लाभासाठी अभिहस्तांकित करतो अथवा ज्याद्वारे अशा धनकोंना ऋणांसंबंधात तडजोड म्हणून किंवा तडजोडीचा हिस्सा म्हणून रक्कम मिळण्याबाबत हमी देण्यात येते अथवा ज्याद्वारे, धनकोंच्या लाभासाठी ऋणकोचा धंदा निरीक्षकांच्या देखरेखीखाली किंवा लायसनपत्रानुसार चालू राहावा म्हणून व्यवस्था केली जाते असा, एखाद्या ऋणकोने निष्पादित केलेला संलेख. | [१] [ दोनशे रुपये ; ] |

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(ड) द्वारे " शंभर रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **२५. अभिहस्तांतरणपत्र.—** (अनुच्छेद ५९ खाली ज्यावर शुल्क आकारण्यात येते किंवा ज्यास त्याबाबत माफी मिळते असे हस्तांतरणपत्र नव्हे)- | |
| अशा अभिहस्तांतरणपत्रासंबंधीची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेच्या [1][वास्तविक बाजार मूल्यावर],- | |
| (अ) जंगम मालमत्तेच्या बाबतीत असेल तर, प्रत्येक ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता ; | पंधरा रुपये. |
| [2][(ब) पुढील हद्दीत असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असेल तर,- | |
| (एक) कोणत्याही महानगरपालिकेच्या हद्दीत किंवा त्यालगत असलेल्या कोणत्याही कटक क्षेत्राच्या हद्दीत किंवा उप-खंड (दोन) मध्ये नमूद न केलेल्या कोणत्याही नागरी क्षेत्रात. | मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या ५ टक्के. |
| (दोन) कोणतीही नगरपालिका किंवा नगर पंचायत किंवा त्यालगत असलेल्या कोणत्याही कटक क्षेत्राच्या हद्दीत, किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही ग्रामीण क्षेत्रात, किंवा मुंबई मुद्रांक (मालमत्तेच्या प्रत्यक्ष बाजार मूल्याचे निर्धारण) नियम, १९९५ अन्वये प्रकाशित झालेल्या वार्षिक विवरणपत्रातील दराप्रमाणे प्रभाव क्षेत्रात. | मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या ४ टक्के. |
| (तीन) कोणत्याही ग्रामपंचायतीच्या हद्दीतील क्षेत्रात किंवा उप-खंड (दोन) मध्ये नमूद न करण्यात आलेल्या अशा कोणत्याही क्षेत्रात. | मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या ३ टक्के.”; |
| (क) जंगम व स्थावर अशा दोन्ही मालमत्तेच्या बाबतीत असेल तर,- | अनुच्छेद (अ) आणि (ब) अन्वये देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क. |
| [3][(ड) * * * ] | |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३८(ई) द्वारे “ बाजारमूल्यावर ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ग) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात येईल.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २(ग) (दोन) द्वारे खंड (ड) वगळण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| १९५६ चा १. [१][(डअ) कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ३९४ अन्वये कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा पुनर्रचनेच्या बाबतीतील उच्च न्यायालयाच्या आदेशाशी संबंधित असेल तर किंवा बँक १९४९ चा १०. विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ४४-अ खालील भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशाशी संबंधित असेल तर, | अदलाबदल करताना किंवा अन्यथा देण्यात आलेल्या किंवा वाटप करण्यात आलेल्या शेअर्सच्या बाजारमूल्याच्या आणि अशा एकत्रीकरणाकरिता दिलेल्या मोबदल्याच्या एकूण रकमेच्या १० टक्के :<br><br>परंतु, या खंडान्वये आकारणीपात्र असलेलली शुल्काची रक्कम,—<br><br>(एक) हस्तांतरक कंपनीच्या महाराष्ट्र राज्यात स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या वास्तविक बाजामूल्याच्या [२][५ टक्के] एवढी रक्कम; किंवा<br><br>(दोन) अदलाबदल करताना किंवा अन्यथा देण्यात आलेल्या किंवा वाटप करण्यात आलेल्या शेअर्सच्या बाजारमूल्याच्या आणि अशा एकत्रीकरणाकरिता दिलेल्या मोबदल्याच्या एकूण रकमेच्या [३][५ टक्के] एवढी रक्कम,<br><br>यांपैकी जी अधिकतम असेल त्या रकमेपेक्षा जास्त असणार नाही : |

१ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड १ जानेवारी, २००० पासून दाखल करण्यात आला.

२ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(१०)**(तीन)**(एक) द्वारे " सात टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ६(१०)**(तीन)**(दोन) द्वारे " सात टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| | परंत आणखी असे की, पुनर्रचनेच्या किंवा निर्विलीनीकरणाच्या बाबतीत आकारणीपात्र शुल्क,— |
| | (एक) निर्विलीनीकरण केलेल्या कंपनीकडून हस्तांतरित करण्यात आलेल्या निर्माणक कंपनीच्या महाराष्ट्र राज्यात स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या वास्तविक बाजारमूल्याच्या [1][५ टक्के] एवढी रक्कम; किंवा |
| | (दोन) निर्माणक कंपनीला देण्यात आलेल्या किंवा वाटप करण्यात आलेल्या शेअर्सच्या बाजारमूल्याची आणि अशा निर्विलीनीकरणाकरिता दिलेल्या मोबदल्याची रक्कम यांच्या एकूण रकमेच्या ०.७ टक्के, |
| | यांपैकी जी अधिकतम असेल त्या रमकेपेक्षा जास्त असणार नाही.] |

[2][(ई) [* * *];

**माफी**

१९५७ चा १४. कॉपीराइट अधिनियम, १९५५ खाली केलेले कॉपीराइटचे अभिहस्तांकन.

[1] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(१०)**(तीन)** द्वारे " ७ टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(४)(अ) द्वारे दिनांक १५ सप्टेंबर, १९९६ पासून खंड (ड) जादा दाखल करण्यात आला होता आणि सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ८१(क) द्वारे दिनांक १५ सप्टेंबर, १९९६ पासून खंड **(ई)** वगळण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][ [२][**स्पष्टीकरण एक**].– या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ, स्थावर मालमत्ता विकण्यासंबंधीच्या विक्रय करारनाम्याच्या बाबतीत जेव्हा, कोणत्याही स्थावर मालमत्तेचा कब्जा, असा करारनामा करण्यापूर्वी किंवा करतेवेळी किंवा केल्यानंतर [३][ * * * ] खरेदीदाराकडे हस्तांतरित करण्यात [४][ किंवा हस्तांतरित करण्याचे मान्य करण्यात ] येईल तेव्हा, असा विक्रय करारनामा हेच अभिहस्तांतरणपत्र असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यावर मुद्रांक शुल्क आकारण्यात येईल : | |
| परंतु, कलम ३२-अ च्या तरतुदी ज्याप्रमाणे त्या कलमाखालील अभिहस्तांतरपत्रास लागू होतात त्याप्रमाणे, पूर्वोक्तानुसार अभिहस्तांतरणपत्र म्हणून मानलेल्या अशा विक्रय करारनाम्यास योग्य त्या फेरफारांसह लागू होतील : | |
| परंतु आणखी असे की, अशा विक्रय करारनाम्यानुसार नंतर अभिहस्तांतरणपत्र करण्यात येईल त्याबाबतीत, अभिहस्तांतरणपत्र मानण्यात आलेल्या विक्रय करारनाम्यानुसार आधीच दिलेले व वसूल केलेले मुद्रांक शुल्क कोणतेही असल्यास ते, त्या अभिहस्तांतरण पत्रावरील बसवण्यायोग्य एकूण शुल्कापोटी समायोजित केले जाईल.] | |

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(४)(ब) द्वारे दोन्ही परंतुकांसह स्पष्टीकरण एक वगळण्यात आले होते. परंतु, ते अंमलात आले नाही. त्यानंतर सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ८(१) (ड) द्वारे विद्यमान " **स्पष्टीकरण एक** " दिनांक १७ ऑगस्ट, १९९४ रोजी जसे अस्तित्वात होते तसेच दिनांक १० डिसेंबर, १९८५ पासून अंमलात असल्याचे मानण्यात आले.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २(अ)(दोन) द्वारे या स्पष्टीकरणाला " **स्पष्टीकरण एक** " असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३(२) द्वारे " त्या संबंधीचे अभिहस्तांतरणपत्र न करता " हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८(१२)(२)(क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][ परंतु तसेच, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसंबंधीचा नोंदणीकृत करारनामा हा अभिहस्तांतरणपत्र आहे. असे मानून उचित मुद्रांक शुल्क भरले असेल आणि तद्‌नंतर, कोणतेही फेरबदल न करता अभिहस्तांतरणपत्र निष्पादित केले असेल तेव्हा असे अभिहस्तांतरण-पत्र, कलम ४ अन्वये दुसरा संलेख म्हणून समजण्यात येईल आणि त्यावर शंभर रुपये इतके शुल्क आकारण्यात येईल. ] | |
| [ [२][ **स्पष्टीकरण दोन.**— खंड (ड) च्या प्रयोजनांकरिता,— | |
| **(एक)** " युनिट " यात [इमारत नकाशामध्ये सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिल्याप्रमाणे ] सदनिका, वेश्म, गाळा किंवा वेश्मिका किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारे अन्य कोणतेही युनिट यांचा समावेश होतो; | |
| **(दोन)** जेथे युनिटे मिळून बनलेली इमारत निवासी आणि अनिवासी या दोन्ही प्रयोजनांकरिता वापरली जाते तेथे शुल्कामधील सूट, इमातरीमधील निवासी प्रयोजनांकरिता वापरण्यात येणाऱ्या युनिटांच्या मूल्याच्या बाबतीत उपलब्ध होईल आणि अनिवासी प्रयोजनांकरिता वापरण्यात येणाऱ्या युनिटांच्या बाबतीत देय असलेले शुल्क, अशा युनिटांचे जे मूल्य खंड (ब) आणि (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेले असेल त्या दराप्रमाणे असेल; | |
| **(तीन)** देय असलेले शुल्क, अशा अभिहस्तांतरणपत्रावर खंड (ख) आणि (ग) अन्वये देय असलेल्या शुल्काच्या रकमेपेक्षा जास्त असणार नाही; ] | |

[१] सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४(क) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ग)(तीन) द्वारे **स्पष्टीकरण दोन** वगळण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| [ [१][ **स्पष्टीकरण तीन.**– [२][ **(**एक) खंड (डअ) च्या प्रयोजनांकरिता,–<br><br>(अ) हस्तांतरिती कंपनीच्या संबंधात, ज्याचे शेअर्स व्यापाराकरिता रोखे बाजाराच्या यादीत आहेत आणि उद्‌धृत केले आहेत अशा शेअर्सचे बाजारमूल्य म्हणजे, एकत्रीकरणाच्या योजनेमध्ये नमूद केलेल्या नियत दिवसाला असलेले शेअर्सचे बाजारमूल्य किंवा जेव्हा तसा नियत दिवस निश्चित केलेला नसेल तेव्हा, उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या दिनांकास असलेले शेअर्सचे बाजारमूल्य; आणि<br><br>(ब) हस्तांतरिती कंपनीच्या संबंधात, ज्यांचे शेअर्स व्यापाराकरिता विनिमय केंद्राच्या यादीत नाहीत किंवा असून उद्‌धृत केलेले नाहीत अशा शेअर्सचे बाजारमूल्य म्हणजे, हस्तांतरक कंपनीच्या शेअर्सच्या बाजारमूल्याच्या संदर्भाने देण्यात आलेल्या किंवा नियत वाटप केलेल्या शेअर्सचे बाजारमूल्य किंवा हस्तांतरिती कंपनीला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावर जिल्हाधिकारी ठरवील असे बाजारमूल्य.]<br><br>[३][ (दोन) खंड (डअ) च्या प्रयोजनांकरिता, विनिमय किंवा अन्य मार्गाने देण्यात आलेले किंवा नियत वाटप करण्यात आलेले एकूण शेअर्स म्हणजे नियम दिनांकास विनिमय गुणोत्तर तक्त्यानुसार गणना करण्यात आलेल्या, हस्तांतरक कंपनीच्या शेअर्सची एकूण संख्या संख्या.] | |

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(४)(ब) द्वारे जादा दाखल करण्यात आलेले **" स्पष्टीकरण तीन "** सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ८(१)(ई) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(५)(दोन) द्वारे **" स्पष्टीकरण तीनच्या "** परिच्छेदास (एक) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(५)(दोन) द्वारे **" स्पष्टीकरण तीनच्या "** परिच्छेदास (एक) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि अशाप्रकारे नव्याने क्रमांक देण्यात आलेल्या परिच्छेद (एक) नंतर परिच्छेद (दोन) जादा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **२६. प्रत किंवा उतारा.—** भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ याच्या कलम ७६ अन्वये कोणत्याही लोक अधिकाऱ्याने किंवा त्याच्या आदेशावरून खरी प्रत किंवा उतारा म्हणून प्रमाणित केलेली आणि न्यायालय फीसंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये शुल्क आकारण्यास पात्र नसलेली. | [१][दहा रुपये] |
| **माफी** | |
| (अ) कोणत्याही सार्वजनिक कार्यालयातील अभिलेखासाठी किंवा सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या लोक अधिकाऱ्याने जी प्रत तयार करणे किंवा सादर करणे कायद्याद्वारे स्पष्टपणे आवश्यक केलेले आहे अशा कोणत्याही कागदपत्राची प्रत; | |
| (ब) जन्म, बाप्तिस्मा विधी, नामकरण विधी, समर्पण विधी, विवाह, घटस्फोट, मृत्यु किंवा दफन यासंबंधीच्या नोंदवहीली कोणत्याही नोंदीची प्रत किंवा तीमधील उतारा; | |
| (क) ज्याच्या मूळ प्रतीवर शुल्क आकारणीपात्र नसते अशा कोणत्याही संलेखाची प्रत. | |
| **२७. प्रतिलेख किंवा प्रतिलिपी.—** शुल्क आकारण्यास पात्र अशा संलेखाचा आणि ज्याच्या संबंधात योग्य शुल्क भरलेले आहे अशा कोणत्याही संलेखाचा प्रतिलेख किंवा त्याची प्रतिलिपी. | [२][शंभर रुपयांच्या] कमाल मर्यादेस अधीन राहून, मूळ संलेखावर देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क. |
| **२८. सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादनशुल्क बंधपत्र.—** म्हणजे, सीमाशुल्क अथवा उत्पादनशुल्क यांच्यापैकी कोणत्याही शुल्कासाठी किंवा त्यांच्यासंबंधात, अगर त्यांबाबत लबाडी किंवा चुकवेगिरी होऊ नये यासाठी, अगर त्यासंबंधीच्या कोणत्याही बाबीसाठी किंवा गोष्टीसाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींस अनुसरून अथवा सीमाशुल्क किंवा उत्पादनशुल्क विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या निदेशांना अनुसरून दिलेले कोणतेही बंधपत्र— | |

१८७२ चा १

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८ (१३) द्वारे “ पाच रुपये ” या मजकुरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(६) द्वारे “ वीस रुपयांच्या ” या मजकुरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (अ) रक्कम २,५०० रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत, | [१][शंभर रुपयांच्या] कमाल मर्यादेस अधीन राहून, अशा रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत, | [२][शंभर रुपये]. |
| **कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेसंबंधीचे घोषणापत्र.–** विश्वस्त-व्यवस्था (अनुच्छेद ६१) पहा. | |
| **२९. मालाच्या बाबतीतील सुपूर्दगी आदेश.–** म्हणजे, ज्या संलेखामुळे त्यात नामोल्लेख केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा तिच्या अभिहस्तांकितींना किंवा त्या संलेखाच्या धारकास, कोणत्याही गोदीत किंवा बंदरात अथवा जेथे भाडे किंवा किराया देऊन माल साठवला जातो किंवा ठेवला जातो अशा कोणत्याही वखारीत अथवा कोणत्याही मालधक्क्यावर पडून असलेला एखादा माल ताब्यात घेण्याचा [४][हक्क मिळत असून] जेव्हा मालाची किंमत शंभर रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा, असा संलेख, [५][प्रत्येक १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता]. | [३][दहा रुपये]. |
| **हक्कलेख निक्षेप.–** हक्कलेख निक्षेप, तारण निक्षेप किंवा तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा करारनामा (अनुच्छेद ६) पहा. | |

१ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८ (१५)(अ) द्वारे "पन्नास रुपयांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ३८(१५)(ब) " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ३८(१६) द्वारे " एक रुपया " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ३(२) द्वारे " हक्क मिळतो " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि " केलेला असून " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(५) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **भागीदारी विसर्जन.—** भागीदारी (अनुच्छेद ४७) पहा. | |
| [१][**स्पष्टीकरण.--** या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ, " गोदी किंवा बंदर " यामध्ये " विमानतळ " आणि " कागा हब " यांचा समावेश होईल.] | |
| **३०. घटस्फोट—** यासंबंधीचा संलेख म्हणजे, ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एखादी व्यक्ती आपल्या विवाहाचा विच्छेद करते असा संलेख. | [२][शंभर रुपये]. |
| **विधवादाय.—** यासंबंधीचा संलेख, संव्यवस्था (अनुच्छेद ५५) पहा. | |
| **प्रतिलिपी.—** प्रतिलेख (अनुच्छेद २७) पहा. | |
| १९९९ चा महा.२०. **३१. विवाह ज्ञापन नोंद.—** [३][महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८] खालील नोंदवहीतील. | [४][शंभर रुपये]. |
| **३२. मालमत्ता विनिमय.—** यासंबंधीचा संलेख. | अशा संलेखात दिल्याप्रमाणे सर्वाधिक मूल्याच्या मालमत्तेच्या बाजार मूल्यावर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब), [[५](क)] अन्वये अभिहस्तांतरण-पत्राच्या बाबतीत बसवण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |

१ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(७) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

२ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(क) द्वारे " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(८) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(११) " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(घ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **उत्पादनशुल्क बंधपत्र.—** सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादनशुल्क बंधपत्र (अनुच्छेद २८) पहा. | |
| [1][**स्पष्टीकरण.--** या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ, यात यापूर्वी काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, विनिमय केलेल्या कोणत्याही एका मालमत्तेवर असलेले सर्वाधिक शुल्क आकारणीयोग्य असेल.] | |
| **३३. अधिक प्रभार—** यासंबंधीचा संलेख म्हणजे, गहाण मालमत्तेवर अधिक प्रभार लादणारा कोणताही संलेख,- | |
| (अ) जेव्हा मूळ गहाण हे, अनुच्छेद ४० च्या खंड (अ) मध्ये उल्लेखिलेल्या वर्णनाचे (म्हणजे कब्जासह) असेल तेव्हा; | अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराच्या रकमेवर अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब) [2][(क)] अन्वये अभिहस्तां तरणपत्राच्या बाबतीत बसवण्यायोग्य असलेल्या शुल्का-इतके शुल्क. |
| (ब) जेव्हा असे गहाण हे, अनुच्छेद ४० खंड (ब) मध्ये उल्लेखिलेल्या वर्णनाचे (म्हणजे कब्जाविना) असेल तेव्हा,— | |
| (एक) जर अधिक प्रभाराचा संलेख निष्पादित करण्याच्या वेळी अशा संलेखान्वये मालमत्तेचा कब्जा देण्यात आला असेल तर; | प्रभाराच्या एकूण रकमेसाठी (मूळ गहाण व आधीच ठेवलेला कोणताही अधिक प्रभार धरून) अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब) [3][(क)] अन्वये अभिहस्तांतरण-पत्राच्या बाबतीत बसवण्यायोग्य असेल इतक्या शुल्काइतके शुल्क **वजा** अशा मूळ गहाणावर व अधिक प्रभारावर आधीच भरलेले शुल्क. |

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(९)(अ) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[2] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ड) द्वारे (क) किंवा (ड) मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ड.) द्वारे (क) किंवा (ड) या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (दोन) याप्रमाणे कब्जा देण्यात आला नसेल तर ; | [१][अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराच्या रकमेसाठी शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस आणि [२][दहा लाख रुपयांच्या] कमाल मर्यादेस अधीन राहून प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता [३][एक हजार रुपये] ]. |
| **३४. दान.-** यासंबंधीचा संलेख-संव्यवस्था (अनुच्छेद ५५) किंवा मृत्यूपत्र किंवा हस्तांतरण (अनुच्छेद ५९) सोडून अन्य. | दानाची विषयवस्तू आहे अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब) [४][(क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्का-इतके शुल्क :<br>[५][परंतु, मालमत्ता ही, दात्याचा पती, पत्नी, भाऊ किंवा बहीण असलेल्या कुटुंब सदस्याला किंवा दात्याच्या कोणत्याही वंशपरंपरागत पूर्वजाला किंवा वंशजाला दान केली असेल तर, बसविण्यायोग्य शुल्काची रक्कम ही, या अनुच्छेदामध्ये विनि-र्दिष्ट केली असेल त्याच दराने अथवा जी दानाची विषयवस्तू आहे अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर प्रत्येक पाचशे रुपयांसाठी किंवा त्याच्या भागासाठी दहा रुपये या दराने, यांपैकी जी कमी असेल अशी रक्कम असेल.] |

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २(ख) द्वारे " अशा लेखाद्वारे " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " असेल तितके शुल्क " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१०)(दोन) द्वारे " पाच लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५(१०)(एक) द्वारे " पाचशे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(च) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८(घ) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

| (१) | (२) |
| --- | --- |
| **किराया करारनामा** किंवा सेवा करारनामा.—करारनामा (अनुच्छेद ५) पहा. | |
| **३५. क्षतिपूर्ति बंधपत्र.—** | [१][दोनशे रुपये] |
| देखरेखनामा.—तडजोडनामा (अनुच्छेद २४) पहा. | |
| [२][ **३६. भाडेपट्टा.—** भाडेपट्टा किंवा पोट-भाडेपट्टा व भाड्याने किंवा पोट-भाड्याने देण्यासंबंधीचा कोणताही करारनामा किंवा भाडेपट्ट्याचे कोणतेही नवीकरण यांसह— | |
| (एक) असा भाडेपट्टा पाच वर्षांहून अधिक नाही अशा कालावधीकरिता असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत ; | मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या १० टक्के रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब) [३][किंवा (क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसवण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| (दोन) संभाव्य किंवा अन्य प्रकारच्या नवीकरण करण्याच्या खंडासह, भाडेपट्टा पाच वर्षांहून अधिक पण दहा वर्षांहून अधिक नाही इतक्या कालावधीकरिता असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत ; | मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या २५ टक्के रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब) [३][किंवा (क)] अन्वये अभिहस्तांतरण-पत्राच्या बाबतीत बसवण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(छ) द्वारे “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(११) द्वारे मूळ अनुच्छेदाऐवजी हा अनुच्छेद दाखल करण्यात आला आहे.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(छ) द्वारे “ क किंवा ड ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (तीन) संभाव्य किंवा अन्य प्रकारच्या नवीकरण करण्याच्या खंडासह, भाडेपट्टा दहा वर्षांहून अधिक पण एकोणतीस वर्षांहून अधिक नाही इतक्या कालावधीकरिता असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत; | मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या ५० टक्के रकमेवर, अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब) [१][किंवा (क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसवण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| (चार) संभाव्य किंवा अन्य प्रकारच्या नवीकरण करण्याच्या खंडासह, भाडेपट्टा एकोणतीस वर्षांहून अधिक कालावधीकरिता अथवा शाश्वत काळाकरिता असल्याचे अभिप्रेत असेल किंवा भाडेपट्टा कोणत्याही निश्चित कालावधीकरिता असल्याचे अभिप्रेत नसेल किंवा भाडेपट्टा एकोणतीस वर्षांहून अधिक कालावधीकरिता असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत ; | मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या ९० टक्के रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब) [१][किंवा (क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसवण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| **स्पष्टीकरण एक.—** पट्टामूल्य किंवा आगाऊ दिलेली किंवा आगाऊ द्यावयाची रक्कम किंवा प्रतिभूती ठेव यांच्या स्वरूपातील कोणत्याही नावाने संबोधला जाणारा कोणताही मोबदला हा, बाजार मूल्याच्या प्रयोजनार्थ, मान्य केलेला मोबदला आहे, असे समजण्यात येईल. | |
| **स्पष्टीकरण दोन.—** नवीकरणाचा कालावधी जर विनिर्देशपूर्वक नमूद केला असेल तर, त्यास, विद्यमान भाडेपट्ट्याचा भाग असल्याचे समजण्यात येईल. | |
| **स्पष्टीकरण तीन.—** या अनुच्छेदाच्या प्रयोजनासाठी, कलम २ (न) (तीन) (पथकर करार) आणि अनुच्छेद ५ (गई) (भाडे-खरेदी करार) याअंतर्गत येणाऱ्या संलेखांसाठी, बाजारमूल्य हे एकूण कंत्राट मूल्य असेल आणि त्यावर अनुच्छेद २५ च्या खंड (अ) अनुसार आकारलेल्या शुल्काइतकेच शुल्क आकारणीयोग्य असेल.] | |

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(छ) द्वारे “(क) किंवा (ड)” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][ **३६. अ. संमती-नि-परवानगी (लिव्ह ॲन्ड लायसेन्स) करारनामा –** | |
| [२][ (अ) जेथे संमती-नि-परवानगी करारनामा, नवीकरण खंडासह किंवा खंडाशिवाय, साठ महिन्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीसाठी, असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत. | (एक) करारनाम्यानुसार देय असलेले अनुज्ञप्ती शुल्क किंवा भाडे ; अधिक<br>(दोन) ना परतावा ठेवीची किंवा आगाऊ दिलेली किंवा आगाऊ द्यावयाची रक्कम किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे अधिमूल्य याची रक्कम अधिक ;<br>(तीन) परतावायोग्य प्रतिभूती ठेवीवर किंवा आगाऊ दिलेल्या किंवा आगाऊ द्यावयाच्या कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या रकमेवर १० टक्के दराने परिगणित केलेले व्याज,<br>यांच्या एकूण रकमेच्या ०.२५ टक्के इतकी रक्कम. |

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८(ङ) द्वारे मूळ अनुच्छेदाऐवजी हाअनुच्छेद दाखल करण्यात आला.

[२] सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४(ख) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [१][(ब) असा संमती-नि-परवानगी करार नवीकरण खंडासह किंवा खंडाशिवाय, साठ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी केल्याचे अभिप्रेत असेल अशा प्रकरणात ; | अनुच्छेद ३६ च्या यथास्थिति खंड (दोन), (तीन) किंवा (चार) अन्वये भाडेपट्ट्यावर बसवण्यायोग्य असेल तेवढे शुल्क ] ]; |
| **३७. शेअर्स वाटपपत्र.—** कोणत्याही कंपनीतील किंवा नियोजित कंपनीतील शेअर्सच्या वाटपासंबंधातील, अथवा कोणत्याही कंपनीने किंवा नियोजित कंपनीने उभारावयाच्या कोणत्याही कर्जाच्या संबंधातील शेअर्स वाटपपत्र. | एक रुपये. |
| **प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज (अनुच्छेद १७) देखील पहा.** | |
| **हमीपत्र.—** करार (अनुच्छेद ५) पहा. | |
| **३८. लायसनपत्र.—** म्हणजे, धनको आपल्या हक्कमागण्या विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत तहकूब ठेवील व ऋणकोला त्याच्या स्वविवेकानुसार व्यवहार चालू ठेवण्यास मुभा देईल असा, ऋणको व त्याचा धनको यांच्यादरम्यान झालेला कोणताही करार. | [२][शंभर रुपये] |

[१] वरील अधिनियमाच्या कलम ५ (१२)**(ख)** द्वारे हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(१३) द्वारे " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **३९. कंपनीचा संस्थापन समयलेख.—** | |
| १९५६ चा १. (अ) त्यासोबत कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २६ खालील संस्थापन नियमावली जोडली असेल तेव्हा ; | [१][दोनशे रुपये] |
| (ब) त्यासोबत अशारितीने संस्थापन नियमावली जोडली नसेल तेव्हा ; | कंपनीच्या भागभांडवलानुसार, अनुच्छेद १० खाली संस्थापन नियमावलीवर बसवण्यायोग्य असेल तितके शुल्क. |
| **माफी** | |
| १९५६ चा १. नफ्याकरिता स्थापन न केलेल्या व कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २५ अन्वये नोंदणी झालेल्या कोणत्याही अधिसंघाचा संस्थापन समयलेख. | |
| **४० गहाणखत.—** [२][ हक्कलेख-निक्षेप, हडप किंवा तारण किंवा तारणगहाण (अनुच्छेद ६),] नौतारण बंधपत्र (अनुच्छेद १४), पिकाचे गहाणखत (अनुच्छेद ४१), नौभर बंधपत्र (अनुच्छेद ५३), किंवा प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत (अनुच्छेद ५४) यासंबंधीचा करार वगळून अन्य, — | |
| (अ) जेव्हा अशा गहाणखतात समाविष्ट असलेल्या मालमत्तेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कब्जा गहाणकाराने दिलेला असेल किंवा देण्याचे कबूल केले असेल तेव्हा ; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब) किंवा [३][(क)] अन्वये अभि-हस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(एक) द्वारे " शंभर रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(१४) हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ज) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (ब) जेव्हा उपरोक्तप्रमाणे कब्जा दिलेला नसेल किंवा देण्याचे कबूल केले नसेल तेव्हा ; | [१][ अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस आणि [२][ दहा लाख रुपयांच्या] [३][ एक हजर रुपयांकरिता] किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये.] |

[४][ **स्पष्टीकरण एक ].--** जेव्हा गहाणकार हा, गहाणधारकास गहाण मालमत्तेचे किंवा तिच्या भागाचे भाडे गोळा करण्याकरिता मुखत्यारनामा देतो किंवा भाडेपट्टा देतो तेव्हा, त्याने या अनुच्छेदाच्या अर्थांतर्गत कब्जा दिला असल्याचे मानले जाईल.

[५][ **स्पष्टीकरण दोन .--** गहाण ठेवण्यासंबंधीच्या कराराच्या बाबतीत, अशा करारद्वारे प्रतिभूत करण्याचा हेतू असलेली रक्कम किंवा तिचा भाग गहाणखत निष्पादित करून न देता गहाणधारकाला आगाऊ देण्यात किंवा संवितरित करण्यात येईल त्याबाबतीत, कलम २ याच्या खंड (ड) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, गहाण ठेवण्यासंबंधीचा असा करार अशी रक्कम अंशतः किंवा पूर्णतः आगाऊ दिल्याच्या किंवा संवितरित केल्याच्या दिनांकापासून गहाणखत म्हणून या अनुच्छेदान्वये शुल्क आकारणीस पात्र ठरेल.]

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८(च) (दोन) द्वारे “ २,००,००० रुपायांच्या कमाल मर्यादेस ” या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि “ त्याच्या भागाकरिता दहा रुपये ” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१३)(दोन) द्वारे “ पाच लाख रुपयांचा ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५(१३)(एक) द्वारे “ पाचशे रुपयांकरिता ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३(३) द्वारे विद्यमान स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण एक असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३(३) द्वारे विद्यमान स्पष्टीकरणाला “ एक ” असा नव्याने क्रमांक देण्यात आला आणि त्यानंतर स्पष्टीकरण दोन समाविष्ट करण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| (ग) जेव्हा असे गहाणखत म्हणजे एखादी सांपार्श्विक किंवा सहाय्यकारी किंवा अतिरिक्त किंवा बदली प्रतिभूति असेल किंवा उपरोक्त प्रयोजनाकरिता अधिक हमीच्या स्वरूपात असेल तेव्हा, प्रमुख किंवा प्राथमिक प्रतिभूति रीतसर मुद्रांकित असेल तर, | [१][ दोनशे रुपयांच्या] कमाल मर्यादेस अधीन राहून, प्रतिभूत केलेल्या रकमेकरिता बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| [२][ **स्पष्टीकरण.--** या खंडाच्या प्रयोजनार्थ “ प्रमुख किंवा प्राथमिक प्रतिभूति ” याचा अर्थ, वरील खंड (अ) किंवा (ब) अन्वये निर्माण झालेली प्रतिभूति, असा आहे.] | |
| **माफी** | |
| (१) जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्जे अधिनियम, १८८४ यांन्वये कर्जाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा कर्जाऊ रकमांच्या परतफेडीसाठी प्रतिभूति म्हणून निष्पादित करून दिलेले संलेख. | |
| (२) विनिमयपत्रासोबत असणारे तारणगहाणपत्र. | |
| **४१. एखाद्या पिकाचे गहाणखत.—** एखाद्या पिकाच्या कोणत्याही गहाणावर दिलेल्या कर्जाची परतफेड प्रतिभूत करण्यासाठी केलेल्या कराराचा पुरावा असणारा कोणताही संलेख यासह— मग गहाणाच्या वेळी असे पीक अस्तित्वात असो अगर नसो— प्रत्येकी २०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता, | एक रुपया. |
| **४२. लेखप्रमाणकाचा लेख.—** म्हणजे, लेखप्रमाणक आपली पदीय कर्तव्ये पार पाडीत असताना त्याने किंवा अन्य कोणतीही व्यक्ती लेखप्रमाणक म्हणून कायदेशीरपणे काम करीत असताना तिने केलेले, प्रतिसाक्षन (अनुच्छेद ४९) वगळून अन्य कोणताही संलेख, पृष्ठांकन, अधिटिप्पणी, साक्षांकन, प्रमाणपत्र किंवा नोंद. | [३][ पंचवीस रुपये ] |

१८८३ चा १९.
१८८४ चा १२.

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(त्र) द्वारे “ शंभर रुपयांच्या ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४(५)द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८ (२१) द्वारे “ पाच रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **४३. टिप्पणी किंवा ज्ञापन.—** आपल्या प्रकर्त्याकरिता खाली दिलेल्या मालाची खरेदी किंवा विक्री केल्याचे कळविण्यासाठी त्या प्रकर्त्यास दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन — | |
| (अ) कापसाबाबत | [१][ कापसाच्या मूल्याच्या [२][०.००५ टक्के ]. |
| (ब) सोन्या-चांदीच्या लगडी किंवा नाणी यांबाबत | [३][ चांदी किंवा सोने किंवा यथास्थिती, सॉव्हरिनच्या मूल्याच्या, [४][०.००५ टक्के ]. |
| (क) गळित धान्यांबाबत | [५][ गळित धान्यांच्या मूल्याच्या, [६][०.००५ टक्के ]. |
| (ड) कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांबाबत. | [७][ कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा यथास्थिति, कोणत्याही प्रकारचे मसाले] यांच्या मूल्याच्या, [८][०.००५ टक्के ]. |

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१४)**(क)** द्वारे " ४५०० किलोग्रॅमच्या प्रत्येक व्यवहार युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(ख)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१४)**(ख)** द्वारे उपखंड (अ), (ब) व (क) च्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(ख)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१४)**(ग)** द्वारे " गळीत धान्यांच्या दर १०,००० किलोग्रॅम करिता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २**(ख)**(तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१४) **(घ)** द्वारे " राज्य शासन " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " मसाले " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(ख)(चार) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (ङ) वीस रुपयांहून अधिक मूल्याच्या इतर कोणत्याही मालाबाबत. | [१][ मालाच्या मूल्याच्या, [२][०.००५ टक्के ]. |
| (च) सरकारी रोखा नसलेला, वीस रुपयांहून अधिक मूल्याचा कोणताही शेअर्स, पावती पत्र (स्क्रिप), पुंजरोखा, बंधपत्र, ऋणपत्र, ऋणपत्ररोखा किंवा तत्सम स्वरूपाचा अन्य विक्रेय रोखा याबाबत. | रोख्याच्या यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळच्या मूल्याच्या, [३][०.००५ टक्के ]. |
| (छ) सरकारी रोख्याबाबत. | [४][ रोख्याच्या मूल्याच्या [५][०.००५ टक्के ]. |

**माफी**

(१) अनुच्छेद १९ याच्या खंड (१), (२) आणि (३) मध्ये वर्णन केलेल्या वटवणी याद्यांमध्ये जिच्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, दलालाने किंवा अभिकर्त्याने, आपल्या प्रकर्त्यांकरिता सरकारी रोखा किंवा कायद्याने संस्थापित कंपनीतील किंवा कंपनीचा अथवा इतर निगम-निकायातील किंवा निगम-निकायाचा शेअर्स, पावती पत्र (स्क्रिप), पुंजरोखा, बंधपत्र, ऋणपत्र, ऋणपत्ररोखा किंवा तत्सम स्वरूपाचा अन्य विक्रेय रोखा यांची खरेदी किंवा विक्री केल्याचे कळविण्यासाठी त्या प्रकर्त्यास पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१४)**(ङ)** द्वारे " दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(ख)(पाच) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(ख)(सहा) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१४) (च) द्वारे " त्या रोख्याच्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " अधीनतेने " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(ख)(सात) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (२) अनुच्छेद २० मध्ये वर्णन केलेल्या वटवणी यादीत ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, दलालाने किंवा अभिकर्त्याने आपल्या प्रकर्त्याकरिता कापसाची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल कळविण्यासाठी त्या प्रकर्त्यास पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन. | |
| (३) अनुच्छेद २१ मध्ये वर्णन केलेल्या वटवणी यादीत ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, दलालाने किंवा अभिकर्त्याने आपल्या प्रकर्त्याकरिता सोन्या-चांदीच्या लगडींची किंवा नाण्यांची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल कळविण्यासाठी त्या प्रकर्त्यास पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन. | |
| (४) अनुच्छेद २२ मध्ये वर्णन केलेल्या वटवणी यादीत ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, दलालाने किंवा अभिकर्त्याने आपल्या प्रकर्त्याकरिता गळित धान्यांची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल कळविण्यासाठी त्या प्रकर्त्यास पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन. | |
| (५) अनुच्छेद २३ मध्ये वर्णन केलेल्या वटवणी यादीत ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, दलालाने किंवा अभिकर्त्याने आपल्या प्रकर्त्याकरिता कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल कळविण्यासाठी त्या प्रकर्त्यास पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन. | |
| (६) संलेखात नमूद केलेली रक्कम शंभर रुपयांपेक्षा कमी असेल त्याबाबतीत, वर नमूद केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात दलालाने किंवा अभिकर्त्याने आपल्या प्रकर्त्यास पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन. | |
| [१][ **स्पष्टीकरण.--** दलालाने किंवा अभिकर्त्यांने आपल्या प्रकर्त्याकरिता केलेल्या रोख्यांच्या खरेदी किंवा विक्रीबाबत अथवा वायदा संविदेबाबत ज्यावर अनुच्छेद ५१-अ अन्वये, योग्य शुल्क भरलेले असेल-त्या प्रकर्त्याला कळविण्यासाठी पाठवलेल्या टिप्पणीवर किंवा ज्ञापनावर कोणतेही शुल्क आकारणीपात्र असणार नाही.] | |

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१४)(छ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **४४ नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयी अधिटिप्पणी.–** नौकाधिपतीचे अधिकथन (अनुच्छेद ५०) देखील पहा. | [१][शंभर रुपये] |
| **४५. पैसे देण्याचा आदेश.–** भारतीय मुद्रांक अधिनियम, (१८९९ चा २.) १८९९ च्या अर्थानुसार विनिमयपत्र नसलेला- | |
| (क) मागणीवरून नव्हे तर अन्यथा, परंतु दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत देय असेल त्याबाबतीत,- प्रत्येक १,००० रुपये किंवा त्याच्या भागासाठी, | [२][दहा रुपये] |
| (ख) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर एक वर्षापेक्षा जास्त अवधी पर्यंत देय असेल त्या बाबतीत, जर रक्कम- | |
| (एक) ५०० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | [३][दहा रुपये] |
| (दोन) ५०० रुपयांपेक्षा अधिक परंतु १,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | [४][वीस रुपये] |
| (तीन) १,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, त्यानंतरच्या प्रत्येक १,००० रुपयांसाठी किंवा त्याच्या भागासाठी. | [५][वीस रुपये] |

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(१५) द्वारे " वीस रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८(२३)(अ) द्वारे " पाच रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३८(२३)**(ब)** (एक) द्वारे " पाच रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३८(२३)**(ब)** (दोन) द्वारे " दहा रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३८(२३)**(ब)** (तीन) द्वारे " दहा रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
| --- | --- |
| **४६. वाटणी.—यासंबंधीचा संलेख** | मालमत्तेतून वेगळ्या काढलेल्या हिश्श्याच्या किंवा हिश्श्यांच्या बाजार-मूल्याच्या रकमेचा [1][प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दहा रुपये]; |
| | **टीप.—** मालमत्तेची वाटणी केल्या-नंतर उरलेला सर्वांत मोठा हिस्सा हा, (किंवा जर सारख्याच मूल्याचे दोन किंवा अधिक हिस्सा असून ते अन्य हिश्श्यांपैकी कोणत्याही हिश्श्यापेक्षा लहान नसतील तर, अशा समान हिश्श्यांपैकी एक हिस्सा हा) ज्यापासून इतर हिस्से वेगळे काढले आहेत त्याचाच हिस्सा असल्याचे मानण्यात येईल : |
| | परंतु नेहमी असे की, |
| | (अ) जेव्हा मालमत्तेच्या वेग-वेगळ्या हिश्श्यांत वाटण्या करण्याबाबतचा एखादा करार समाविष्ट असलेला वाटणी संलेख निष्पादित केलेला असेल व अशा करारास अनुसरून वाटण्या झाल्या असतील तेव्हा, अशा वाटण्या घडवून आणणाऱ्या संलेखावर आकारणीपात्र असलेल्या शुल्कातून पहिल्या संलेखावर दिलेल्या शुल्काची रक्कम कमी केली जाईल, परंतु, ते शुल्क पाच रुपयांहून कमी असणार नाही; |

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(ब) ६(एक) द्वारे “ बंधपत्रावरील (अनुच्छेद-१३) शुल्काएवढे शुल्क ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| | [१][(ब) ज्या बाबतीत संलेख हा शेतजमिनीच्या वाटणीच्या संबंधातील असेल त्याबाबतीत लागू असलेला शुल्काचा दर हा [२][शंभर रुपये इतका असेल] ]; |
| | (क) जेव्हा कोणत्याही महसूल प्राधिकरणाने किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाने वाटणी घडवून आणण्याविषयी दिलेला अंतिम आदेश किंवा वाटणीचा निर्देश देण्याकरिता लवादाने दिलेला एखादा निवाडा यावर वाटणी संलेखाकरिता आवश्यक असलेला मुद्रांक लावलेला असेल आणि अशा आदेशास किंवा निवाड्यास अनुसरून नंतर वाटणी संलेख निष्पादित करून देण्यात आला असेल त्याबाबतीत, अशा संलेखावरील शुल्क दहा रुपयांहून अधिक असणार नाही. |
| **४७. भागीदारी.–** | |
| [३][(१) भागीदारीचा संलेख– | |
| (अ) भागीदारीमध्ये अंशदानाचा हिस्सा नसेल किंवा असा अंशदानाचा हिस्सा [४][रोख रकमेच्या स्वरूपात आणलेल्या] ५०,००० रुपयांहून अधिक नसेल त्या बाबतीत, | पाचशे रुपये. |

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(६)(दोन) द्वारे खंड (ख) दाखल करण्यात आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ८(२) द्वारे " मालमत्तेच्या विभक्त " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " इतका असेल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(८) द्वारे मूळ खंड (क) ऐवजी खंड (१) दाखल करण्यात आला.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ८(३)(अ)(एक) द्वारे " असा अंशदानाचा हिस्सा " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
| --- | --- |
| (ब) असा अंशदानाचा हिस्सा [१][रोख रकमेच्या स्वरूपात आणलेल्या] ५०,००० रुपयांहून अधिक असेल त्या बाबतीत, प्रत्येक ५०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता, | पाच हजार रुपये शुल्काच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, पाचशे रुपये.] |
| [२][(क) असा अंशदानाचा हिस्सा रोख रक्कम वगळता, मालमत्तेच्या स्वरूपात आणलेला असेल त्या बाबतीत, | अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब), [३][(क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| [४][(२) [५]**[भागीदारीचे विसर्जन किंवा भागीदाराची निवृत्ती-** | |
| (एक) जेव्हा कोणतीही मालमत्ता, ज्या भागीदाराने आपल्या वाट्याचे अंशदान म्हणून ती भागीदारीत आणली त्याहून अन्य भागीदाराने भागीदारीचे विसर्जन झाले असता किंवा एखादा भागीदार निवृत्त झाल्यावर] आपला हिस्सा म्हणून ताब्यात घेतली असेल तेव्हा; | अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब), [६][(क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क, मात्र ते किमान शंभर रुपये असेल; |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत, | [७][दोनशे रुपये] |

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ८(३)(अ)(दोन) द्वारे " असा अंशदानाचा हिस्सा " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८(३)(अ)(तीन) द्वारे उपखंड (ग) जादा दाखल करण्यात आला.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(त्र) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८(२४)(ब) द्वारे खंड (ख) ला खंड (२) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[५] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ८(३) (ब) द्वारे " भागीदारीचे विसर्जन " या शब्दांनी सुरू होणाऱ्या व " विर्सजन झाले असता " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(झ) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३८(२४)(ब) द्वारे " शंभर रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | |
|---|---|---|
| **४८. मुखत्यारनामा.—** | | |
| प्रतिपत्र नसलेला अन्य — | | |
| (अ) जेव्हा एकाच व्यवहाराच्या संबंधात एका किंवा अधिक दस्तऐवजांची नोंदणी करण्याचा एकमेव प्रयोजनासाठी किंवा असे एक किंवा अधिक दस्तऐवज निष्पादित केल्याचे कबूल करण्यासाठी केला असेल तेव्हा ; | [१][शंभर रुपये] | |
| (ब) जेव्हा इलाखा लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२ याखालील दाव्यांत किंवा कार्यवाहीत आवश्यक असेल तेव्हा ; | [२][शंभर रुपये] | १८८२ चा १५. |
| (क) जेव्हा त्यामुळे खंड (क) मध्ये उल्लेखिलेल्या बार्बीहून अन्य अशा एकाच व्यहारात एका किंवा अधिक व्यक्तींना काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा ; | [३][शंभर रुपये] | |
| (ड) जेव्हा त्यामुळे एका व्यक्तीला एकापेक्षा अधिक व्यहारात किंवा सर्वसाधारणपणे काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा ; | [४][शंभर रुपये] | |
| (ई) जेव्हा त्यामुळे एकापेक्षा अधिक व्यक्तींना संयुक्तपणे किंवा पृथकपणे किंवा सर्वसाधारणपणे एका किंवा एकापेक्षा अधिक व्यवहारांत काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा ; | [५][शंभर रुपये] | |

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(७)(एक) द्वारे “ दहा रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १४(७)(दोन) द्वारे “ दहा रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १४(७)(तीन) द्वारे “ दहा रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १४(७)(चार) द्वारे “ दहा रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १४(७)(पाच) द्वारे “ किमान चाळीस रुपये या मर्यादेच्या अधीनतेने, प्रत्येक प्राधिकृत व्यक्तीकरिता दहा रुपये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (फ) [१] (एक) जेव्हा तो प्रतिफलार्थ देण्यात आला असून त्यामुळे कोणतीही स्थावर मालमत्ता विकण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | अशा मालमत्तेच्या बाजार मूल्यावर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (अ), (ब), [२] [(क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्का-इतके शुल्क. |
| [१] (दोन) जेव्हा त्यामुळे प्रतिफलाशिवाय किंवा, यथास्थिति, कोणतेही प्रतिफल दर्शविल्याशिवाय स्थावर मालमत्ता विकण्याचा किंवा तिचे हस्तांतरण करण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा,— | |
| (क) जर अशी मालमत्ता वडील, आई, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगी, नातू, नात किंवा अशी इतर जवळची नातेवाईक व्यक्ती यांना देण्यात आलेली असेल तर; आणि | पाचशे रुपये |
| (ख) इतर कोणत्याही बाबतीत | मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या खंड (ब), (क) किंवा यथास्थिति (ड) अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत आकारणीयोग्य असते, तितके शुल्क; |

[१] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २(ख)(एक) द्वारे उपखंड (दोन) हा मजकूर जादा दाखल करण्यात आला आणि खंड (फ) ला त्याचा (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(त्र) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [३] (ग) जेव्हा कोणतीही स्थावर मालमत्ता, त्यावर बांधकाम करण्यासाठी, तिचा विकास करण्यासाठी किंवा विक्री किंवा हस्तांतरण करण्यासाठी (कोणत्याही रीतीने) कोणत्याही नावाने ओळखण्यात येणाऱ्या प्रवर्तकाकडे किंवा विकासकाकडे देण्यात येईल तेव्हा; | [४][ मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या खंड (ब), [५][(क)] अन्वये अभिहस्तांतरण-पत्रांच्या बाबतीत आकारणीयोग्य असते, तितके शुल्क ]<br><br>परंतु, कलम ३२-अ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह, त्या कलमा-खालील अभिहस्तांतरणपत्रास त्या ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे अशा मुखत्यारनाम्याच्या संलेखास लागू होतील;<br><br>परंतु, आणखी असे की, ज्या बाबतीत त्याच मालमत्तेच्या संबंधात त्याच पक्षकारामध्ये निष्पादित करण्यात आलेला करारनामा किंवा त्याचे अभिलेख किंवा करार-नाम्याच्या संक्षेप लेख यावर अनुच्छेद ५ च्या खंड (गअ) अन्वये यथोचित मुद्रांक शुल्क भरण्यात आलेले असेल त्याबाबतीत, या खंडान्वये आकारणीपात्र शुल्क शंभर रुपये इतके असेल ]; |

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३(क) द्वारे मूळ खंड (छ) ऐवजी (छ) आणि (ज) दाखल करण्यात आला.

[४] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २(ख) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २(त्र) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

| (१) | (२) |
|---|---|
| (ज) इतर कोणत्याही बाबतीत, | [१] [ प्रत्येक प्राधिकृत व्यक्तीकरिता शंभर रुपये ]. |
| **स्पष्टीकरण एक.—** या अनुच्छेदाच्या प्रयोजनाकरिता एकाच भागीदारी संस्थेशी संबंधित असलेल्या एकाहून अधिक व्यक्तींना एकच व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल. | |
| **स्पष्टीकरण दोन.—** " नोंदणी " या संज्ञेत नोंदणी अधिनियम, १९०८ याखालील नोंदणीसंबंधीची प्रत्येक आनुषंगिक क्रिया समाविष्ट होते. (१९०८ चा १६.) | |
| **स्पष्टीकरण तीन.—** जेव्हा खंड (फ) खालील मुखत्यारनाम्यावर शुल्क देण्यात आले असेल आणि मुखत्यारनामा निष्पादित करून देणारा आणि ज्याच्या प्रीत्यर्थ मुखत्यारनामा निष्पादित करून देण्यात आला अशी व्यक्ती यांच्या दरम्यान त्या मालमत्तेच्या संबंधात मुखत्यारनाम्यानुसार अभिहस्तांतरणपत्र निष्पादित करण्यात आले असेल तर, अभिहस्तांतरणपत्रावरील शुल्क हे, मालमत्तेच्या बाजार मूल्यातून मुखत्यारनाम्यावर दिलेले शुल्क वजा जाता येणाऱ्या रकमेवर आकारण्यात येईल. | |
| **४९. विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी याबाबतचे प्रतिसाक्षन.—** म्हणजे, लेखप्रमाणकाने किंवा कायदेशीरपणे लेखप्रमाणक म्हणून काम करणाऱ्या इतर व्यक्तीने विनिमयपत्राचा किंवा वचनचिठ्ठीचा अवमान झाल्याचे साक्षांकित करण्यासाठी केलेले कोणतेही लेखी अधिकथन. | [२] [ शंभर रुपये ] |
| **५०. नौकाधिपतीचे अधिकथन.—** म्हणजे, तोट्यांचे समायोजन किंवा हानिसरासरींची परिगणना करण्याच्या दृष्टीने जहाजाच्या सफरींच्या तपशिलासंबंधी नौकाधिपतीने लिहून दिलेले कोणतेही अधिकथन आणि जहाजावर माल न चढविण्याबद्दल किंवा जहाजातून तो न उतरवण्याबद्दल जहाज भाड्याने घेणाऱ्या किंवा माल प्रेषिती | [३] [ शंभर रुपये ] |

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(१६) द्वारे " प्रत्येक प्राधिकृत व्यक्तीसाठी पाच रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(१७) द्वारे " वीस रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६(१८) द्वारे " वीस रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| व्यक्तीविरुध्द त्याने लेखी केलेले अधिकथन, लेखप्रमाणकाने किंवा कायदेशीरपणे लेखप्रमाणक म्हणून काम करणाऱ्या इतर व्यक्तीने साक्षांकित किंवा प्रमाणित केले असेल तेव्हा, असे प्रत्येक अधिकथन. | |
| नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयी अधिटिप्पणी देखील (अनुच्छेद ४४ पहा). | |
| **५१. गहाण मालमत्तेचे प्रत्यंतरणपत्र.—** | |
| (अ) ज्या करता मालमत्ता गहाण ठेवली असेल अशा प्रतिफलाची रक्कम २,५०० रुपयांहून अधिक नसेल तर; | प्रत्यंतरणपत्रात लिहिलेल्या अशा प्रतिफलाइतक्या रकमेच्या बंधपत्रा-वरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत | [१] [ दोनशे रुपये ] |
| [२] [**५१-अ. व्यवहाराचा अभिलेख.—** कलम १०-ब मध्ये उल्लेख केलेल्या रोखे बाजार किंवा संघ यांच्यामार्फत व्यापारी सदस्याने केलेल्या व्यवहाराचा अभिलेख (इलेक्ट्रॉनिक किंवा अन्यथा),— | |
| (अ) सरकारी रोख्यांच्या विक्री आणि खरेदीच्या संबंधात असेल तर, | रोख्याच्या मूल्याच्या [३] [ ०.००५ टक्के ] |
| (ब) वरील बाब (अ) खाली मोडत असतील अशा रोख्यांव्यतिरिक्त,— | |
| रोख्यांच्या खरेदी किंवा विक्रीच्या संबंधात असेल तर,— | |
| (एक) बटवडा झाला असेल त्या बाबतीत, | [४] [ रोख्याच्या मूल्याच्या ०.००५ टक्के ]. |

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(३)(ट) द्वारे " शंभर रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१५) द्वारे अनुच्छेद **५१-अ** समाविष्ट करण्यात आला.

[३] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(ग)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(ग)(दोन)(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (दोन) बटवडा झाला नसेल त्या बाबतीत, | [१] [ रोख्याच्या मूल्याच्या ०.००५ टक्के ]. |
| (क) वायद्याचे सौदे व विकल्पाधिकारांच्या व्यापाराच्या संबंधात असेल तर, | [२] [ वायद्याचे सौदे व विकल्पाधिकारांच्या व्यापाराच्या मूल्याच्या ०.००५ टक्के ]. |
| (ड) एखाद्या संघामार्फत किंवा अन्यथा व्यापार करण्यात आलेल्या वस्तूंच्या वायदा संविदांच्या संबंधात असेल तर; | [३] [ वायदा संविदेच्या मूल्याच्या ०.००५ टक्के ]. |
| **स्पष्टीकरण.—** खंड (ब) च्या प्रयोजनासाठी “रोखे” याचा अर्थ, रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या खंड (ज) मध्ये व्याख्या केलेले रोखे, असा आहे. ] | १९५६ चा ४२. |
| [४] [ **५२. परिमोचनपत्र.—** म्हणजे, ज्या संलेखाद्वारे (ज्याविषयी, कलम २४ मध्ये तरतूद केली आहे असा संलेख नसणारा) एखादी व्यक्ती अन्य व्यक्तीसाठी किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट मालमत्तेवरील हक्कमागणी सोडून देते असा कोणताही संलेख,— | |
| (अ) जर वडिलोपार्जित मालमत्ता किंवा तिचा भाग यासंबंधातील परिमोचनपत्र, भाऊ किंवा बहीण (हक्क सोडून दिलेल्या व्यक्तीच्या आईवडिलांची मुले) अथवा मुलगा किंवा मुलगी अथवा पूर्वी मरण पावलेल्या मुलाचा मुलगा अथवा पूर्वी मरण पावलेल्या मुलाची मुलगी अथवा हक्क सोडून दिलेल्या व्यक्तीचे वडील किंवा आई अथवा पती/पत्नी किंवा वरीलपैकी नातेसंबंध असणाऱ्या व्यक्तीचे कायदेशीर वारस यांनी किंवा त्यांच्यावतीने निष्पादित केले असेल तर, | दोनशे रुपये |

[१] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २(ग)(दोन)(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(ग) (तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(ग) (चार) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४(६) द्वारे अनुच्छेद ५२ दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत, | सोडून दिलेला हिस्सा, हितसंबंध, भाग किंवा हक्कमागणी यांच्या बाजार मूल्यावर अनुच्छेद २५ च्या खंड (अ), (ब), [१][क] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्का इतके शुल्क.] |
| **५३. नौभार बंधपत्र.—** म्हणजे, जहाजावर चढवलेल्या किंवा चढवावयाच्या मालावरील कर्ज प्रतिभूत करणारा आणि त्या कर्जाची परतफेड नियत बंदरावर माल पोहोचण्यावर अवलंबून असणारा कोणताही संलेख. | प्रतिभूत केलेल्या कर्जाच्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| **कोणतीही विश्वस्तव्यवस्था किंवा संव्यवस्था रद्द करणे.—** संव्यवस्था (अनुच्छेद ५५), विश्वस्तव्यवस्था (अनुच्छेद ६१) पहा. | |
| **५४. प्रतिभूति-बंधपत्र किंवा गहाणखत.—** एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याकरिता प्रतिभूति म्हणून, अथवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्याकरिता निष्पादित केलेले अथवा एखाद्या कराराच्या रीतसर पालनाची हमी म्हणून एखाद्या जामीनदाराने निष्पादित करून दिलेले अथवा न्यायालयाच्या किंवा लोक अधिकाऱ्याच्या आदेशास अनुसरून निष्पादित करून दिलेले, परंतु मुंबई न्यायालय फी अधिनियम, (१९५९ चा मुंबई ६०.) १९५९ द्वारे अन्यथा तरतूद न केलेले :— | |

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ट) द्वारे "(क) किंवा, यथास्थिति (ड)" यथास्थिति (३) या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (एक) जेव्हा प्रतिभूत केलेली रक्कम २,५०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रा-वरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| [१][ (दोन)] प्रतिभूत केलेली रक्कम २,५०० रुपयांहून अधिक असेल तेव्हा, प्रतिभूत केलेल्या रकमेच्या प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता; | [२][ अनुच्छेद ४० च्या खंड (ख) अन्वये बसविण्यायोग्य असेल तेवढेच शुल्कः<br>परंतु, जिच्यासाठी एखादी व्यक्ती जामीन राहिली आहे किंवा तिने प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत करून दिलेले आहे अशा एखाद्या व्यक्तीकडून करण्यात आलेल्या एखाद्या संलेखावर अनुच्छेद [३][ *** ] ४० अन्वये शुल्क भरले असेल त्याबाबतीत, शंभर रुपये एवढे शुल्क देय असेल.] ] |

**माफी**

बंधपत्र किंवा अन्य संलेख जेव्हा,----

(अ) धर्मार्थ दवाखाना, रुग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे इतर कोणतेही उद्दिष्ट यांसाठी देण्यात येणाऱ्या खाजगी अंशदानातून होणारे स्थानिक उत्पन्न, दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने;

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ (९) द्वारे खंड (दोन) दाखल करण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८(छ) द्वारे " जास्तीत जास्त रु. २,००,००० इतक्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " देय असलेल्या शुल्काबद्दल समायोजित करण्यात येईल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४(७) द्वारे " ६ किंवा " हा मजकूर वगळण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| १८७६ चा महाराष्ट्र ३८. (ब) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम ११४ अन्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांनुसार, | |
| १८८३ चा १९. १८८४ चा १२. (क) जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्जे अधिनियम, १८८४ यांन्वये कर्जाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा कर्जाऊ रकमांच्या परतफेडीबद्दलची प्रतिभूति म्हणून; | |
| (ड) एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याबद्दल किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा योग्य हिशेब देण्याबद्दल प्रतिभूति म्हणून शासकीय अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी; | |
| निष्पादित करून दिलेला असेल तेव्हा. | |
| **५५. संव्यवस्था.—** | |
| **अ** — यासंबंधीचा संलेख — | |
| विधवादाय विलेखासह, — | |
| (एक) असे संव्यवस्थापत्र धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनार्थ करण्यात आले असेल त्या बाबतीत; | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजार मूल्याइतक्या रकमेच्या [१] [ प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दहा रुपये ; ] |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत; | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजार मूल्याइतक्या — |

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(१०) द्वारे " बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क " या मजुकराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| | रकमेकरिता अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब), [१][क] अन्वये बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क.<br><br>परंतु, जेथे संव्यवस्था करण्या-बद्दलच्या करारपत्रावर संव्यवस्था संलेखासाठी आवश्यक असणारा मुद्रांक लावलेला असून, त्या करारपत्रानुसार त्यानंतर संव्यवस्था-संलेख निष्पादित करण्यात आला असेल तेथे, त्या संव्यवस्था संलेखां-वरील शुल्क दहा रुपयांहून अधिक असणार नाही :<br><br>परंतु आणखी असे की, जेव्हा संव्यवस्था-संलेखात संव्यवस्था रद्द करण्याविषयी कोणतीही तरतूद केलेली असेल तेव्हा, संव्यवस्था केलेल्या मालमत्तेची रक्कम किंवा मूल्य, शुल्काच्या प्रयोजनासाठी जणू काही अशा कोणत्याही तरतुदी अशा संलेखात अंतर्भूत नव्हत्या असे समजून ठरविण्यात येईल. |

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ठ) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **माफी** | |
| मुसलमानांमधील विवाहाच्या वेळी किंवा त्यासंबंधी — मग तो विवाह होण्यापूर्वी असो वा नंतर असा— निष्पादित करून दिलेला मेहेरसंबंधीचा विलेख :-- | |
| ब — संव्यवस्थापत्र रद्द करण्याबद्दलचा संलेख :— | |
| (एक) वरील खंड अ च्या उपखंड (एक) मध्ये वर्णन केलेल्या संव्यवस्थापत्राच्या संबंधात; | संव्यवस्था रद्द करण्याबद्दलच्या संलेखात नमूद केल्याप्रमाणे संव्यवस्था केलेली रक्कम किंवा संबंधित मालमत्तेचे बाजार मूल्य यांच्याइतक्या समान रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क-परंतु, हे शुल्क [१][ दोनशे रुपयांहून] अधिक असणार नाही. |
| (दोन) वरील खंड अ च्या उपखंड (दोन) मध्ये वर्णन केलेल्या संव्यवस्थापत्राच्या संबंधात; | संव्यवस्था रद्द करण्याबद्दलच्या संलेखात नमूद केल्याप्रमाणे संव्यवस्था केलेली रक्कम किंवा संबंधित मालमत्तेचे बाजार मूल्य यांच्याइतक्या समान प्रतिफलार्थ केलेल्या अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब), [२][ क ] अन्वये बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क — परंतु, हे शुल्क [३][ दोनशे रुपयांहून] अधिक असणार नाही. |

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६ (ड) (एक) द्वारे " शंभर रुपयांहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ठ) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(ड) (दोन) द्वारे " शंभर रुपयांहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | |
|---|---|---|
| **५६. शेअर अधिपत्रे (वॉरंटस्).—** कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये धारणकर्त्यांला दिलेली, प्रत्येक पाचशे रुपयांसाठी किंवा त्याच्या भागासाठी. | पाच रुपये | १९५६ चा १. |
| **माफी** | | |
| त्या शुल्काबद्दल तडजोडीची रक्कम म्हणून पुढील रक्कम मुद्रांक शुल्क समाहारकाकडे भरल्यावरच केवळ जे अंमलात यावयाचे असे, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ११४ च्या तरतुदीअनुसार एखाद्या कंपनीने काढलेले शेअर अधिपत्र (वॉरंट).— | | १९५६ चा १. |
| ती तडजोडीची रक्कम याप्रमाणे :— | | |
| (अ) कंपनीच्या संपूर्ण अभिदत्त भांडवलाच्या **दीड टक्का,** किंवा; | | |
| (ब) जर कोणत्याही कंपनीने उक्त शुल्क किंवा तडजोडीची रक्कम पूर्णपणे चुकती केलेली असेल तिने जर त्यानंतर, आपल्या अभिदत्त भांडवलाच्या जोडीला आणखी शेअर्स विक्रीस काढले तर, अशा जास्तीच्या भांडवलाच्या **दीड टक्का.** | | |
| **पावती पत्र (स्क्रिप).—** प्रमाणपत्र (अनुच्छेद १७) पहा. | | |
| **५७. नौवहन आदेश.—** कोणत्याही जहाजावरून माल वाहून नेण्यासाठी किंवा वाहून नेण्यासंबंधी काढलेला. | एक रुपया | |

| (१) | (२) |
|---|---|
| [१] [ **५८. भाडेपट्टयाच्या प्रत्यर्पणाच्या करारासह भाडेपट्टयाच्या प्रत्यर्पण लेख.–** | |
| (अ) कोणत्याही मोबदल्याशिवाय | दोनशे रुपये; |
| (ब) मोबदल्यासह. | मोबदल्याच्या रकमेवर, अनुच्छेद २५ याच्या खंड (अ), (ब), [२][ किंवा (क) ] अन्वये बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| **स्पष्टीकरण.**— या अनुच्छेदाच्या प्रयोजनांसाठी, प्रतिभूति ठेवीवर पट्टेदाराने पट्टाकाराला अग्रिम म्हणून परत केलेले धन हे, प्रत्यर्पणाचा मोबदला म्हणून समजण्यात येणार नाही.] | |
| **५९. हस्तांतरण.–**(प्रतिफलासह किंवा त्याविना असो किंवा नसो)— | |
| १८९९ चा २. (अ) भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ याच्या कलम ८ द्वारे तरतूद केलेली ऋणपत्रे खेरीजकरून विक्रेय रोखे असलेल्या ऋणपत्रांचे,- मग असे ऋणपत्र शुल्क आकारण्यास पात्र असो वा नसो.— | ऋणपत्राच्या प्रतिफल रकमेच्या प्रत्येक १०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पन्नास पैसे. [३][* * * ]. |
| **स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनासाठी " ऋणपत्र " या संज्ञेमध्ये ऋणपत्र पुंजरोख्याचा समावेश होतो; | |
| (ब) बंधपत्र, गहाणखत किंवा विमापत्र यांद्वारे प्रतिभूत केलेल्या कोणत्याही हितसंबंधाचे; | हस्तांतरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे हितसंबंधाच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क [४] [ दोनशे रुपयांच्या] [५] [ कमाल मर्यादेच्या] अधीन राहून. |
| १९६३ चा ४५. (क) महाप्रशासक अधिनियम, १९६३ याच्या कलम २२ खालील कोणत्याही मालमत्तेचे; | |
| (ड) एका विश्वस्ताने दुसऱ्या विश्वस्ताकडे किंवा विश्वस्ताने एखाद्या लाभाधिकाऱ्याकडे कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचे प्रतिफलाविना केलेले. | |

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ८(ज) द्वारे मूळ अनुच्छेदाऐवजी अनुच्छेद ५८ दाखल करण्यात आला.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ड) द्वारे " (क) किंवा (घ) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ५(१७) द्वारे " दहा हजार रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने " हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ह(ढ) द्वारे " शंभर रुपयांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३(ड) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **माफी** | |
| (अ) विनिमयपत्र, धनादेश किंवा वचनचिठ्ठी यांचे; | |
| (ब) भरणपत्र, सुपूर्दगी आदेश, मालाचे अधिपत्र किंवा मालावरील मालकीहक्कांसंबंधीचा इतर वाणिज्यिक दस्तऐवज यांचे; | |
| (क) विमापत्रांचे; | |
| (ड) केंद्र सरकारचे रोखे यांचे; | |
| पृष्ठांकनाद्वारे केलेले हस्तांतरण. | |
| **६०. भाडेपट्ट्याचे हस्तांतरण.—**पोट-भाडेपट्ट्याद्वारे अथवा दिवाणी न्यायालयाने किंवा कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने काढलेल्या हुकूमनाम्याद्वारे किंवा अंतिम आदेशाद्वारे नव्हे तर, अभिहस्तांकनाद्वारे केलेले. | हस्तांतरणाची विषयवस्तू असणाऱ्या मालमत्तेच्या बाजार मूल्यावर, अनुच्छेद २५ याच्या यथास्थिति खंड (अ), (ब), [1][(क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्का-इतके शुल्क. |
| **६१. विश्वस्तव्यवस्था.—** | |
| **अ. त्यासंबंधीची घोषणा —** कोणत्याही मालमत्तेच्या किंवा मालमत्तेसंबंधीच्या विश्वस्तव्यवस्थेची घोषणा मृत्यूपत्राहून अन्य अशा कोणत्याही लेखाद्वारे केलेली असताना,— | |
| (अ) मालमत्तेचे संक्रामण केलेल असेल तेव्हा,— | |
| (एक) विश्वस्तव्यवस्था ही धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी केलेली असेल त्याबाबतीत; | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या माल-मत्तेच्या बाजार मूल्याइतक्या रकमेच्या [2][प्रत्येक पाचशे रुपयां-करिता किंवा त्यांच्या भागाकरिता दहा रुपये] ; |

[1] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ढ) द्वारे “ (क) किंवा (ड) ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १४(११) द्वारे “ बंधत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क ” या मजुकराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत, | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजार मूल्याइतक्या रकमेकरिता अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (क), (ख) [१][(क)] अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क. |
| (ब) मालमत्तेचे संक्रामण केलेले नसेल तेव्हा,— | |
| (एक) विश्वस्तव्यवस्था ही धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी केलेली असेल त्याबाबतीत; | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजार मूल्याइतक्या रकमेकरिता बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काइतके शुल्क — परंतु, हे शुल्क [२][ दोनशे रुपयांपेक्षा] अधिक असणार नाही. |
| (दोन) इतर कोणत्याही त्याबाबतीत,— | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्याइतक्या रकमेकरिता बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काइतके शुल्क—परंतु, हे शुल्क [३][ दोनशे रुपयांपेक्षा] अधिक असणार नाही. |

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २(ण) द्वारे " (क) किंवा (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(ण)(१)(एक) द्वारे " शंभर रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६(ण)(१)(दोन) द्वारे " शंभर रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **ब. ती रद्द करणे.**— कोणत्याही मालमत्तेची किंवा मालमत्तेसंबंधीची विश्वस्तव्यवस्था मृत्यूपत्राहून अन्य कोणत्याही संलेखाद्वारे केलेली असेल तेव्हा ती रद्द करणे. | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्याइतक्या रकमेकरिता बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काइतके शुल्क — परंतु, हे शुल्क [1][ दोनशे रुपयांपेक्षा] अधिक असणार नाही. |
| संव्यवस्था (अनुच्छेद ५५) देखील पहा. | |
| **मूल्यांकन.**— मूल्यन (अनुच्छेद ८) पहा. | |
| **६२. मालाचे अधिपत्र.**— म्हणजे, जो संलेख त्यात नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा किंवा तिच्या अभिहस्तांकितीचा किंवा तो संलेख धारण करणाऱ्या व्यक्तीचा कोणत्याही गोदीत किंवा वखारीत किंवा मालधक्क्यावर पडून असलेल्या एखाद्या मालावरील मालकी-हक्काचा पुरावा असेल आणि अशा तऱ्हेचा माल ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेत असेल अशा व्यक्तीने किंवा त्या व्यक्तीच्यावतीने जो स्वाक्षरित किंवा प्रमाणित केलेला असेल असा कोणताही संलेख.] | एक रुपया. |
| [2]**[६३. कार्यकंत्राट.**— म्हणजे, कामांचे आणि ती पार पडताना लागणाऱ्या कामगारांसाठीचे सेवांचे कंत्राट असून त्यात मालाच्या स्वरूपातील मालमत्तेचे हस्तांतरण (मग ते मालाचे म्हणून असो किंवा अन्य काही स्वरूपातील असो) करण्यासाठी असलेली सेवा आणि त्यात उपकंत्राटाचा समावेश होतो,— | |
| (अ) अशा कंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम किंवा मूल्य दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | शंभर रुपये. |
| (ब) ते दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, | पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, शंभर रुपये अधिक (+) दहा लाख रुपयांवरील रकमे-साठी प्रत्येक १,००,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता १०० रुपये.] |

[1] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६ (ग) द्वारे " शंभर रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४**(ख)** द्वारे हा अनुच्छेद जादा दाखल करण्यात आला.

## अनुसूची दोन

## निरसित केलेल्या अधिनियमिती

(कलम ७६ पहा)

| वर्ष (१) | क्रमांक (२) | अधिनियमिती (३) | निरसनाची व्याप्ती (४) |
|---|---|---|---|
| १८९९ | दोन .. | दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास आणि मुंबई राज्याच्या विदर्भ भागास व कच्छ क्षेत्रास लागू असलेला भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९. | भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक मधील नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर खेरीजकरून, संपूर्ण अधिनियम. |
| १८९९ | दोन .. | मुंबई राज्याच्या सौराष्ट्र क्षेत्रास लागू असलेला भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९. | भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक मधील नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर खेरीजकरून, संपूर्ण अधिनियम. |
| १३३१ फसली | चार .. | हैद्राबाद मुद्रांक अधिनियम, १३३१– फसली. | भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक मधील नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर खेरीजकरून, संपूर्ण अधिनियम. |
| १९३२ | दोन .. | मुंबई वित्त अधिनियम, १९३२. | भाग चार व पाचमध्ये अंतर्भूत असलेली कलमे १५, १६, १७, १८ आणि १९. |
| १९४३ | चौदा .. | मुंबई मुद्रांक शुल्क वाढविण्याबाबत अधिनियम, १९४३. | संपूर्ण अधिनियम. |